CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | मंगळवार, २६ मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ७८ | पाने १२ | किंमत रु. ८/- | RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपल्याला जे परिवर्तन घडवायचे आहे, ते गुलामगिरीकडून स्वातंत्र्याकडे, भावुकतेकडून श्रद्धेकडे, प्रतिष्ठेच्या जाणिवेकडून सामंजस्याकडे, आग्रही वृत्तीकडून तर्कशुद्धतेकडे, असंघटित जीवनाकडून संघटित जीवनाकडे, टोकाच्या आग्रहाकडून सहिष्णुतेकडे आणि अंध दैववादाकडून मानव-प्रतिष्ठेच्या विचाराकडे नेणारे असेल.

**- स्व. पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# ‘एनटीए’ने घेतला नाही धडा




◆ **नवी दिल्ली, २५ मे**

यापूर्वी झालेल्या पेपरफुटीतून राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात् एनटीएने कोणताही धडा घेतलेला नाही, असा संताप सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केला. वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेण्यासाठी सध्याच्या परीक्षा संस्थेची जागा एका अधिक सक्षम आणि स्वायत्त संस्थेने घ्यावी, या मागणीसाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकांच्या संदर्भात न्यायालयाने केंद्र सरकार, एनटीए आणि सीबीआयला नोटीस बजावत उत्तर मागवले.

याचिकेची प्रत न्यायाभिकर्ता तुषार मेहता तसेच इतर पक्षांना द्यावी आणि २०२४ मध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या पालनाबाबत गुरुवारपर्यंत शपथपत्र दाखल करावे, असा आदेश नीट परीक्षा आयोजित करणारी संस्था एनटीएला दिला. त्यांनी धडा घेतला नाही, हे अतिशय दुःखद आहे. यापूर्वीही न्यायालयात हे प्रकरण आले आहे. यावरील देखरेख समितीने केलेल्या काही शिफारसी स्वीकारण्यात आल्या होत्या. समितीने सादर केलेल्या शिफारसींच्या अंमलबजावणीसाठी कोणती पावले उचलली याची माहिती देणारे शपथपत्र एनटीएने दाखल करावे, असे न्यायासनाने स्पष्ट केले.

‘फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन’ने (एफएआयएमए) वकील तन्वी दुबे यांच्यामार्फत दाखल केलेल्या याचिकेवर नोटीस बजावताना, अशाच स्वरूपाची इतर सर्व प्रकरणे आम्ही एकत्रित करीत आहोत, असे न्यायालयाने म्हटले. एनटीएच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी केंद्राने नियुक्त केलेल्या आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) माजी प्रमुख के. राधाकृष्णन् यांच्या नेतृत्वाखालील समितीला, आपल्या निर्देशांचे पालन करण्यासाठी उचललेल्या पावलांचा सविस्तर तपशील सादर करण्याचा निर्देश देण्यात आला.

फेरपरीक्षेवर देखरेख करण्यासाठी नवीन संस्था औपचारिकरीत्या स्थापन होईपर्यंत एका उच्चाधिकार देखरेख समितीची नियुक्ती करण्यासाठी निर्देश द्यावा, अशी मागणीही याचिकेत आहे. पुढे कोणतीही गळती होणार नाही, याची खात्री करण्यासाठी या समितीमध्ये एक सायबर सुरक्षा तज्ज्ञ आणि एक न्यायवैद्यक शास्त्रज्ञाचा समावेश असावा, असेही यात नमूद करण्यात आले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### २०२४ मध्ये परीक्षा रद्द करण्यास नकार

**»» २०२४ मध्ये नीट-यूजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ही परीक्षा रद्द करण्यास नकार दिला. मात्र, प्रश्नपत्रिका फुटीचा सामना करण्याच्या उद्देशाने विविध निर्देश जारी केले तसेच सार्वजनिक परीक्षा रद्द करण्यासाठी एक निकषही निश्चित केला होता.** ■

### एनटीएची पुनर्रचना करा, अथवा स्वायत्त यंत्रणा नेमा

**»» सर्व संबंधित पक्षांनी तीन दिवसांच्या आत आपली उत्तरे सादर करावीत, असा निर्देश देत न्यायालयाने या प्रकरणावरील सुनावणी शुक्रवारी ठेवली. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे २२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या मूलभूत हक्कांवर थेट हल्ला होत असल्याचे कारण देत, या वैद्यकीय संस्थेने सर्वोच्च न्यायालयाकडे नीट-यूजी परीक्षा घेण्यासाठी एनटीएची थेट पुनर्रचना करावी किंवा त्याऐवजी एखादी भक्कम आणि स्वायत्त यंत्रणा नेमावी, अशी मागणी याचिकेत केली आहे.** ■

# इंधन दरात चौथ्यांदा वाढ

**पेट्रोल २.७२ | डिझेल २.८१**
**रुपयांनी महागले**



◆ **नवी दिल्ली, २५ मे**

देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सोमवारी चौथ्यांदा वाढ करण्यात आली. एकाच महिन्यात चौथ्यांदा इंधनाच्या किंमतीत वाढ झाली आहे. सोमवारी, तेल कंपन्यांनी पेट्रोलच्या दरात प्रति लिटर २.६१ आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर २.७१ ने वाढ केली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती, रुपयाचे अवमूल्यन आणि वाढता आयात खर्च ही यामागील प्रमुख कारणे असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. इंधनाच्या सतत वाढणाऱ्या किमतींचा परिणाम आता वाहतूक आणि इतर दैनंदिन गरजेच्या वस्तूंवर होऊ शकतो.

मे महिन्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत चौथ्यांदा वाढ करण्यात आली आहे. आज २५ मे रोजी पेट्रोल २.६१ आणि डिझेल २.७१ प्रति लिटर, २३ मे रोजी पेट्रोल ८७ पैसे, डिझेल ९१ पैस, १९ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये सरासरी ९० पैशांची वाढ तर १५ मे रोजीही किमतींमध्ये ३ प्रति लिटरची वाढ करण्यात आली होती. यानुसार गत १० दिवसांमध्ये पेट्रोल ७.३८ तर डिझेल ७.५२ रुपयांनी महागले आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात उसळी; गुंतवणूकदारांचा फायदा

**मुंबई** : गेल्या काही दिवसांतील चढ-उतारांनंतर शुक्रवारी शेअर बाजारात पुन्हा एकदा तेजीचे वातावरण पाहायला मिळाले. दिवसभरातील घसरण मागे टाकत सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी नफा कमावला. अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता करार होण्याच्या नव्या आशा निर्माण झाल्याने गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला आणि त्याचा सकारात्मक परिणाम बाजारावर दिसून आला. सत्राच्या अखेरीस मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ‘सेन्सेक्स’ २३२ अंकांच्या वाढीसह ७५,४१५.३५ वर स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा ‘निफ्टी’ ६५ अंकांनी वधारून २३,७१९.३० वर बंद झाला. मुख्य बाजारात तेजी असली तरी मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप शेअर्समध्ये संमिश्र कल दिसून आला. बीएसई १५० मिडकॅप निर्देशांक ०.११ टक्क्यांनी वाढला. ■

### ट्विशा शर्मा प्रकरणाचा तपास करणार सीबीआय

**नवी दिल्ली** : भोपाळच्या कटारा हिल्स भागात १२ मे रोजी सासरवाडीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळलेल्या ट्विशा शर्माच्या मृत्यूचा तपास सीबीआय हाती घेणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. सीबीआयने यापूर्वीत एक पथक भोपाळला पाठवले आहे. हे पथक राज्य पोलिसांकडून तपासाची सूत्रे हाती घेईल आणि या प्रकरणाशी संबंधित सर्व पुरावे व कागदपत्रे गोळा करेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणाचा तपास निष्पक्ष, स्वतंत्र आणि निःपक्षपाती असेल, याची खात्री केली जाईल, असे या प्रकरणाची सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने स्पष्ट केले. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेची कलमे ८०(२) आणि ३(५) यांच्यासह हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या संबंधित कलमांन्वये त्विशाचा पती समर्थसिंह आणि गिरिबाला सिंह यांना आरोपी ठरवून एफआयआर दाखल केला होता. ■

# गोवंश हत्या आणि तस्करी खपवून घेणार नाही!

## गोरक्षकांच्या सुरक्षेचे विधानसभाध्यक्षांचे सक्त निर्देश

◆ **मुंबई, २५ मे**

येत्या २८ मे २०२६ रोजी असलेल्या बकरी ईदच्या काळात राज्यात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक आणि कत्तलीचे मनसुबे उधळून लावण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. सणाच्या नावाखाली कायद्याची पायमल्ली खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देत नार्वेकर यांनी राज्यात गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्याची अत्यंत कठोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भात त्यांनी थेट राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुंबईच्या पोलीस आयुक्तांना पत्र लिहून सक्त कारवाईचे फर्मान सोडले आहे.

सणासुदीच्या काळात गोवंश हत्या बंदी कायद्याला वाटाण्याच्या अक्षता लावून गैरप्रकार करण्याचे धाडस काही समाजकंटकांकडून केले जाते. या पार्श्वभूमीवर, राज्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून प्रशासनाने कंबर कसली आहे. मालेगाव-नाशिकसह अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सातारा, धाराशीव, धुळे आणि सोलापूर यांसारख्या अतिसंवेदनशील मानल्या जाणाऱ्या जिल्ह्यांमध्ये विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना विधानसभा अध्यक्षांनी दिल्या आहेत.

या सर्व भागांसह राज्यभरात पोलिसांनी रात्रंदिवस गस्त वाढवावी आणि जनावरांच्या बेकायदेशीर वाहतुकीच्या नाड्या पूर्णपणे आवळाव्यात, असे स्पष्ट निर्देश या पत्राद्वारे देण्यात आले आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

### गोरक्षकांवर हात उचलल्यास खैर नाही!



**“ अनेकदा बेकायदेशीर पशू वाहतूक रोखण्यासाठी प्राणांची बाजी लावून पुढे येणाऱ्या गोरक्षकांवर जीवघेणे हल्ले होण्याच्या घटना घडतात. यापुढे असे भ्याड हल्ले अजिबात सहन केले जाणार नाहीत, अशी कडक तंबीही देण्यात आली आहे. गोरक्षकांना पुरेशी सुरक्षा पुरवण्यासोबतच त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांनी आधीच प्रतिबंधात्मक पावले उचलावीत, असे नार्वेकर यांनी ठणकावून सांगितले आहे.** ■

# घरगणना करताना शिक्षकाचा चक्कर येऊन मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२५ मे-**

भारत सरकारच्या वतीने संपूर्ण देशामध्ये जनगणना २०२७ या राष्ट्रीय मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेतंर्गत राष्ट्रीय कर्तव्य बजावत असताना एका शिक्षकाचा सोमवार, दि.२५ मे २०२६ रोजी मृत्यू झाल्याची घटना सांगोला येथे घडली. राजेंद्र दामोदर ढोले (वय-४९) असे त्या शिक्षकाचे नाव आहे.



राजेंद्र ढोले हे सांगोला विद्या मंदिर प्रशालेत सहशिक्षक म्हणून काम पाहत होते. त्यांच्याकडे सांगोला शहरातील पाटील/चौगुले वस्ती या भागातील जनगणनेचे काम सोपविण्यात आले होते. सोमवारी ते घरयादी व घरगणना करत असताना असह्य उलट्या व चक्कर येऊन खाली कोसळले. अमोल कोरे यांनी राजेंद्र ढोले यांना उपचारास सांगोला येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता उपचारापुर्वीच मयत झाले असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. सांगोला ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. शंभुराजे साळुंखे यांनी सांगोला पोलिस ठाणे येथे याची खबर दिली. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

राजेंद्र ढोले यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे. मनमिळावू स्वभावामुळे ते संपूर्ण सांगोला तालुक्यात लोकप्रिय होते. शिक्षण क्षेत्रातील कार्यासोबतच सामाजिक कार्यातही ते हिरीरीने सहभाग घेत असत. त्यांच्या या अकाली आणि धक्कादायक निधनाने शिक्षण क्षेत्रात, विद्यामंदिर परिवारात आणि त्यांच्या मित्रपरिवारात शोककळा पसरली आहे.

# सत्यनारायण नुवाल, जनार्दन बोथेंसह मान्यवरांना ‘पद्म’ पुरस्कार प्रदान



**महाराष्ट्रातील आठ मान्यवरांचा समावेश**

**नवी दिल्ली, २५ मे**

देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या ‘पद्म पुरस्कारांचे’ वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज सन्मानपूर्वक करण्यात आले. उद्योजक सत्यनारायण नुवाल, जनार्दन बोथे यांच्यासह महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील ‘गणतंत्र मंडप’ येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन , पंतप्रधान नरेंद्र मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. आज पार पडलेल्या पहिल्या टप्प्यातील समारंभात महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना कला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मरणोत्तर ‘पद्मविभूषण’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांच्या पत्नी व खासदार हेमा मालिनी यांनी स्वीकारला. सहा दशकांहून अधिक काळ हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे धर्मेंद्र यांनी ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. गेल्या नोव्हेंबरमध्ये वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले होते.

# देशातील पहिला पाण्याचा सात-बारा महाराष्ट्रात!

## जल व्यवस्थापनासाठी राज्य सरकारचे ऐतिहासिक पाऊल

◆ **मुंबई, २५ मे**

जमिनीच्या नोंदी ठेवण्यासाठी जसा सातबारा उतारा असतो, तसाच आता पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासाठी आणि अचूक जल व्यवस्थापनासाठी पाण्याचा सातबारा तयार करण्यात येणार आहे. असा अभिनव प्रयोग करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार असून, राज्य सरकारच्या या ऐतिहासिक पावलामुळे विकसित महाराष्ट्राच्या दिशेने आणखी एक मोठी झेप घेतली गेली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष सूचनेवरून मंत्रालयात ही महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पलकुंडवार, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापडकर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सध्या जगात पाण्याला मिळायला हवा तसा दर्जा आणि महत्त्व दिले जात नाही. जोपर्यंत पाण्याचा वापर नोंदवला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण ठेवणे आणि लोकांची जबाबदारी निश्चित करणे अशक्य आहे. हीच बाब लक्षात घेऊन ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंटच्या धर्तीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे. जलव्यवस्थापनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अक्वेरियम या संस्थेने वॉटर ऑडिट आणि बॅलन्सशीटची संकल्पना सरकारसमोर मांडली. सुरुवातीला ही योजना राज्यात प्रायोगिक तत्त्वावर राबविली जाणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### असा असेल पाण्याचा सात-बारा

**»» या प्रणालीअंतर्गत पाण्याचे तब्बल तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, त्याचे दरवर्षी वर्गीकरण केले जाईल.यामुळे ग्रामपंचायत किंवा एखाद्या पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा एकूण साठा, आवक (येणारे पाणी), जावक (वापरलेले पाणी) आणि शिल्लक पाणी याचा अतिशय पारदर्शक ताळेबंद ठेवता येईल. या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे, केवळ पाण्याचे मोजमाप होणार नाही, तर जे नागरिक आणि संस्था पाण्याचे संवर्धन करतील, त्यांना अक्काक्रेडिट्सच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल.** ■



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### १३ राज्यांमध्ये वादळी पावसाचा इशारा

**नवी दिल्ली** : देशातील हवामान पुन्हा एकदा बदलणार आहे. हवामान विभागाने मंगळवारी उत्तर प्रदेश आणि बिहारसह १३ राज्यांमध्ये वादळी पावसाचा इशारा दिला आहे. या काळात ताशी ८५ किमी वेगापर्यंत वारे वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली असून लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. हवामान विभागानुसार उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिशा, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, आसाम आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये मंगळवारी मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता आहे. काही भागात गारपिटीचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच पावसासोबत ताशी ८० ते ८५ किलोमीटर वेगाचे वारे वाहण्याची शक्यता आहे. या काळात शेतकरी आणि मच्छिमारांना सावधगिरी बाळगावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. पूर्वेकडील राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मेघगर्जनेमुळे हाहाकार उडण्याची शक्यता आहे. काही राज्यांमध्ये गारपिटीचाही इशारा देण्यात आला आहे. ■

### नीट पेपरफुटीमुळे मुलीची आत्महत्या

**लातूर** : डॉक्टर बनण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या माझ्या मुलीने नीट पेपरफुटीमुळेच मानसिक तणावातून आत्महत्या केली, असा दावा लातूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. गोंदेगाव येथील रहिवासी मैथिली अशोक सोनवणेने १६ मे रोजी सकाळी आपल्या शेतातील एका झाडाला गळफास लावून आत्महत्या केली होती. तिचे शवविच्छेदन आणि इतर कायदेशीर सोपस्कार पूर्ण करण्यात आले. परंतु, .मैथिलीचे वडील अशोक सोनवणे यांनी रविवारी पोलिसांकडे एक लेखी निवेदन सादर केले. या तक्रारीत त्यांनी दावा केला आहे की, ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेत त्यांची मुलगी मैथिली बसली होती. परंतु, पेपरफुटीचा प्रकार समोर आल्यामुळे परीक्षा रद्द करण्यात आली. तेव्हापासून ती मानसिक तणावात होती. अशोक यांनी तक्रारीत सांगितले की, माझ्या मुलीने डॉक्टर बनण्याचे स्वप्न पाहिले होते. मैथिलीने परीक्षेची उत्तम तयारी करूनही आणि परीक्षेत समाधानकारक कामगिरी करूनही परीक्षा रद्द झाल्यामुळे ती अस्वस्थ झाली होती. तिला आपल्या भविष्याबद्दल चिंता वाटत होती. ■



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्कार स्वीकारताना पीयूष पांडे यांच्या पत्नी नीता जोशी, कोटक महिंद्रा बँकेचे संस्थापक उदयक कोटक, माजी राज्यपाल भगतसिंग कोशारी आणि धर्मेंद्र यांचा मरणोत्तर पुरस्कार स्वीकारताना हेमा मालिनी

# उदय कोटक यांना पद्मभूषण पुरस्कार पीयूष पांडे यांचा मरणोत्तर सन्मान

◆ **नवी दिल्ली, २५ मे**

राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे सोमवारी पार पडलेल्या कार्यक्रमात उदय कोटक आणि पीयुष पांडे यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कोटक महिंद्रा बँकेचे संस्थापक उदय कोटक यांनी एका छोट्या बिल डिस्काउंटिंग स्टार्टअपपासून देशातील अग्रगण्य खासगी बँक उभी करून भारतीय बँकिंग क्षेत्रात नवे मानदंड निर्माण केले. जाहिरात क्षेत्रातील सर्जनशीलतेचे प्रतीक मानले जाणारे पीयूष पांडे यांना मरणोत्तर 'पद्मभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या पत्नी नीता जोशी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**गोडबोले दाम्पत्याला संयुक्त पद्मश्री**

मूळचे पुण्याचे असलेले डॉ. रामचंद्र गोडबोले आणि डॉ. सुनीता गोडबोले या दाम्पत्याला संयुक्तपणे 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविण्यात आले. गेली ३५ वर्षे त्यांनी महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील बस्तर आणि अबूझमाडसारख्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागांत आरोग्य सेवा



पोहोचवण्याचे कार्य केले आहे. 'ट्रस्ट फॉर हेल्थ'च्या माध्यमातून त्यांनी आदिवासी भागातील कुपोषण आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी विशेष योगदान दिले असून, सुमारे एक लाख आदिवासींना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे.

(तभा वृत्तसेवा)

### पाच मान्यवर पद्मश्री पुरस्काराने सन्मानित

आज राज्यातील पाच मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यात जनार्दन बापुराव बोथे यांचा समावेश आहे. त्यांना सामाजिक कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. ग्रामीण महाराष्ट्रात जलसंधारण आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहिमेद्वारे अनेक गावांचा पाणीप्रश्न सोडवण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले. रघुवीर खेडकर यांना कला प्रकारातील तमाशा लोककलेसाठी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ज्येष्ठ तमाशा कलावंत कांताबाई सातारकर यांचे पुत्र रघुवीर खेडकर असलेले यांनी महाराष्ट्राची पारंपरिक लोककला 'तमाशा' जागतिक स्तरावर पोहोचवली असून लोककलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्यही त्यांनी केले आहे. श्रीरंग लाड यांना कृषी क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. परभणीचे प्रयोगशील शेतकरी आणि भारतीय किसान संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते असलेल्या श्री. लाड यांनी 'दादा लाड तंत्रज्ञान' विकसित करून कापूस उत्पादन वाढीसाठी मोठे कार्य केले. 'लाल कंधारी' गाईंच्या संवर्धनासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. ■

### यंदा दोन टप्प्यांत वितरण

यंदाच्या पद्म पुरस्कार वितरण दोन टप्प्यांत होत असून, आजच्या पहिल्या टप्प्यात देशभरातील ६६ मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये दोन पद्मविभूषण, सहा पद्मभूषण आणि ५८ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. यंदाच्या पद्म पुरस्कार यादीत एकूण १३१ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, त्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. एकूण पुरस्कारार्थींमध्ये १९ महिला असून, १६ मान्यवरांना मरणोत्तर सन्मान जाहीर करण्यात आला आहे. ■

### नुवाल यांचे संरक्षण क्षेत्रात योगदान

नागपूरस्थित उद्योजक सत्यनारायण नुवाल यांनी 'सोलर इंडस्ट्रीज'च्या माध्यमातून संरक्षण क्षेत्र आणि खाणकाम उद्योगात मोठे योगदान दिले आहे. डिफेन्स एक्सप्लोझिव्ह क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या योगदानासाठी त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मायक्रो इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमी कंडक्टर संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून देशाच्या वैज्ञानिक प्रगतीला चालना देणारे प्रा. जुझर वासी यांना पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ■

# साठेबाजी खपवून घेणार नाही : मुख्यमंत्री

### पेट्रोल-डिझेलच्या कृत्रिम टंचाईवर राज्य सरकारची आक्रमक भूमिका

◆ **मुंबई, २५ मे**

राज्यात सध्या निर्माण झालेल्या पेट्रोल आणि डिझेलच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साठेबाज आणि कायदा हातात घेणाऱ्यांना सज्जड दम भरला आहे.



शेतकऱ्यांच्या नावाने कोणीही इंधनाची साठेबाजी करू नये, तसेच कृत्रिम टंचाई निर्माण करून पुरवठ्यावर ताण आणणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशाराच त्यांनी दिला आहे. इंधन पंपांवर विनाकारण हिंसाचार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आल्याची माहितीही त्यांनी प्रसारमाध्यमांना दिली. विरोधकांनी इंधन टंचाईवरून केलेल्या टीकेचा समाचारही त्यांनी यावेळी घेतला.

इंधन टंचाई हे केवळ राज्याचे किंवा देशाचे संकट नसून ते एक गंभीर जागतिक संकट आहे. अशा भीषण जागतिक परिस्थितीतही आपण राज्याला पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. एरवी सुरक्षेच्या कारणास्तव अशा प्रकारे इंधन दिले जात नाही, परंतु बळीराजाची अडचण आणि कामाची निकड लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, या सवलतीचा गैरफायदा घेत शेतकऱ्यांच्या नावाने इतर कोणीही साठेबाजी करू नये. पुरवठ्यावर ताण येईल अशी कोणतीही कृती खपवून घेतली जाणार नाही, असा सक्त इशारा त्यांनी दिला आहे. साठेबाजी रोखण्यासाठी सर्व जिल्हा प्रशासनांना तातडीने कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. (तभा वृत्तसेवा)

### अफवांमुळे मागणीत वाढ; साठा मात्र पुरेसा

राज्यात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही, हे सरकारने आकडेवारीसह स्पष्ट केले आहे. गेल्या वर्षी जेवढा इंधनाचा कोटा राज्याकडे उपलब्ध होता, बरोबर तेवढाच कोटा आजही उपलब्ध आहे. मात्र, उद्या पेट्रोल मिळेल की नाही? या केवळ भीतीपोटी नागरिकांनी गाड्यांच्या टाक्या आणि डबे भरण्यास सुरुवात केल्याने मागणीत अचानक २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून घाबरून साठेबाजी करू नये, प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असून परिस्थिती लवकरच नियंत्रणात येईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. ■

### पेट्रोल पंपांवर राडा करणाऱ्यांवर थेट कारवाई

इंधन मिळवण्याच्या भीतीपोटी अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी उसळली असून, काही गावांमध्ये आणि विशिष्ट ठिकाणी लोकांमध्ये अत्यंत हिंसक प्रवृत्ती दिसून येत आहे. यावर राज्य सरकारने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. पेट्रोल पंपांवर विनाकारण हिंसा करणाऱ्यांवर आणि कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांवर अत्यंत कठोर कारवाई करा, असे थेट आदेश पोलिसांना आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे फडणवीस यांनी यावेळी सांगितले. ■

## महिलेवर लैंगिक अत्याचार; भोंदूबाबा मनोहर भोसलेच्या विरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मे-**

पैसा व काम मिळावे या कारणासाठी संपर्कात आलेल्या एका भाविक महिलेला पाचवी वारी करण्याच्या नावाखाली आश्रमात बोलावून मंत्रोपचार करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी भोंदू बाबा मनोहर मामा भोसले याच्यावर करमाळा पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील फिर्यादी महिलेने जानेवारी २०२५ मध्ये घरात पैसे यावेत काम मिळावे म्हणून मैत्रिणीच्या सांगण्यावरून वडाचीवाडी पुणे येथे मनोहर मामा भोसले यास भेटून त्याच्या सांगण्यावरून वडाचीवाडी येथील आश्रमातील चार वाऱ्या केल्या होत्या. त्यानंतर आश्रमातील नाथबाबा यांनी पुढील पाचवी वारी करण्यासाठी घोटी (तालुका करमाळा )येथे येण्यास सांगितले व त्या ठिकाणी मोठी पुजा करायाची आहे असे सांगितले होते. त्यानंतर नाथबाबा याने चालकासह फिर्यादीचे घरी जावून चारचाकी वाहनातून तिला घोटी येथील आश्रमात आणून राहण्यासाठी आश्रमातील खोली दिली व तिचेकडून ११,०००/- रूपये घेतले. याबाबत पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून करमाळा पोलीस ठाण्यात आरोपी भोंदू बाबा मनोहर भोसले याच्याविरुद्ध बलात्कार, फसवणूक, आर्थिक शोषण, धमकी व महिलेस मानसिक त्रास दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गॅस लिकेजमुळे भीषण स्फोट; पिता-पुत्रीसह चौघे भाजले

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २५ मे-**

टेंभुर्णी येथील टेंभुर्णी-बेंबळे रोड परिसरात सोमवारी (दि.२५) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास गॅस लिकेजमुळे भीषण आग लागून झालेल्या स्फोटात पिता-पुत्रीसह चौघेजण भाजून जखमी झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून सुदैवाने जीवितहानी टळली आहे.

या दुर्घटनेत दयानंद कावरे (वय ४०), पत्नी शितल दयानंद कावरे (वय ३६), मुलगी कुमारी गौतमी दयानंद कावरे (वय १३) तसेच विलास मच्छिंद्र सातव (वय ४२, सर्व रा. टेंभुर्णी ता. माढा) हे चौघेजण जखमी झाले आहेत. यापैकी दयानंद कावरे व त्यांची मुलगी गौतमी हे गंभीररीत्या भाजल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, दयानंद कावरे यांच्या घरात कुटुंबीयांसह विलास सातव बसले होते. संध्याकाळची वेळ झाल्याने चहा करण्यासाठी दुधाची पिशवी आणण्यास मुलाला पाठविण्यात आले होते. मुलाने दुधाची पिशवी आणून दिल्यानंतर तो बाहेर खेळण्यासाठी गेला. त्यानंतर कुमारी गौतमी हिने घरात जाऊन चहा करण्यासाठी गॅस सुरू केला. मात्र गॅस सिलिंडर किंवा गॅस जोडणीमधून लिकेज होत असल्याने अचानक मोठा भडका उडाला.

क्षणात आगीने रौद्ररूप धारण केल्याने घरातील तिघांच्या अंगावरील कपड्यांनी पेट घेतला. आगीची तीव्रता एवढी होती की घराच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या तसेच दरवाजा चौकटीसह सुमारे वीस ते पंचवीस फूट अंतरावर जाऊन पडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. परिसरात मोठा आवाज झाल्याने नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत चादरी व गोदड्यांच्या साहाय्याने जखमींच्या अंगावरील आग विझवली.

घटनेत जखमी झालेल्यांच्या अंगावरील कपडे पूर्णपणे जळून शरीराला चिकटल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. जखमींना तातडीने उपचारासाठी टेंभुर्णीतील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र दयानंद कावरे व गौतमी कावरे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सोलापूर येथे हलविण्यात आले.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दीक केली होती. रात्री उशिरापर्यंत टेंभुर्णी पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्याचे काम सुरू होते असून पुढील तपास सुरू आहे.

# बजरंग दल कार्यकर्त्याच्या खून प्रकरणी संशयित ताब्यात

### पोलिसांची चार पथके तैनात

◆ **उमरखेड, २५ मे**

गोवंश तस्करी रोखणाऱ्या बजरंग दलाच्या कार्यकर्त्याची गोवंश तस्करांन हत्या केल्याची घटना शनिवारी रात्री सुकळी (ज) येथे घडली. त्यातील एका संशयित आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. इतर आरोपींना पकडण्यासाठी चार पथके तैनात केली आहेत.

नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरून पिकअप वाहनातून गोवंशाची निर्दयपणे कोंबून कत्तलीसाठी उमरखेडच्या दिशेने तस्करी केली जात असल्याची माहिती बजरंग दल कार्यकर्त्यांना मिळाली होती. गोवंशाची तस्करी होत असल्याचे पाहून बजरंग दलाचा कार्यकर्ता गजानन सुरोशे यांनी कारने तस्करांच्या वाहनाचा पाठलाग सुरू केला. सुकळी गावात ही दोन्ही वाहने गेली असता तस्करांच्या टोळीने गजानन यांच्या गाडीवर



मोठमोठे दगड आणि लाकडी दांडक्यांनी भीषण हल्ला चढवला, त्यात त्यांचा मृत्यू झाला.

**तणावपूर्ण वातावरणात वडद येथे अंत्यसंस्कार**

मृत गजानन सुरोशे विवाहित होते. त्यांच्या मागे आई-वडील, पत्नी, १२ वर्षांचा मुलगा, १० वर्षांची मुलगी व तीन भाऊ असा परिवार आहे. नांदेड येथे शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रविवारी दुपारी ४ वाजता वडद येथे त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आला. अंत्यविधीपूर्वी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेतील सर्व आरोपींना अटक झाल्याशिवाय अंत्यसंस्कार करणार नाही, अशी भूमिका नातेवाईक व ग्रामस्थांनी घेतली होती. (तभा वृत्तसेवा)

# पत्नीचा खून करुन फरार झालेल्या आरोपीस अटक; गुन्ह्यातील हत्यारही केले जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २५ मे-**

चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीचा निर्घुण खून करणाऱ्या पतीस बार्शी तालुका पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे. त्याच्याकडून गुन्ह्यातील हत्यारही जप्त केले आहे. यातील विवाहित महिला धनश्री ऋषीकेश पाटील ही बचटगटाचे काम करुन लक्ष्याचीवाडीवरुन दुचाकी एम.एच.१३ एफ.ए.४०१६ बार्शीकडे जात होती. तेव्हा बार्शी-परांडा रोडवरील प्रविण हॉटेलजवळ तिचा पती ऋषीकेश संभाजी पाटील (रा.नागणे प्लॉट, परांडा रोड, ता.बार्शी) याने तिला थांबवुन तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन धारदार हत्याराने गळा, मान, पोटावर वार निर्घुण हत्या केली होती.

घटनेची माहिती मिळताच बार्शी तालुका पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल होत धनश्री पाटील यांना उपचारार्थ ग्रामीण रुग्णालय येथे पाठवले. मात्र डॉक्टरांनी तिला उपचारापुर्वीच मृत घोषित केले. याप्रकरणी मृत विवाहितेचे वडील जितेंद्र गायकवाड ( रा.कासारवाडी, ता. बार्शी) यांनी बार्शी तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.



आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची २ पथके रवाना करण्यात आली. त्यानुसार आरोपीस अटक करुन त्याच्या ताब्यातून हत्यार दोन पंचासमक्ष फिंगरप्रींट पथक, डॉग स्कॉड पथक मदतीने व फॉरेन्सिक पथक यांचे वैज्ञानिक पद्धतीने जप्त केले. गुन्ह्याचा तपास सपोनि महेश माने हे करीत आहेत.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, सहायक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा, पोनि संजय जगताप, पोनि बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि महेश माने, पोउनि बालाजी वळसने, दत्तात्रय भालेराव, चंद्रकांत घोळवे, एएसआय सदाशिव गवळी, पोहेकॉ राजेंद्र मंगरुळे, धनराज केकाण, खांडेकर, दशरथ बोबडे, अमित घाडगे, पोकॉ राहुल बोंदर, नागनाथ आंधळे, सुरेश बिरकले, ओमप्रकाश दासरे, गोविंद बचुटे, शिवशंकर खराडे यांनी ही कामगिरी पार पाडली.

# भोंदू अशोक खरातला आता ईडीकडून अटक

◆ **मुंबई, २५ मे**

स्वयंघोषित धर्मगुरू आणि आध्यात्मिक उपचारांच्या बहाण्याने कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या भोंदू अशोक खरातला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मुंबईतून अटक केली आहे. ईडीच्या मुंबई आंचलिक कार्यालयाने मनी लॉन्ड्रिंग आणि कथित खंडणी प्रकरणाच्या चौकशीनंतर ही मोठी कारवाई केली. आरोपी भोंदू खरातला १९ मे रोजी धन शोधन निवारण कायद्यांतर्गत अटक करण्यात आली असून मुंबईच्या विशेष न्यायालयाने त्याला २६ मेपर्यंत ७ दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे.



ईडीने अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी अशोक खरात हा केवळ धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यात गुंतलेला नव्हता, तर या पवित्र क्षेत्राच्या आडून तो एक अत्यंत पद्धतशीर आणि संघटित खंडणीचे रॅकेट चालवत होता. भोळ्याभाबड्या लोकांना आपल्या जाळ्यात ओढून त्यांच्या मनात विविध भीती निर्माण करून तो त्यांच्याकडून कोट्यवधी रुपये उकळत असल्याचे तपासात उघड झाले आहे. या अवैध आर्थिक व्यवहारांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी ईडीने मागच्या एका महिन्यात आक्रमक पावले उचलली आहेत.

या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी अंमलबजावणी संचालनालयाने १३ आणि १४ एप्रिल, १७ एप्रिल, २३ एप्रिल, ५ मे आणि १८ मे २०२६ रोजी आरोपी अशोक खरात आणि त्याच्या निकटवर्तीयांच्या वेगवेगळ्या ठिकाणांवर एकापाठोपाठ एक धाडी टाकल्या. या प्रदीर्घ शोध मोहिमेमध्ये ईडीच्या हाती मोठे घबाड आणि महत्त्वाची कागदपत्रे लागली आहेत. छाप्यात तब्बल १३.९२ कोटी रुपयांची थेट रोकड आणि ५,५०० अमेरिकन डॉलर्स जप्त करण्यात आले आहेत. सुमारे १.१२ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिनेही जप्त करण्यात आले असून विविध बँकांमधील २.२५ कोटी रुपयांची रोकड गोठवण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

## गोवंश संबंधित गुन्ह्यातील ८६ जणांवर प्रतिबंधक कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मे-**

बकरी ईद-२०२६च्या अनुषंगाने मागील एका वर्षात गोवंश हत्या, तस्करी, वाहतूक संबंधित दाखल गुन्हयातील एकुण ८६ आरोपींवर पोलिस उपायुक्त प्रीतम यावलकर यांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. या ८६ आरोपींपैकी ४ आरोपींना भारतीय नागरिक संहिता कलम १६३ (२) प्रमाणे आठ दिवसांकरिता शहर हद्दीतून बाहेर केले आहे. दोन आरोपींनी बंधपत्राचे उल्लंघन केल्याने त्यापैकी एका आरोपीची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. अन्य एका आरोपीकडून २५ हजारांचा दंड आकारण्यात आला.

# भारतीयांच्या परदेश प्रवासात झाली घट

### आरबीआयच्या आकडेवारीतून माहिती समोर

◆ **नवी दिल्ली, २५ मे**

भारतीय रिझर्व्ह बँकेने परदेश प्रवासासंदर्भात आश्चर्यकारक आकडेवारी जाहीर केली आहे. आरबीआयने म्हटले आहे की, मार्च महिन्यात भारतीयांचा परदेश प्रवासावरील खर्च १.०९ अब्ज डॉलरपर्यंत कमी झाला आहे. आकडेवारीनुसार, जानेवारीमध्ये परदेशावरील खर्च १.६५ अब्ज डॉलर तर फेब्रुवारीमध्ये १.३० अब्ज डॉलर होता.

आरबीआयच्या उदारीकृत रेमिटन्स योजनेअंतर्गत (एलआरएस) ही आकडेवारी योग्यरित्या समजून घेणे महत्त्वाचे आहे. मार्चमध्ये, भारतीय प्रवाशांनी परदेशात पाठवलेली एकूण रक्कम २.५९ अब्ज डॉलर होती. यात प्रवासावरील खर्चाचा वाटा सर्वाधिक होता. नियमांनुसार, एलआरएस अंतर्गत कोणताही निवासी भारतीय नागरिक वर्षाला २.५० डॉलरपर्यंतची रक्कम केवळ आर्थिक व्यवहारांसाठी परदेशात पाठवू शकतो.

भारतीयांनी केलेल्या इतर खर्चाचे गणित समजून घ्यायचे झाल्यास इतर प्रवास श्रेणीमध्ये प्रवास तसेच आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डवरील खर्चाचा समावेश आहे. शिवाय, मार्चमध्ये ६२३ दशलक्ष डॉलर्स खर्च करण्यात आले, जे एकूण प्रवासाच्या अंदाजे ५७ टक्के आहे.

**शैक्षणिक खर्चातही घट**

भारतीयांनी शैक्षणिक प्रवासावर ४५०.१ दशलक्ष डॉलर्स खर्च केले. दरम्यान, परदेशात शिक्षण या श्रेणीतील खर्च जानेवारीतील २६७.४ दशलक्ष डॉलर्सवरून मार्चमध्ये १५१.७ दशलक्ष डॉलर्सपर्यंत कमी झाला.

**कुटुंबियांना आर्थिक मदत वाढली**

परदेशात राहणाऱ्या कुटुंबियांना पाठवलेली रक्कम फेब्रुवारीतील २६६.१ दशलक्ष डॉलर्सवरून मार्चमध्ये ३८९.७ दशलक्ष डॉलर्सपर्यंत वाढली. इतर खर्चांमध्ये व्यावसायिक प्रवास, तीर्थयात्रा आणि वैद्यकीय खर्चाचा समावेश होता. तर परदेशी स्थावर मालमत्ता खरेदीवरील खर्च ३८.६ दशलक्ष डॉलर्सपर्यंत कमी झाला आहे. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# आणखी ११४ राफेलची खरेदी

## हवाई दलाला मिळणार बळ ● ९० विमानांची निर्मिती भारतातच करणार



◆ **नवी दिल्ली, २५ मे**

पाकिस्तान आणि चीनला डोळ्यासमोर ठेऊन आणि भविष्यातील नियोजनासाठी फ्रान्सकडून आणखी ११४ राफेल विमानांची खरेदी केली जाणार आहे. विमान खरेदीचे विनंतीपत्र येत्या काही आठवड्यांमध्ये फ्रान्सला पाठविले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विमान खरेदी कराराच्या अनुषंगाने वायुसेना प्रमुख ए.पी. सिंग जून महिन्याच्या प्रारंभी फ्रान्सच्या दौऱ्यावर जाण्याची शक्यता आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी सुद्धा येत्या जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात फ्रान्सच्या दौऱ्यावर जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भारतीय हवाई दलाकडे सध्या ३६ राफेल विमाने आहेत. नौदलालाही विमानवाहू जहाजाच्या सुरक्षेसाठी २६ राफेल-एम विमानांची गरज आहे. भारताला मिळणाऱ्या ११४ पैकी ९० विमानांची निर्मिती भारतात केली जाणार आहे. यासाठी भारतीय कंपनी आणि फ्रान्सची विमान निर्मिती डसॉल्ट यांच्यात करार केला जाणार आहे. उर्वरित तयार असलेली विमाने हवाई दलाला मिळणार आहेत. विमान निर्मितीच्या यंत्रणेत भारतीय कंपन्यांना प्राधान्य देण्यात यावे, यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करीत आहेत. विमानात जवळपास ५० टक्क्यांच्या आसपास स्वदेशी उपकरणे आणि सुट्याभागांचा उपयोग करावा, असा प्रस्ताव भारताकडून दिला जाण्याची शक्यता आहे. 'मेक इन इंडिया'ला बळ देणे हा यामागचा उद्देश आहे. असे झाल्यास दोन्ही देशांना जागतिक संरक्षण उत्पादन बाजारपेठेतील वाटा आणखी वाढेल आणि दोन्ही देशांना मोठा फायदा होईल. विमान खरेदीचा सौदा थेट दोन्ही देशांच्या सरकारमध्ये होणार आहे. संरक्षण अधिग्रहण परिषदेने या सौद्याला मंजुरी यापूर्वीच दिली आहे. मागणीचे पत्र फ्रान्सला पाठविल्यानंतर विमानांची किंमत, उपलब्धता यावर दोन्ही देशांमध्ये संवाद होईल. तसेच दोन्ही देशांमध्ये चर्चा होऊन व्यवहार निश्चित केला जाईल. ◀(वृत्तसंस्था)

### विमान निर्मिती खर्चात होईल घट

९० विमानांची निर्मिती भारतातच केली जाणार असल्याने उत्पादन खर्चात मोठी बचत होणार आहे. सोबतच रोजगार निर्मिती होऊन प्रशिक्षण आणि देखभालीच्या खर्चातही घट होणार आहे. हेच मुद्दे लक्षात घेऊन जास्तीत जास्त विमाने भारतात तयार केली जाणार आहेत. विशेष म्हणजे भारताकडे विमान निर्मितीसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. ■

### राफेल विमानाची वैशिष्ट्ये

- ☞ हे विमान जास्तीत जास्त प्रतितास २२२२ किलोमीटर वेगाने उडू शकते
- ☞ २४ हजार ५०० किलोग्रॅम वजन वाहून नेण्यास सक्षम
- ☞ एका मिनिटात ६० हजार फूट उंची गाठू शकते
- ☞ हवेतल्या हवेत इंधन भरण्यास सक्षम
- ☞ ३७०० किलोमीटर पर्यंत मारकक्षमता
- ☞ आरबीई-२ एईएसए रडार यंत्रणेसह सज्ज ■



अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी सोमवारी पत्नी जेनेट्टीसह ताजमहालला भेट दिली. या ऐतिहासिक वास्तूची माहिती घेतल्यानंतर ते जयपूरकडे रवाना झाले.

# अभिषेक बॅनर्जींच्या घरावर पोलिसांचा छापा

## मॉनिटरसह काही उपकरणे जप्त ● अवैध बांधकामाची दिली होती नोटीस

◆ **कोलकाता, २५ मे**

तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस आणि ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जींच्या घरावर पोलिसांनी सोमवारी छापेमारी केली. मॉनिटरसह काही उपकरणे जप्त करून पोलिसांनी नेले आहे.

अभिषेक बॅनर्जी यांचे घर १८८-ए हरीश मुखर्जी मार्गावर आहे. सोमवारी पोलिसांचे एक पथक अभिषेक बॅनर्जींच्या घरी पोहोचले आणि मॉनिटरसह काही साहित्य सोबत नेले. कोलकाता महानगर पालिकेके अवैध बांधकामाबाबत त्यांना नोटीस बजावली होती. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या मुद्यावर पोलिसांनी अधिकृत माहिती जारी केली नाही.




महानगर पालिकेने घराच्या काही भागांचे बांधकाम नियमाबाह्य असल्याचे म्हटले होते. या प्रकरणी अभिषेक बॅनर्जी यांना सात दिवसांपूर्वी नोटीस देण्यात आली होती. त्या सात दिवसांची मुदत आज समाप्त झाली, अशी माहिती सूत्रांनी दिली. अभिषेक बॅनर्जी यांनी नोटीसला कोणतेही उत्तर दिले नव्हते. त्यामुळेच पोलिस त्यांच्या घरी पोहोचले, असे सूत्रांनी सांगितले.

शांतिनिकेतनच्या व्यतिरिक्त अभिषेक बॅनर्जी यांच्या आई-वडिलांची मालमत्ता आणि त्यांची लीपस ॲण्ड बाऊन्स या कंपनीलाही महानगर पालिकेने नोटीस बजावली आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात प्रक्षोभक भाषण दिल्याच्या आरोपाखाली अभिषेक बॅनर्जी यांच्याविरोधात विधाननगर सायबर क्राईम पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे ◀(वृत्तसंस्था)

# ३० पोलिस अधिकारी ईडीच्या रडारवर

## कोलकाता जमीन घोटाळा प्रकरण

◆ **कोलकाता, २५ मे**

येथील जमीन घोटाळा प्रकरणात कोलकाता पोलिसांचे जवळपास ३० कर्मचारी ईडीच्या रडारवर आहेत, असे केंद्रीय तपास यंत्रणेच्या अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. ज्येष्ठ नागरिकांना धमकावून त्यांची मालमत्ता बाजारभावापेक्षा कमी किमतीला विकण्यास भाग पाडणाऱ्या एका टोळीशी विविध पदांवरील पोलिस कर्मचाऱ्यांचे लागेबांधे असल्याचा संशय आहे, असे त्यांनी सांगितले.

तपासादरम्यान अनेक पोलिस कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात आले आहेत. त्यांची नेमकी भूमिका तपासली जात आहे, असे तपासाशी संबंधित ईडीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

आम्हाला काही दस्तावेज आणि डिजिटल पुरावे मिळाले आहेत, सध्या त्यांचे विश्लेषण केले जात आहे. या तपासाचे लक्ष आता पैशांच्या व्यवहारांचा मागोवा घेणे आणि सर्व लाभार्थ्यांचा ओळख पटवणे यावर केंद्रित झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

जप्त करण्यात आलेल्या मोबाईल फोनमधील काही माहिती वगळण्यात आल्याचे दिसून येत आहे. न्यायवैद्यक तपासणीद्वारे ही माहिती पुन्हा मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले.

ईडी सध्या कथित रॅकेटमध्ये अटक करण्यात आलेले तीन आरोपी विश्वजित पोद्दार उर्फ सोना पप्पू, कोलकाताचे माजी उपायुक्त शांतनू सिन्हा विश्वास आणि व्यावसायिक जॉय कामदार यांची भूमिका तपासत आहे. ◀(वृत्तसंस्था)

# पंतप्रधान मोदींचा मी चाहता : डोनाल्ड ट्रम्प

## भारत माझ्यावर १०० टक्के विश्वास ठेवू शकतो

◆ **नवी दिल्ली, २५ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मी चाहता आहे. ते माझे महान मित्र आहेत. भारत माझ्यावर १०० टक्के विश्वास ठेवू शकतो, असे प्रतिपादन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी रात्री केले. ते अमेरिकीन स्वातंत्र्याच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित एका कार्यक्रमादरम्यान त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख महान मित्र असा केला.

येथील भारत मंडपम् येथे आयोजित कार्यक्रमाला परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो आणि अमेरिकेचे राजदूत सर्जि गोर यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे मुख्य सादरीकरण ए. आर. रहमान यांचे सादरीकरण होते. मला फक्त नमस्कार करायचा आहे. मला पंतप्रधान खूप आवडतात. मोदी महान आहेत, ते माझे मित्र आहेत आणि मला फक्त सर्वांना शुभ सायंकाळ म्हणायचे आहे, असे ट्रम्प यांनी गोर यांच्यासोबत झालेल्या दूरध्वनी संभाषणात म्हटले

मी पंतप्रधान मोदींचा खूप, खूप मोठा चाहता आहे, असे ट्रम्प म्हणाले. ट्रम्प यांचे वक्तव्य उपस्थितांना ऐकू यावे, यासाठी अमेरिकेच्या राजदूताने आपला फोन मायक्रोफोनसमोर धरला. आम्ही भारताच्या इतके जवळ यापूर्वी कधीच नव्हतो. भारत माझ्यावर आणि आमच्या देशावर १०० टक्के विश्वास ठेवू शकतो. जर त्यांना कधीही मदतीची गरज भासली, तर कुठे संपर्क साधावा हे त्यांना ठाऊक आहे, ते थेट इथेच फोन करतील, असे ट्रम्प म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# महिला काँग्रेस अध्यक्षा अलका लांबांना धक्का

## आंदोलनाशी संबंधित प्रकरणात ठरवले दोषी

◆ **नवी दिल्ली, २५ मे**

महिला काँग्रेस अध्यक्षा अलका लांबा यांना राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या मागणीसाठी जंतर मंतर येथे झालेल्या आंदोलनाशी संबंधित प्रकरणात न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले आहे. अलका लांबा यांच्या शिक्षेची सुनावणी ५ जून रोजी राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात होणार आहे. जुलै २०२४ मध्ये, अलका लांबा यांच्या नेतृत्वात महिला काँग्रेसने जंतर मंतर येथे आंदोलन केले होते.

मागील सुनावणीत न्यायालयाने काँग्रेस नेत्या लांबांवर फौजदारी आरोप निश्चित केले होते. राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने म्हटले होते की, अलका लांबा यांच्या विरोधात प्रथमदर्शनी गुन्हा सिद्ध झाला आहे. त्यांच्यावर सरकारी कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे, कामात अडथळा आणणे, कायदेशीर आदेशाचे उल्लंघन करणे आणि सार्वजनिक मार्गात अडथळा आणणे असे आरोप होते. ◀(वृत्तसंस्था)




कुकी बंडखोरांनी १३ मे रोजी मणिपूरमधील सेनापती आणि कांग्पोकेपी जिल्ह्यातील कुकी दहशतवाद्यांनी ३८ नागरिकांचे अपहरण केले. या नागरिकांची सुटका करावी, या मागणीसाठी सोमवारी नागरिकांनी काढलेला मोर्चा

# बांगलादेशात ट्रक अपघात, १५ जण ठार

◆ **ढाका, २५ मे**

बांगलादेशात एका प्रमुख महामार्गावर सोमवारी पहाटे लोखंडी सळ्यांनी भरलेला ट्रक उलटल्याने १५ जण ठार तर १० लोक जखमी झाले. ईद-उल-अझहाच्या सुट्टीसाठी लोक आपापल्या गावी जात असताना हा भीषण अपघात घडला.

स्थानिक अग्निशमन दलाचे प्रभारी अताउर रहमान यांनी सांगितले की, ट्रकमध्ये लोखंडी सळ्यांसोबत काही प्रवासीही होते. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक उलटला. ट्रक आग्नेय बंदर शहर चित्तगांव येथून वायव्य भागाकडे जात होता. ईदच्या गर्दीमुळे पीडितांनी वाटेतील वेगवेगळ्या ठिकाणांहून लोकांनी ट्रकमध्ये प्रवेश केला असण्याची शक्यता आहे. बांगलादेशमध्ये सोमवारी १० दिवसांची ईद-उल-अझहाची सुट्टी सुरू झाली. सणासाठी लोक घरी जात असल्याने बस, ट्रेन आणि बोटी खचाखच भरल्या आहेत. गरीब लोक अनेकदा कमी खर्चामुळे किंवा त्यांना नियमित प्रवासी वाहनांमध्ये तिकीट मिळत नसल्यामुळे ट्रकने प्रवास करतात. ◀(वृत्तसंस्था)

# एनआयएची दारुल उलूमवर छापेमारी

◆ **श्रीनगर, २५ मे**

राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने सोमवारी जम्मू-काश्मिरातील श्रीनगर आणि शोपियाँ जिल्ह्यांतील तीन ठिकाणी छापेमारी केली. यात मागील महिन्यात बेकायदेशीर संस्था म्हणून घोषित करण्यात आलेल्या दारुल उलून सिराजूल उलूमचाही समावेश होता.




एनआयएच्या अधिकाऱ्यांनी शोपियाँच्या इमाम साहिब परिसरातील एका शाळेत पहाटे छापेमारी केली, असे अधिकाऱ्याने सांगितले.

ही संस्था विद्यार्थ्यांना धार्मिक आणि औपचारिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण देते, असे त्यांनी सांगितले. प्रतिबंधित दारुल उलूमचा प्रमुख शाहजादा औरंगजेब याच्या जिल्ह्यातील मोलू चित्रगाम येथील घरावर छापेमारी केली. तपास यंत्रणेने श्रीनगरच्या लाल बाजार परिसरातील मुलींसाठीच्या जमीयत उल बनात या धार्मिक शाळेतही झडती घेतली. ◀(वृत्तसंस्था)

# अद्रमुक पक्षात राजकीय भूकंप

### तीन बंडखोर आमदारांचा राजीनामा

◆ **चेन्नई, २५ मे**

तामिळनाडूतील एआयएडीएमकेत राजकीय भूकंप झाला आहे. पक्षाच्या तीन बंडखोर आमदारांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. ते सी.व्ही. षण्मुगम आणि एस.पी. वेलुमणी यांच्या नेतृत्वातील बंडखोर गटाचा भाग होते. सोमवारी, त्यांनी तामिळनाडू विधानसभेचे अध्यक्ष जे.सी.डी. प्रभाकर यांची भेट घेऊन आपले राजीनामे सादर केले. यात आमदार मार्गथम कुमारवेल, सत्यभामा आणि जयकुमार यांचा समावेश आहे.

नुकत्याच पार पडलेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत या तिघांनीही एआयएडीएमकेच्या तिकिटावर विजय मिळवला होता. सरकार स्थापन करण्यासाठी या तिघांनी पक्षाचा व्हीप झुगारुन मुख्यमंत्री विजय यांना पाठींबा दिला होता. त्यामुळे त्यांनी सोमवारी सचिवालयात अध्यक्षांकडे राजीनामे सादर केल्यानंतर लगेचच टीव्हीकेचे मंत्री आधव अर्जुन यांना त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. दरम्यान, विधानसभा अध्यक्ष प्रभाकर यांनी त्यांचे राजीनामे स्वीकारले आहेत. हे तीन आमदार मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या पक्षात म्हणजेच तामिळनाडू वेत्री कळघम (टीव्हीके) मध्ये सामील होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

विधानसभेतील बहुमत चाचणीदरम्यान पक्षाच्या आदेशाचे उल्लंघन करून टीव्हीके सरकारच्या बाजूने मतदान करणाऱ्या २५ आमदारांमध्ये या तीन आमदारांचाही समावेश होता. त्यांच्या राजीनाम्यांमुळे आता राज्याच्या राजकारणात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

### आमदारांची संख्या ४७ वरून ४४ झाली

या आमदारांचे राजीनामे स्वीकारल्यामुळे राज्यातील चार विधानसभा जागांवर पोटनिवडणुका होणार आहेत. यामध्ये मदुरंतकम, धारापुरम आणि पेरुंदुराई, तसेच त्रिची पूर्व मतदारसंघाचा समावेश आहे. मुख्यमंत्री विजय यांनी दोन जागा जिंकल्यामुळे त्रिची पूर्व जागा रिक्त केली होती. या राजीनाम्यांमुळे एआयएडीएमकेच्या आमदारांची संख्या ४७ वरून ४४ झाली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# एनटीएने सीयूईटी-यूजी परीक्षा पुढे ढकलली

◆ **नवी दिल्ली, २५ मे**

राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) २८ मे रोजी होणारी क्यूट यूजी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षेची तारीख लवकरच जाहीर करणार असल्याचे एनटीएने म्हटले आहे.

एनटीएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, बकरी ईदच्या सुट्टीत झालेल्या बदलामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. सूचनेनुसार, २८ मे रोजी दोन्ही सत्रांमध्ये होणारी क्यूट यूजी २०२६ परीक्षा आता होणार नाही. उमेदवारांनी कोणत्याही अफवांकडे दुर्लक्ष करून केवळ अधिकृत संकेतस्थळावरील माहितीवर विश्वास ठेवावा. ही परीक्षा केंद्रीय विद्यापीठांसह अनेक प्रमुख संस्थांमधील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाते. परीक्षेसाठी १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे, परीक्षेच्या वेळापत्रकातील कोणत्याही बदलाचा परिणाम देशभरातील विद्यार्थी, विद्यापीठे आणि परीक्षा एजन्सींवर होणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# मान यांच्या वक्तव्यावरील याचिकेवर सुनावणीस नकार

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ● भटक्या श्वानप्रकरणी याचिका

◆ **नवी दिल्ली, २५ मे**

सर्वोच्च न्यायालयाने मोकाट कुत्र्यांना मारण्यासाठी मोकळीक दिली



असल्याचे पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी म्हटले होते, असा दावा करणाऱ्या एका याचिकेचा उल्लेख स्वीकारण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला.

जर मुख्यमंत्र्यांनी एखादे वक्तव्य केले, तर त्याचा अर्थ असा होतो की, आम्हाला आमदा आदेश बदलावा लागेल, असा प्रश्न न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनाने हा विषय उपस्थित करणाऱ्या वकिलांना विचारला.

मोकाट श्वानांच्या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या १९ मे रोजीच्या आदेशानंतर पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी कथितरीत्या असे विधान केले होते की, सर्वोच्च न्यायालयाने मोकाट श्वानांना मारण्यासाठी मोकळीक दिली आहे, असे वकिलांनी सांगितले. यामुद्यावर



तुम्ही पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयात जा, असे निरीक्षण नोंदवताना आम्ही तुमच्या याचिकेवर सुनावणी करणार नसल्याचे न्यायासनाने स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मोकाट श्वानांना ठार केले जात असल्याचा दावा वकिलांनी न्यायालयात केला. मोकाट श्वानांच्या संदर्भातील खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन होणे अनिवार्य आहे, असेही त्यांनी पुढे नमूद केले.

याचिका मागे घेण्याची परवानगी वकिलांनी मागितली, त्यावेळी अर्जदार पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयात जाऊ शकतात, असे नमूद केले. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अनुसरण करीत पंजाब सरकार उद्यापासून एक व्यापक मोहीम हाती घेणार आहे. याद्वारे लहान मुलांच्या आणि वाटसरूंच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या मोकाट व हिंसक कुत्र्यांचा बंदोबस्त केला जाईल, अशी पोस्ट मान यांनी मागील आठवड्यात 'एक्स'वर केली होती. ◀(वृत्तसंस्था)

# गुलमर्ग गोंडोलामध्ये बिघाड; ३०० पर्यटक हवेतच

◆ **श्रीनगर, २५ मे**

गुलमर्गमधील गुलमर्ग गोंडोलामध्ये सोमवार अचानक तांत्रिक बिघाड झाल्यामुळे केबल कार हवेतच अडकली आहे. त्यामुळे जवळपास ३०० पर्यटक हवेत वेगवेगळ्या केबिनमध्ये अडकले आहे. अग्निशमन आणि आपत्कालीन पथकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले आहे. हवेतच केबल कार सेवा थांबल्यामुळे गोंधळ उडाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोंडोला चालवत असताना त्यात अचानक तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे केबल कार पुढे जाऊ शकली नाही आणि प्रवासी हवेतच अडकले. घटनेनंतर लगेचच स्थानिक प्रशासन आणि अग्निशमन व आपत्कालीन सेवांच्या पथकांना घटनास्थळी बोलावण्यात आले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा तसेच स्थानिक प्रशासनाची पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. मदत आणि बचावकार्य वेगाने सुरू करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अडकलेल्या सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. स्थानिक प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. तांत्रिक समस्या सोडवण्यासाठी एक पथक काम करत आहे. यात कोणतीही व्यक्ती जखमी झाल्याचे वृत्त नाही, ही दिलासादायक बाब आहे. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# पाकिस्तानचे वर्तमान आणि भविष्य

इतिहासातून काहीही न शिकणाऱ्यांचे ऐतिहासिक नुकसान होत असते, असे म्हणतात. ते पाकिस्तानच्या बाबतीत खरे होईल की काय, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. कारण १९७१ च्या पुनरावृत्तीचे संकेत देणारी वर्तमान स्थिती तिथे निर्माण झाली आहे. १९४७ मध्ये एका धर्माच्या आधारावर निर्माण झालेल्या या देशाला स्वातंत्र्यानंतर लोकशाहीपेक्षा लष्करी राजवटींचा अत्यंत कडू अनुभव आला आहे. यासोबतच धार्मिक कट्टरता, राजकीय अस्थिरता, आर्थिक संकटे, दहशतवाद, प्रादेशिक असंतोष आणि सत्तेचे केंद्रीकरण या समस्यांनी पाकिस्तानला कायम आतून पोखरले आहे. १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तान वेगळा होऊन स्वतंत्र बांगलादेशची निर्मिती झाली तेव्हा तो पाकिस्तानच्या इतिहासातील सर्वांत खणखणीत धडा होता. त्यातून योग्य बोध घेण्यात मात्र पाकिस्तानचे नेतृत्व अपयशी ठरल्याचे सध्याच्या परिस्थितीकडे पाहताना जाणवत आहे. बलुचिस्तानातील वाढता हिंसाचार, सिंधमधील असंतोष आणि पंजाबमधील वाढती नाराजी या सर्व घटनांनी पाकिस्तानच्या राष्ट्रीय एकात्मतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहेत. त्यामुळे धुमसत असलेला पाकिस्तान कधीही नकळत पुन्हा फुटीच्या उंबरठ्यावर जाऊ शकतो यात काही दुमत नाही. भरीस भर म्हणजे अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध पुकारलेल्या युद्धामुळे स्थिती अधिकच बिकट झाली आहे. पाकिस्तानची आर्थिक परिस्थितीच खालावलेली नसून, तेथील राजकीय असंतोषालाही आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे तीक्ष्ण धार आल्याचे दिसून येत आहे. सध्या पाकिस्तानी नेतृत्वाचा कसोटीचा काळ असून, सद्य:स्थितीतून योग्य पद्धतीने मार्ग न काढल्यास यादवीसदृश स्थिती निर्माण होण्याची व बलुचिस्तानमध्ये रक्तरंजित संघर्ष पेटण्याची शक्यता आहे. शिवाय, सिंध आणि पंजाब प्रांतांमध्येही टोकाचा प्रांतवाद वाढण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पाकिस्तानचे सर्व प्रांत एका धाग्यात बांधून ठेवणे तेथील नेतृत्वाला अतिशय कठीण जाणार आहे.

अलिकडेच क्वेट्टा शहराजवळ रेल्वे मार्गावर झालेल्या भीषण स्फोटात दोन डझनाहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्याची जबाबदारी बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या सशस्त्र फुटीरतावादी संघटनेने स्वीकारली आहे. यापूर्वी जाफर एक्स्प्रेस रेल्वेचे अपहरण, शेकडो प्रवाशांना ओलिस धरल्याचा दावा आणि त्यानंतर झालेल्या रक्तरंजित संघर्षामुळे बलुचिस्तान पुन्हा जगभरात चर्चेत आला होता. या घटना केवळ दहशतवादी कारवाया तर आहेतच; शिवाय त्या पाकिस्तानात खोलवर रुजलेल्या प्रादेशिक असंतोषाचे प्रतीक आहेत. बलुचिस्तान हे पाकिस्तानच्या एकूण भूभागापैकी जवळपास निम्मे क्षेत्र व्यापणारे राज्य आहे. नैसर्गिक वायू, तांबे, सोने आणि इतर खनिज संपत्तीने समृद्ध असलेल्या या प्रदेशाला विकासाच्या बाबतीत मात्र सतत दुय्यम स्थान मिळाले अशी स्थानिकांची भावना आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांमध्ये मागासलेपण कायम राहिल्याने तेथील तरुणांमध्ये असंतोष वाढत गेला. त्यामुळे अनेक राष्ट्रवादी संघटनांनी स्वतंत्र बलुचिस्तानची मागणी उचलून धरली. परंतु, पाकिस्तानने त्याकडे पुरेसे लक्ष दिले नाही. म्हणून बीएलएसारख्या संघटनांनी तर सशस्त्र संघर्षाचा मार्ग स्वीकारला आहे. रेल्वे मार्ग, लष्करी तळ, सरकारी संस्था आणि चीनशी संबंधित प्रकल्पांवर होणारे हल्ले हे या संघर्षाचे वाढते स्वरूप दर्शविणारे आहे. बलुचिस्तानातील परिस्थिती पाकिस्तानसाठी अधिक धोकादायक ठरत आहे, कारण हा प्रदेश सामरिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्वादर बंदर आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर (सीपीईसी) यासारखे अब्जावधी डॉलर्सचे प्रकल्प याच भागात आहेत. चीनने पाकिस्तानच्या विकासासाठी केलेल्या मोठ्या गुंतवणुकीचे भविष्यही या प्रदेशाच्या स्थैर्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पाकिस्तानचे लष्कर येथील संघर्ष मोडून काढण्यासाठी कठोर कारवाया करीत आहे. इतिहासाचा अनुभव असा आहे की, सैनिकी शक्तीने जनतेचा रोष दाबता येत असला तरी तो संपवता येत नाही. सिंधमधील परिस्थितीही फारशी वेगळी नाही. पाकिस्तानची आर्थिक राजधानी कराची आणि देशाच्या महसुलात मोठे योगदान देणारा हा प्रांत गेल्या अनेक दशकांपासून केंद्र सरकारविरोधातील असंतोषाचा केंद्रबिंदू राहिला आहे. सिंधी राष्ट्रवादी संघटनांचा आरोप आहे की, सिंधमधील नैसर्गिक संसाधनांचा आणि आर्थिक उत्पन्नाचा लाभ स्थानिकांना पुरेशा प्रमाणात मिळत नाही. कराचीतील वांशिक संघर्ष, राजकीय हिंसा आणि वाढती आर्थिक विषमता यामुळे असंतोष अधिक गडद झाला आहे. आजही काही संघटना अधिक स्वायत्तता किंवा स्वतंत्र सिंधुदेशची मागणी करीत आहेत. आर्थिक आणि राजकीय संकट अधिक तीव्र झाल्यास या मागण्यांना अधिक बळ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पंजाब हा पाकिस्तानचा सर्वांत मोठा, प्रभावशाली आणि सत्तेचा केंद्रबिंदू असलेला भाग मानला जातो. लष्कर, नोकरशाही आणि राष्ट्रीय धोरणांमध्ये पंजाबी लोकांचे वर्चस्व असल्याचा आरोप इतर प्रांतांकडून केला जातो. त्यामुळे पंजाबमध्ये विभाजनवादी चळवळ नसली तरी तेथील बदलती राजकीय परिस्थिती पाकिस्तानसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या अटकेनंतर पंजाबमध्ये निर्माण झालेली जनभावना आणि लष्कराविरुद्ध व्यक्त झालेला रोष अभूतपूर्व असा होता. पाकिस्तानच्या इतिहासात प्रथमच पंजाबसारख्या प्रदेशात लष्करी व्यवस्थेबद्दल उघडपणे नाराजी व्यक्त झाल्याचे दिसले होते. पंजाबमधील जनतेचा विश्वास सत्ताव्यवस्थेवरून उडाला तर पाकिस्तानच्या एकात्मतेचा आधारस्तंभच कमकुवत होऊ शकतो, असे म्हणता येईल. या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी आर्थिक संकट हा महत्त्वाचा घटक आहे. पाकिस्तान आज अभूतपूर्व आर्थिक अडचणीतून जात आहे. परकीय कर्जाचा वाढता बोजा, महागाई, बेरोजगारी, घटणारी परकीय गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कठोर अटी यामुळे सामान्य नागरिकांचे जीवन फार संघर्षमय झाले आहे. आर्थिक संकटकाळात प्रादेशिक मुद्यांवरील असंतोष अधिक तीव्र होतो. विकासाचे लाभ समान पद्धतीने वाटले जात नाहीत तेव्हा उपेक्षित प्रदेशांमध्ये वेगळेपणाच्या भावना बळकट होतात. पाकिस्तानमध्ये आज नेमके हेच चित्र दिसत आहे.

याच संदर्भात १९७१ चा इतिहास पुन्हा आठवतो. पूर्व पाकिस्तानातील बंगाली जनतेच्या भाषक, सांस्कृतिक आणि राजकीय हक्कांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष करण्यात आले होते. आर्थिक संसाधनांचे असमान वाटप आणि राजकीय प्रतिनिधित्वाचा अभाव यामुळे असंतोष वाढत गेला होता. अखेरीस तो स्वतंत्र बांगलादेशच्या निर्मितीत परिवर्तित झाला होता. आज बलुचिस्तान आणि सिंधमध्ये व्यक्त होणाऱ्या तक्रारींचे स्वरूप काही प्रमाणात त्याच धर्तीचे असल्याचे अनेक अभ्यासकांचे मत आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या धोरणकर्त्यांनी या संकेतांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. पाकिस्तानचे लष्कर अजूनही प्रभावशाली आहे, हे खरे. तेथे नाममात्र कां असेना, प्रशासकीय यंत्रणा कार्यरत आहे. मात्र एवढ्याने संकट टळेल असे वाटत नाही. विभाजनवादी विचारांना बळ देणाऱ्या सर्व समस्या कायम आहेत आणि वाढतही आहेत. पाकिस्तान आज एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. बलुचिस्तानातील बंदुकांचा संघर्ष, सिंधमधील असंतोष, पंजाबमधील रोष, आर्थिक दिवाळखोरीची भीती आणि राजकीय संघर्ष या सर्व समस्या परस्परांशी जोडलेल्या आहेत. या प्रश्नांची उत्तरे केवळ लष्करी कारवायांमध्ये किंवा दडपशाहीत सापडणार नाहीत. प्रांतांना अधिक अधिकार, संसाधनांचे न्याय्य वाटप, स्थानिक लोकांना विकासात सहभाग आणि लोकशाही संस्थांचे बळकटीकरण या मार्गानेच दीर्घकालीन समाधान मिळू शकते. पण, तेवढी समज पाकिस्तानातील राज्यकर्त्यांना नाही आणि लोकही त्यांना तसा आग्रह करण्याची शक्यता नाही. पाकिस्तानने १९७१ मध्ये विभाजन अनुभवले. आता पुन्हा तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानकडे अजूनही सुधारण्याची संधी असली तरी ती किती काळ उपलब्ध राहील, हा खरा आणि निर्णायक प्रश्न आहे.

## आंतरराष्ट्रीय

# नव्या मध्यपूर्वेची निर्मिती?

**प्रा. जयसिंग यादव**

'हमास'ने ७ ऑक्टोबर २०२३ रोजी केलेल्या हल्ल्यानंतर इस्रायलने दिलेल्या प्रत्युत्तराने जगासाठी दोन गोष्टी स्पष्ट केल्या. पहिली म्हणजे इस्रायल आता 'प्रतिकारात्मक संरक्षण' या जुन्या चौकटीत विचार करत नाही आणि दुसरी म्हणजे इस्रायलने स्वतःच्या सुरक्षिततेची व्याख्याच बदलली आहे. आता त्यांच्यासाठी सीमा म्हणजे फक्त नकाशावरील रेषा राहिलेल्या नाहीत, तर संभाव्य धोक्यांपासून दूर ठेवलेले विस्तृत प्रभाव क्षेत्र बनले आहे. ही मानसिकता अचानक निर्माण झालेली नाही. तिची मुळे इस्रायलच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात आहेत. १९४८ मध्ये इस्रायलची स्थापना झाली आणि त्याच क्षणी अरब-इस्रायल संघर्षाची सुरुवात झाली. त्यानंतर १९६७ मधील सहा दिवसांचे युद्ध, १९७३ चे योम किप्पूर युद्ध, लेबनॉनमधील संघर्ष, पॅलेस्टिनी उठाव या सर्व घटनांनी इस्रायलच्या राष्ट्रीय मानसावर एक खोल परिणाम केला. 'आपण वेढलेलो आहोत' ही भावना इस्रायली समाजाच्या राजकीय विचारधारेचा केंद्रबिंदू बनली. याच भावनेतून 'सुरक्षा' हा शब्द इस्रायलमध्ये अत्यंत व्यापक अर्थाने वापरला जातो. इतर देशांसाठी सुरक्षा म्हणजे सीमांचे रक्षण; पण इस्रायलसाठी सुरक्षा म्हणजे संभाव्य शत्रूंची क्षमता नष्ट करणे. म्हणूनच गाझातील 'हमास' असो, लेबनॉनमधील 'हिजबुल्लाह' असो किंवा सीरियातील इराणसमर्थित गट; इस्रायल या फक्त शेजारील शक्ती मानत नाही, तर भविष्यातील अस्तित्वाला धोका मानतो. या पृष्ठभूमीवर 'ग्रेटर इस्रायल'कडे पाहिले, तर त्यामागे केवळ धार्मिक राष्ट्रवाद नाही, तर सुरक्षा, लोकसंख्या, पाणी, व्यापारमार्ग आणि भू-राजकीय प्रभाव यांचेही गणित आहे.

तपशिलात जाऊन पाहता, दक्षिण लेबनॉनमधील लितानी नदीचा परिसर हा केवळ लष्करीदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर जलस्रोतांच्या दृष्टीनेही संवेदनशील भाग आहे. गोलन टेकड्यांचे महत्त्वही असेच आहे. इस्रायलमध्ये दोन प्रवाह स्पष्ट दिसतात. एक, पॅलेस्टिनी प्रश्नाचे कायमस्वरूपी समाधान दोन स्वतंत्र राष्ट्रांच्या निर्मितीत आहे, तर दुसरा, अधिक आक्रमक प्रवाह मानतो की पॅलेस्टिनी राष्ट्राची कल्पनाच इस्रायलच्या सुरक्षेसाठी धोकादायक आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर दुसऱ्या प्रवाहाचा प्रभाव अधिक असल्याचे मानले जाते. वेस्ट बँकमध्ये वाढणाऱ्या ज्यू वसाहती हा त्याचाच भाग आहे. आंतरराष्ट्रीय समुदाय अनेक वर्षांपासून या वसाहतींना बेकायदेशीर मानतो; प्रत्यक्षात इस्रायलने त्या विस्तारण्याचे धोरण थांबवलेले नाही. रस्ते, सुरक्षा तळ, पायाभूत सुविधा, सैन्य संरक्षणाच्या माध्यमातून वेस्ट बँक हळूहळू इस्रायली प्रभावक्षेत्रात खोलवर समाविष्ट होत आहे. यामुळे इस्रायल प्रत्यक्षात 'दोन राष्ट्र समाधान' संपवण्याच्या दिशेने जात आहे का, असा प्रश्न पडतो.

आज आधीच गाझातील युद्धामुळे नव्या पिढीत संताप आणि असुरक्षितता वाढली आहे. उद्ध्वस्त घरे, विस्थापन, बेरोजगारी आणि सततचे युद्ध या परिस्थितीत शांततावादी विचार कमकुवत होतात आणि अतिरेकी संघटनांना समर्थन वाढते. याचा दुसरा परिणाम अरब जगतात दिसू शकतो. काही वर्षांपूर्वी अब्राहम करारांमुळे इस्रायल आणि काही अरब राष्ट्रांमधील संबंध सुधारू लागले होते. संयुक्त अरब अमिराती, बहरीन, मोरोक्को यांनी इस्रायलशी संबंध प्रस्थापित केले. सौदी अरेबियासोबतही संवाद सुरू होता; पण गाझामधील युद्धानंतर ही संपूर्ण प्रक्रियाच धोक्यात आली. या संपूर्ण घडामोडीत आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे इराण. इराण स्वतःला पॅलेस्टिनी प्रश्नाचा सर्वांत मोठा समर्थक म्हणून सादर करतो. 'हिजबुल्लाह', 'हमास' आणि इतर शिया-सुन्नी गटांना मिळणारा त्यांचा पाठिंबा हा केवळ धार्मिक नाही, तर इस्रायलविरोधी प्रादेशिक रणनीतीचा भाग आहे. इस्रायलने शेजारील भागांमध्ये कायमस्वरूपी प्रभाव वाढवल्यास इराण अधिक आक्रमक प्रतिसाद देऊ शकतो. त्यामुळे मध्यपूर्वेत थेट प्रादेशिक युद्धाचा धोका वाढतो.

'ग्रेटर इस्रायल' या चर्चेचा एक मानवी पैलूही आहे, जो अनेकदा दुर्लक्षित राहतो. युद्धाच्या नकाशांमध्ये दिसणारे भूभाग हे प्रत्यक्षात लाखो लोकांचे जीवन असते. गाझामधील उद्ध्वस्त शहरे, लेबनॉनमधील विस्थापित कुटुंबे, सीरियातील अस्थिरता या सगळ्यांच्या केंद्रस्थानी सामान्य नागरिक आहेत. प्रत्येक लष्करी कारवाई नवीन जखमा निर्माण करते आणि त्या जखमा पुढच्या संघर्षांचे कारण बनतात. इतिहास सांगतो की लष्करी विजय कायमस्वरूपी राजकीय समाधान देत नाहीत. अमेरिकेने अफगाणिस्तान आणि इराकमध्ये हे अनुभवले. रशियाला युक्रेनमध्ये त्याचा अनुभव येत आहे आणि इस्रायललाही कदाचित हे वास्तव स्वीकारावे लागेल की केवळ शक्तीच्या आधारे दीर्घकालीन शांतता निर्माण होत नाही. या ठिकाणी आंतरराष्ट्रीय समुदायाची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. संयुकक्त राष्ट्रसंघ, अमेरिका, युरोपीय देश आणि अरब राष्ट्रांनी केवळ तात्पुरत्या युद्धविरामांवर भर दिला, तर परिस्थिती पुन्हा पुन्हा भडकत राहील. खरे आव्हान म्हणजे असा राजकीय आराखडा तयार करणे, ज्यात इस्रायलची सुरक्षा आणि पॅलेस्टिनींचे स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी एकत्र शक्य होतील; पण आजचे वास्तव पाहता, तो मार्ग अधिक कठीण होत चालला आहे. इस्रायलला वाटते की पॅलेस्टिनी गट त्यांचे अस्तित्वच नाकारतात, तर पॅलेस्टिनींना वाटते की इस्रायल त्यांची भूमी आणि ओळख हळूहळू संपवत आहे. म्हणून 'ग्रेटर इस्रायल' हा केवळ एक राजकीय शब्द नाही. तर मध्यपूर्वेतील भविष्यातील संघर्ष, राष्ट्रवाद, धार्मिक ओळख, सामरिक विस्तार आणि मानवी वेदना यांचा गुंतागुंतीचा संगम आहे.

आज इस्रायल अंगीकारत असलेली दिशा त्या देशाला अल्पकालीन सुरक्षा देऊ शकते; पण दीर्घकालीन स्थैर्य मिळवून देईल का, हा खरा प्रश्न आहे. कारण शेवटी कोणतेही राष्ट्र फक्त भिंती, सीमा आणि सैन्य यांच्या आधारावर टिकत नाही. त्याला शेजाऱ्यांसोबत सहअस्तित्वाची राजकीय इच्छाशक्तीही लागते आणि मध्यपूर्वेत आज पाहायला मिळणारी सर्वाधिक दुर्मिळ गोष्ट म्हणजे परस्पर विश्वास. 'ग्रेटर इस्रायल' म्हणजे नेमके काय, याबाबत अनेक व्याख्या आहेत. काही ज्यू राष्ट्रवादी गटांच्या मते, बायबलमध्ये वर्णन केलेल्या ऐतिहासिक भूमीपर्यंत इस्रायलचा प्रभाव आणि नियंत्रण वाढले पाहिजे. यात सध्याच्या इस्रायलव्यतिरिक्त वेस्ट बँक, गाझा, दक्षिण लेबनॉन, गोलन टेकड्या आणि काही अतिरेकी विचारांनुसार जॉर्डनपर्यंतचा भूभाग समाविष्ट होतो. अर्थात, इस्रायलचे अधिकृत धोरण म्हणून ही भूमिका स्पष्टपणे स्वीकारलेली नाही; पण गेल्या काही वर्षांमधील राजकीय वक्तव्ये, वाढते ज्यू वसाहतीकरण आणि शेजारी देशांमधील लष्करी हस्तक्षेप यामुळे या संकल्पनेला नव्याने बळ मिळताना दिसते. काही नेत्यांनी तर दक्षिण लेबनॉनमधील लितानी नदीपर्यंत इस्रायलची सुरक्षा सीमा असावी, अशी मागणी केली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघासह अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांनी परिस्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली; परंतु इस्रायलने 'राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न' म्हणत या कारवायांचे समर्थन केले. या युद्धात इस्रायलने गाझाच्या सीमेलगत विस्तृत बफर झोन निर्माण केला. या कृतीमुळे इस्रायल केवळ 'हमास'चा नायनाट करू इच्छितो, की गाझाच्या भूगोलातच कायमस्वरूपी बदल घडवू पाहतो, असा प्रश्न निर्माण झाला. 'हिजबुल्लाह' आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष हा अनेक दशकांपासून सुरू आहे; मात्र २०२३ नंतर या संघर्षाची तीव्रता अधिक वाढली. इस्रायली सैन्याने सीमापार कारवाया वाढवल्या आणि अनेक किलोमीटर आतपर्यंत लष्करी उपस्थिती निर्माण केली. इस्रायल याला 'सुरक्षा पट्टा' म्हणत असला, तरी अरब देश आणि विश्लेषकांच्या मते हे दीर्घकालीन नियंत्रणाचे संकेत आहेत. सीरियामध्ये अस्थिरतेचा फायदा इस्रायल घेत असल्याचा आरोप होतो. बशहर-अल-आसाद यांच्या सरकारची पकड कमकुवत झाल्यानंतर इस्रायलने गोलन टेकड्यांपलीकडे आपली कारवाई वाढवली. इस्रायलचा दावा असा की इराणसमर्थित गट व शस्त्रसाठे रोखण्यासाठी हे आवश्यक आहे; परंतु 'सुरक्षा' या नावाखाली इस्रायल आपल्या प्रभाव क्षेत्राचा विस्तार तर करत नाही ना, असा प्रश्न उपस्थित होतो. 'ग्रेटर इस्रायल' ही संकल्पना कट्टर राष्ट्रवादी घोषणांपुरती राहिलेली नाही, तर प्रत्यक्ष धोरणात्मक शक्यता वाटू लागली आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# जैसे ज्याचे कर्म तैसे...

**चंद्रकांत लोहाणा**

केलेल्या प्रत्येक कर्माचे फळ भोगावेच लागते, हा निसर्गाचा अलिखित नियम आहे. वाट्याला येणारा हा भोग कधी चेहऱ्यावर हास्य फुलवितो तर कधी डोळ्यांमधून अश्रूच्या धाराही गाळतो. अशीच काहीशी परिस्थिती सध्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची झाली आहे. भाजपच्या पाठीत खंजीर खुपसून केलेल्या विश्वासघाताची फळे आता उबाठाला चाखायला मिळत आहेत. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईने या पक्षाला काही काळापुरते तारले असले तरी शेवटी धुरा सांभाळणारा चालक निष्णात असावा लागतो. संघटन आणि कार्यकर्ता घडविण्यासाठी रक्ताचे पाणी करून जमिनीवर उतरावे लागते. चार भिंतीच्या आड स्वत:ला कोंडून राजकारण करण्याचे ते दिवस आता गेले. सामान्य जनतेची नस न ओळखल्याने काँग्रेसची जी गत झाली, तीच स्थिती आता उबाठाची होऊ लागली आहे. नेमक्या याच कमतरतेमुळे उबाठाला घरघर लागली. पक्ष फुटला, चाळीस आमदारांना आपल्या सोबत घेत एकनाथ शिंदे यांनी मूळ शिवसेना पक्ष आपल्या ताब्यात घेतला. तेव्हापासून पक्षाला लागलेली गळती, अंतर्गत कलह आणि नेतृत्वाच्या अभावामुळे हा पक्ष कायमचा रसातळाला जाईल की, काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

एकेकाळी राज्याच्या सत्ताकेंद्रामध्ये सत्ता उपभोगत रिमोट कंट्रोल आपल्या हाती ठेवणारे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे राज्याच्या राजकारणातूनच बाहेर फेकले गेले आहेत की काय असे वाटते. मागील विधानसभा निवडणुकीमध्ये त्या पक्षाचे फक्त २० आमदार निवडून आले. स्व. बाळासाहेब ठाकरे हयात असताना त्याना कधीच सत्तेचा मोह झाला नाही. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाची धुरा कार्यकर्त्यांना देऊन एक वेगळा पायंडा पाडला आणि स्वतः हिंदुत्वाची मशाल कायम धगधगत ठेवून शिवसेनेला राज्यामध्ये घराघरात पोहोचविण्याचे कार्य केले. मात्र, बाळासाहेबांचे समर्पण, त्याग आणि हिंदुत्वाला तिलांजली देत उद्धव ठाकरे यांनी त्यास कायमची सोडचिठ्ठी दिली. रोज भाजपला शिव्या घालून मतदारांच्या मनामध्ये पक्षप्रेम रुजविता येत नाही, हे सांगण्यासाठीही आज उद्धव ठाकरे यांच्याकडे माणसे शिल्लक नाहीत. हाती सत्ता नसली की, पक्ष बेफाम होतो तीच अवस्था सध्या उबाठाची झाली आहे. उबाठाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते दुसऱ्या पक्षाचा झेंडा आपल्या हाती घेताना दिसून येत आहे. वाशीममध्ये दिवसरात्र एक करून सुरेश मापारी यांनी उबाठाला जिल्ह्यामध्ये जिवंत ठेवले होते. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही श्रेय मिळत नसल्याचे बघून मापारी यांनी आपल्या शेकडो समर्थकासह भाजपला जवळ केले. मराठवाडा आणि कोकणातही उबाठामध्ये अंतर्गत नाराजीने कळस गाठला असून, ती कधी उफाळून येईल याचा नेम नाही. सलग पाचवेळा खासदार म्हणून निवडून येणाऱ्या भावना गवळी यांनाही जो पक्ष सांभाळू शकला नाही, त्या पक्षाच्या भविष्याबद्दल काय बोलावे? ज्यावेळी शरद पवारांनी सापळा रचून उद्धव ठाकरे यांना आपल्या जाळ्यात ओढले त्याचवेळी उद्धव ठाकरे यांचे भविष्य ठरले होते. सत्तेच्या मोहापायी मूळ विचारांना तिलांजली देणे हे राज्यामधील जनतेच्या पचनी पडले नाही. त्यानंतर कार्यकर्त्यांची उपेक्षा आणि गटबाजीने उबाठा त्रस्त झाली. एखादा प्रादेशिक पक्ष म्हटला की, त्यास बऱ्याच मर्यादाही असतात. राज्यातील जनतेच्या आकांक्षाना खरे उतरले तरच प्रादेशिक पक्षांना पाय पसरायला संधी मिळते.



बाळासाहेब ठाकरेंनंतर उद्धव ठाकरे कोणत्याच कसोटीवर खरे उतरले नाही. त्यामुळे युती तोडणे हे त्यांच्यासाठी आत्मघातकी पाऊल ठरले. आपल्या क्षमतांची मर्यादा ओळखून जर वाट चोखाळली असती तर आज राज्यामध्ये वेगळे चित्र बघायला मिळाले असते. अथक परिश्रम, विचाराची स्पष्टता आणि आपल्या ध्येयधोरणांशी निष्ठा असल्याने भाजपने जवळपास अख्खा देश पादाक्रांत केला आहे. पश्चिम बंगाल हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. त्यामुळे आज राजकारणी भाजप प्रवेशासाठी रांगेत उभे आहेत. काही वर्षांपूर्वी आपले फक्त दोनच खासदार निवडून आले म्हणून भाजपने हार न मानता मार्गक्रमण सुरू ठेवले. आपल्या ध्येयधोरणांमध्ये असलेली नैतिकता ही भाजपची आयुष्यभराची शिदोरी आहे. त्यामुळेच जनतेच्या कसोटीवरही हा पक्ष खरा उतरला आहे, हे उबाठाला ज्यावेळी कळेल तोवर कदाचित वेळ निघून गेलेली असेल.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

# उन्हाच्या झळा : कंपन्यांचा जिव्हाळा

**दत्तात्रेय आंबुलकर**

एप्रिल, मे आणि जून या उन्हाळ्याच्या कालावधीत वाढत्या गरमीपोटी उष्णता व उष्णतेची लाटसदृश स्थिती ही गेल्या काही वर्षांपासून तशी नित्याची बाब समजली जाते. यातूनच सर्व जण 'नेमेचि मग येतो उन्हाळा' असा रखरखीत अनुभव घेत असतात. जागतिक हवामानतज्ज्ञांच्या अभ्यासानुसार, २०२५ या वर्षीचा उन्हाळा जागतिकसंदर्भात सर्वाधिक उष्ण म्हणून नोंदविण्यात आला होता. अशा वेळी विविध कंपन्या-कार्यालयांमध्ये, विशेषतः प्रवास करणाऱ्या वा कार्यालयाबाहेर राहून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वेगळीच कसोटी असते. उन्हाळी गरमीच्या वार्षिक समस्येवर मात करण्यासाठी कंपनी व्यवस्थापन व व्यवस्थापक पण विशेष स्वरूपात प्रयत्न करीत असतात.

या संदर्भात मुळात देशांतर्गत भर उन्हाळ्यात निवडक ठिकाणी असणारे तापमान व त्यातील चढ-उतार समजून घेणेही तितकेच आवश्यक आहे. या संदर्भात या वेळच्या उन्हाळ्याच्या पहिल्या टप्प्यात म्हणजेच, एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात राष्ट्रीय स्तरावरील तापमान सरासरी स्वरूपात ४० ते ४६ टक्के होते. त्यातही उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यात एप्रिलच्या शेवटी ४७.६ टक्के सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली असून, आगामी दोन महिन्यांच्या दरम्यान देशातील ऊन आणि उन्हाळा यांची स्थिती विविध प्रदेशांत सर्वसाधारणपणे अशाच स्वरूपाची राहील, असा अंदाज केंद्र सरकारच्या हवामान खात्यातील विषयतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. हवामानशास्त्र क्षेत्रातील याच जाणकारांनी हवामान-तापमानाच्या संदर्भात प्रभाव टाकणाऱ्या व प्रचलित अशा 'अल-निनो'चा या संदर्भात विशेष अभ्यास केला. या अभ्यासानुसार, सर्वसाधारणपणे 'अल-निनो'चा प्रादुर्भाव व प्रभाव उन्हाळ्यात सागरी क्षेत्रातील तापमान मर्यादेबाहेर वाढल्यामुळे होतो. यावर्षी 'अल-निनो'चा पर्यावरणीय प्रभाव अधिक राहण्याचे अनुमान अभ्यासकांनी काढले आहे.

'अल-निनो'चा प्रभाव व परिणाम वातावरणासह उन्हाच्या तीव्रतेपासून पावसाच्या प्रमाणापर्यंत होत असतो, असे अभ्यासांति सिद्ध झाले आहे. भारताच्या संदर्भात 'अल-निनो'चा मोठ्या प्रमाणावर होणारा परिणाम म्हणजे, अतिवृष्टी व मोठ्या प्रमाणावरील उष्णतेची लाट, अशा दोन्ही प्रकारच्या अतिरेकी स्वरूपात दिसून येतो. यावर्षी पण उर्वरित उन्हाळ्यात सूर्याच्या तापाच्या जोडीलाच उष्णतेच्या लाटांच्या प्रतापाला भारताला सामोरे जाण्याचा अभ्यासपूर्ण इशारा देण्यात आल्याने साऱ्यांच्याच काळजीत स्वाभाविकपणे भर पडली आहे. या वर्षीच्या उन्हाळ्याच्या तीव्रतेच्या पृष्ठभूमीवर अनेक ठिकाणी कंपन्यांनी पुढाकार घेतल्याचे प्रामुख्याने दिसून येते. यासाठी कंपन्यांनी चाकोरीबद्ध प्रयत्न न करता, विविध प्रकारे पुढाकार घेतल्याचे प्रामुख्याने दिसून येते. यामध्ये व्यावसायिक गरजा लक्षात घेतानाच, कामांच्या प्राथमिकतेमध्ये लवचीकपणे बदल करणे, उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन कामाची प्रक्रिया व ठिकाणांमध्ये बदल करणे, गरमीचे स्वरूप लक्षात घेऊन कामाच्या तासांची फेररचना करणे इत्यादीचा समावेश केला आहे, तर केवळ कार्यालयीन स्वरूपाचे व्यावसायिक काम करणाऱ्यांसाठी व्यावसायिक आवश्यकता व कर्मचाऱ्यांच्या गरजांचा समन्वय साधून यापूर्वीच विविध कारणांनी प्रस्थापित अशा घरून काम करण्याची सुलभ मुभा पुन्हा प्रदान केली आहे.



यासंदर्भात विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, 'मर्सिडीज बेंझ', 'नो ब्रोकर डॉट कॉम', 'सॅव्हिलिस इंडिया' यासारख्या कंपन्यांनी तीव्र उन्हापासून कर्मचाऱ्यांना होणारा त्रास कमी व्हावा, यादृष्टीने व्यापक प्रमाणावर घरून काम करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन दिले असून, त्याला कर्मचाऱ्यांकडूनसुद्धा चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'ई-कॉम' क्षेत्रातील आघाडीवरील अशा 'इटर्नल' ग्रुपसारख्या कंपन्या भरउन्हाळ्यात भटकंतीसह काम करणाऱ्या आपल्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या विक्री केंद्रस्थानी थंड पाण्याची मोठ्या प्रमाणात सोय करण्याशिवाय कूलर्सची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय, त्यांच्या कर्मचाऱ्यांना उन्हात फिरताना सहजपणे उपयोगी पडतील अशी ग्लुकोजसह पिण्याच्या पाण्याची पाकिटे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिली आहेत. बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम करणाऱ्या कर्मचारी-कामगारांसाठी त्यांच्या आवश्यकतेनुसार, ताक देण्याचा उपक्रम काही बांधकाम-प्रकल्प व्यवस्थापन कंपन्यांनी सुरू केला आहे, हे विशेष! कर्मचारी निवड व्यवस्थापन क्षेत्रात काम करणाऱ्या 'सीआयईएन-एचआर' कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य मिश्रा यांच्यानुसार, उन्हाची वाढती तीव्रता व त्यामुळे कर्मचाऱ्यांना होणारा अथवा होऊ शकणारा त्रास लक्षात घेता, काही कंपन्यांनी त्यांच्या कामाचे फेरनियोजन करून कंपनीचे काम व्हावे व कर्मचाऱ्यांना उन्हाची झळ बसू नये, यासाठी कर्मचाऱ्यांच्या कामाचे निश्चित-निर्धारित व प्रसंगी लवचीक अशा पद्धतीने नियोजन केले असून, हा प्रयोग उभयपक्षी परिणामकारकरीत्या फायदेशीर ठरला आहे. मालाची वाहतूक, ने-आण व प्रत्यक्ष थेट विक्री करणाऱ्या कर्मचाऱ्यांना उन्हामुळे येणारा थकवा व त्रास आटोक्यात आणण्यासाठी विशेषत: 'ई-कॉमर्स'सह 'लॉजिस्टिक' कंपन्यांनी आपल्या विक्री केंद्र, मालवाहतूक करणारी वाहने व भरउन्हात विशेषत: थेट विक्री करणाऱ्या कामगारांच्या संख्येत वाढ केली आहे. यामुळे अशा कर्मचाऱ्यांच्या प्रवासाच्या अंतरामध्ये घट होऊन त्यांचा अप्रत्यक्षपणे ऊन आणि उन्हाळ्यापासून बचाव होऊ लागला आहे.

उन्हाची ही काहिली जूनपर्यंत सुरू राहणार असल्याच्या भारतीय हवामान खात्याच्या नव्या अंदाजानुसार, कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात उन्हामुळे होऊ शकणाऱ्या उष्माघात वा तत्सम आजारांवर प्रतिबंधात्मक नियंत्रण ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांमध्ये संवाद व प्रशिक्षणासह जागृती निर्माण करण्यावर भर दिला आहे. यामध्ये आगामी महिन्यात कर्मचाऱ्यांनी घ्यावयाच्या विशेष काळजीअंतर्गत त्यांचे खानपान, उन्हात फिरताना व काम करताना घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन करण्यात येत आहे. याच्याच जोडीला कर्मचाऱ्यांनी प्रदीर्घ तास काम करू नये, शक्यतो सावलीचा वापर करावा, पेयपानाच्या वेळा पाळाव्यात इ. बाबींचे कटाक्षाने पालन करण्यात येत असून, त्यातून भरउन्हाळ्यात कंपनी-व्यवस्थापनाला कर्मचाऱ्यांप्रति असणारा जिव्हाळाच दिसून येतो.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### वाढता वाढता वाढे...तापमान...!

दिवसेंदिवस सूर्य आग ओकत आहे आणि तापमान वाढत आहे. काही वर्षांपूर्वी ४० अंश हे सर्वोच्च तापमान होते. आता तेच तापमान ४६ अंशांपर्यंत गेले आहे. गेल्या काही वर्षांपासून सगळ्याच शहरात एकल घरे पाडून तिथे उंच इमारती निर्माण होत आहेत. या बहुमजली इमारती बांधताना त्या परिसरातील मोठी झाडे व्यत्यय आल्याने तोडली जातात. वृक्ष लावणे, त्याचे रक्षण करणे तर दूरच; जी आहेत ती तोडली जात आहेत. सगळीकडे सिमेंट, काँक्रीटने विकास साधला जात आहे. जंगले नाहीशी होत आहेत. घरोघरी आणि कार्यालयात लागलेले वातानुकूलित यंत्र मोठ्या प्रमाणावर उष्णता निर्माण करत आहे आणि या सर्वांचा परिणाम तापमान वाढीत होत आहे. घरोघरी असणारी वाहने, पेट्रोल, डिझेल, कोळशाचा अमर्याद वापर केल्याने हवेत विषारी व उष्णता वाढणारे वायू निर्माण होत आहेत. खरोखरच निसर्ग आपल्याच करणीचे फळ आपल्याच ओंजळीत टाकत आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### फॅशनचे वेड ठीक; पण संस्कृतीही जपावी...

आजकाल तर प्रत्येक जण आपली स्टाईल व्यक्त करण्यासाठी वेगवेगळ्या फॅशन ट्रेंड्सचा अवलंब करत आहे. कपड्यांपासून ज्वेलरी, स्टायलिश जॅकेट्स, फुटवेअर आणि ॲक्सेसरीजपर्यंत. फॅशन ही केवळ परिधानांचा विषय नाही, तर ती स्वतःची ओळख, भावना आणि व्यक्तिमत्त्व व्यक्त करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक व्यक्ती आपली शैली वापरून अनोखी ओळख तयार करू शकतो, त्यामुळे आत्मविश्वास आणि सृजनशीलता वाढते. मात्र, आपली परंपरा आणि संस्कृती विसरता कामा नये. फॅशन म्हणजे बाह्यरूपाला आकर्षक बनवण्याची कला; ती केवळ कपडे किंवा स्टाईलपुरती मर्यादित नसते, तर व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास आणते. संस्कृती म्हणजे आपली भाषा, परंपरा, कला, सण-उत्सव, वेशभूषा, मूल्ये ही आपली खरी ओळख आहे. आधुनिक ट्रेंड स्वीकारताना पारंपरिक सौंदर्य आणि संस्कृतीची जोड दिली, तर व्यक्तिमत्त्व अधिक खुलते. उदा. भारतीय पारंपरिक पेहराव आधुनिक डिझाईन सोबत जुळवला तर फॅशनेबल दिसतो. संस्कृती जपणे म्हणजे आपल्या परंपरा, मूल्ये आणि सांस्कृतिक वारसा जपणे. जर आपण ही संस्कृती जपली नाही, तर ती केवळ फॅशन किंवा दिखावा म्हणून बघितली जाऊ शकते. फॅशन ही केवळ कपड्यांची स्टाईल नसून ती एक ओळख, आत्मविश्वास आणि अभिव्यक्ती असते. साडी, कुर्ता, पंजाबी, फेटा, नथ, पैठणी यासारख्या पोशाखांना आधुनिक टच दिला तरीही ते आपले वैशिष्ट्य टिकवून ठेवतात. फॅशन म्हणजे फक्त पाश्चात्य कपडे नव्हेत; ती परंपरागत पोशाखांनाही नव्या रूपात मांडण्याची कला आहे. यामुळे आपण जगासमोर आधुनिकतेसोबतच आपल्या संस्कृतीची श्रीमंतीही दाखवू शकतो. फॅशनची धुंदी असावी, पण संस्कृतीची जाणीव कायम असावी.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### युगपुरुष स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक तेजस्वी, प्रखर आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. २८ मे हा दिवस त्यांचा जन्मदिन, जो संपूर्ण भारतात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती म्हणून मोठ्या अभिमानाने साजरा केला जातो. त्यांच्या कार्याचे स्वरूप अत्यंत व्यापक आहे. सावरकर केवळ एक क्रांतिकारक नव्हते, तर ते एक महान विचारवंत, लेखक, कवी, इतिहासकार आणि समाजसुधारकही होते. सावरकरांच्या जीवनाचे सर्वांत मोठे ध्येय पूर्ण स्वातंत्र्य हे होते. त्यांनी लंडनमध्ये असताना अभिनव भारत या क्रांतिकारी संघटनेची स्थापना केली. १८५७ च्या उठावाला त्यांनी भारताचे पहिले स्वातंत्र्यसमर असे संबोधले आणि त्या काळातील ब्रिटिशांच्या इतिहासाला खोडून काढत भारतीयांमध्ये क्रांतीची ठिणगी टाकली. त्यांची लेखणी ही तलवारीसारखीच धारदार होती. सावरकरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगताना अंदमानच्या कोठडीत खूप हाल सोसले तरीही त्यांची स्वातंत्र्य मिळविण्याची जिद्द कमी झाली नाही. त्या काळात ज्या भिंतींवर त्यांनी आपल्या नखांनी स्वातंत्र्यवीरतेचा इतिहास कोरला, त्या आजही त्यांच्या त्यागाची साक्ष देतात. त्यांनी कविता, नाटके, कादंबऱ्या आणि आत्मचरित्रात्मक लेखनातून राष्ट्रभक्तीची भावना जागृत ठेवली. ने मजसी ने परत मातृभूमीला हे त्यांचे गाणे आजही प्रत्येक भारतीयाच्या अंगावर रोमांच उभे करते.

सावरकर हे विज्ञानाची कास धरणारे विचारवंत होते. त्यांनी अंधश्रद्धा दूर करून आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी प्रबोधन केले. सावरकर जयंतीच्या निमित्ताने आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, स्वातंत्र्य मिळवणे जितके कठीण होते, तितकेच ते टिकवणे आणि देश बलवान करणे महत्त्वाचे आहे. सावरकरांचे देशभक्ती आणि आत्मनिर्भरता हे विचार आजच्या पिढीसाठी सदैव प्रेरणादायी आहेत. थोर क्रांतिकारकाला, मातृभूमीच्या या महान पुत्राला विनम्र अभिवादन!

**वर्षा आवदे**/नागपूर

## महत्वाचे...

### स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त सांगोल्यात विविध कार्यक्रम

**सांगोला, दि. २५ मे -**



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्सव समिती यांच्यावतीने डॉक्टर डबीर चौक, देशपांडे गल्ली, सांगोला येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये बुधवार दि.२७ मे रोजी स्वरध्यास संगीत विद्यालय प्रस्तुत स्वरसंध्या हा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तसेच गुरुवार दि.२८ मे रोजी स.९ वा. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात येणार आहे. संध्या.६ वा. डी.जी.देशपांडे यांचे स्वातंत्र्यवीर सावरकर विचार कार्य आणि प्रेरणा या विषयावर व्याख्यान व समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार होणार आहे. स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. कार्यक्रमास देशभक्त नागरिकांनी, श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्सव समितीतर्फे केले आहे.

### 'गांधी नाथा रंगजी'चा अथर्व जाधव राज्य एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत केंद्रात प्रथम

**सोलापूर, दि. २५ मे-**



गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जन मंगल प्रतिष्ठान संचालित गांधी नाथा रंगजी मराठी माध्यम प्राथमिक विभाग येथील विद्यार्थ्यांनी एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. यात अथर्व जाधवने राज्यात सातवा, जिल्ह्यात चौथा व केंद्रात पहिला क्रमांक मिळविला. सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी व शिक्षकांनी अभिनंदन केले.

**यशस्वी विद्यार्थी (कंसात राज्य, जिल्हा व केंद्रातील क्रमांक) :** जाधव अथर्व राजू (७, ४, १) दिवटे कार्तिक किसन (८,५,२) चिटणे सानवी सचिन (८, ५, २), देशपांडे गौरव गोपाळकृष्ण (१३, १०, ५), तांदळे सानवी व्यंकटेश (१३, १०, ५) पटेल हुमेरा महिबूब (१३, १०, ५) पोतदार स्वरा सुजीत (१३, १०, ५) लांबतुरे मनवा नितीन (१५, १२, ७).



### मास्टर्स स्पर्धेत सोलापूरची मृण्मयी गायकवाड विजयी; श्रेयांश उपविजयी

**सोलापूर, दि. २५ मे-**

एम.एस.एल.टी.ए. पुरस्कृत महाराष्ट्रातील उदयोन्मुख खेळाडूसाठी छत्रपती संभाजी नगर येथे झालेल्या रोड टू एम.एस.एल.टी.ए. या मास्टर्स लॉन टेनिस स्पर्धेत १२ वर्षाखालील गटात मुलींमध्ये येथील मृण्मयी गायकवाडने अंतिम सामन्यात नाशिकच्या स्वरा केळकर हिचा ४-१, ४-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

मुलांच्या गटात नाशिकच्या आरुष कापडणीसने सोलापूरच्या श्रेयांश सिक्रोरियाचा ४-१, ४-० असा पराभव करून विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत महाराष्ट्रातून २४ मुले व मुली सहभागी झाल्या होत्या. महेश झांबरे हे मृण्मयी तर सुधीर सालगुडे हे श्रेयांशचे प्रशिक्षक आहेत. त्यांच्या यशाबद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी व मानद सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.

# आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे यजमानपद छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाकडे

## विद्यापीठाच्या क्रीडा मंडळाच्या बैठकीत निर्णय



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २०२६-२७ या वर्षात होणाऱ्या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे यजमानपद येथील छत्रपती रात्र महाविद्यालयाकडे सोपविण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या क्रीडा मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते.

या बैठकीत मागील वर्षी झालेल्या स्पर्धेचा आढावा घेण्यात आला. यावेळी मागील वर्षी स्पर्धेचे यजमानपद आयोजिलेल्या मंगळवेढ्यातील संत दामाजी महाविद्यालयाचे आभार मानण्यात आले.

### प्रा. बाळासाहेब वाघचवरे यांची नियुक्ती



यावेळी क्रीडा मंडळावरील मोहोळ येथील गरड महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक नंदकिशोर देशपांडे यांच्या रिक्त जागेवर वडाळा येथील माऊली महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बाळासाहेब वाघचवरे यांची नियुक्ती करण्यात आली.

# 'मास्टर्स'ची लातूरच्या रोहन अकादमीवर मात

### सोळा वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा : जयराज जगताप सामनावीर

**सोलापूर, दि. २५ मे-**



मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत मास्टर्स क्रिकेट अकॅडमीने लातूरच्या रोहन क्रिकेट अकॅडमीवर ५ गडी राखून विजय मिळवला.

डोणगाव रोडवरील पुष्प अकादमीच्या मैदानावर झालेल्या सामन्यात रोहन अकॅडमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २७ षटकात सर्वबाद ११२ धावा केल्या. यात अजिंक्य मुळेने २४ धावा केल्या. मास्टर्सकडून गोलंदाजी करताना जयराज जगतापने ८ धावांत ४ तर श्लोक पवारने १८ धावांत २ बळी टिपले.

विजयी ११३ धावांचे लक्ष्य मास्टर्स क्रिकेट अकॅडमीने २७.४ षटकात ५ बाद ११६ धावा करीत पार केले. यात उजवल इटकरने नाबाद ३४ व विपुल पट्टानने २६ धावा केल्या. रोहन अकॅडमीकडून गोलंदाजीत श्रीतेज लहाने याने २८ धावांत ४ बळी मिळवले. जयराज जगताप सामन्याचा मानकरी ठरला. पंच म्हणून नबीलाल पटेल व आर्सलन शेख तर गुणलेखक म्हणून वर्धन दळवी यानी काम पाहिले.

### आजचा अंतिम सामना

निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी विरुद्ध मॉडेल क्रिकेट अकॅडमी



# आदित्य साठे चार प्रकारात प्रथम

### जलतरण शिबिरातील प्रशिक्षणार्थींची जलतरण स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मे-**

चॅम्पियन ॲक्टिक क्लबच्या जलतरण शिबिरातील प्रशिक्षणार्थींची जलतरण स्पर्धेत आदित्य साठे याने २५ मीटर फ्री स्टाईल, बॅक स्ट्रोक, ब्रेस्ट स्ट्रोक व बटरफ्लाय या चार प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला.

स्वातंत्र्यवीर सावरकर जलतरण तलावात ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेचे क्रीडाधिकारी नजीर शेख यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेमध्ये ६ ते ७५ वय वर्षे असलेल्या सभासदांनी आपापल्या वयोगटात भाग घेतला. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सोलापूर जिल्हा स्विमिंग असोसिएशनचे अध्यक्ष सुदेश देशमुख, सचिव संतोष कोल्हापुरे, चॅम्पियन ॲक्टीक क्लबचे विनय मराठे, व्यवस्थापक दिगंबर कोंडा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

**या स्पर्धेत विविध प्रकारात विविध वयोगटात प्रथम आलेले जलतरणपटू असे :** आर्शिन कांबळे, आयट शेख, ध्रुव चोपडे, स्वराज्य भोसले, आरव अडकी, अन्विषा डोके, गौरव ढेकळे, चिन्मय सुरवसे, मेघराज बिराजदार, प्रियदर्शनी कांबळे, हमजा शेख, चैतन्य रंगदळ, वेदांत सोनटकले, स्वरा जनमाले, शार्दुल कानडे, आयुष लोया, पद्मावती माकणे, रजनी सोनटकले.

# सोलापूर जिल्हाप्रमुखपदी महाराष्ट्र केसरी पैलवान समाधान घोडके यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ मे-**



महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या सोलापूर जिल्हाप्रमुखपदी २०१० सालचे महाराष्ट्र केसरी समाधान घोडके यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे पदाधिकारी संग्राम कांबळे यांनी त्यांची निवड जाहीर केली.

संघटनेच्या बैठकीत ही निवड सर्वानुमते करण्यात आली. "कुस्तीचा विकास, पैलवानांचा सन्मान आणि महाराष्ट्राच्या पारंपरिक महत्त्वाचा गौरव" हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र कुस्ती संघटना अधिक जोमाने कार्य करणार असल्याने पैलवान घोडके यांची निवड करण्यात आली. संघटनेच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कुस्तीला चालना देणे, नवोदित पैलवानांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, तसेच पारंपरिक महत्त्वाचे जतन आणि संवर्धन करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. याशिवाय, जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पदाधिकाऱ्यांच्या निवडी करून संघटनेची मजबूत बांधणी करण्यात येणार आहे. घोडके हे महाराष्ट्रातील कुस्ती क्षेत्रातील एक दमदार, लोकप्रिय आणि अनुभवी नाव मानले जाते. आपल्या मेहनत, जिद्द आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर त्यांनी राज्यभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे विस्तारेल, असा विश्वास कुस्तीप्रेमी आणि पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दवाढमधील तालुका उत्तर सोलापूर पैकी सदर बझार येथील भारतरत्न इंदिरा नगर झोपडपट्टी मधील म्युनिसिपल घर नं.६८४, यांसी मिळकत नंबर १७७७४६, यांसी एकूण क्षेत्र ३०० चौ.फूट असून सदर मिळकतीचे ग.व.सु कर आकारणी सदरी आमचे अशिल पार्वती चंद्रकांत आळंद यांचे पती चंद्रकांत शिवशंकर (शिवशरण) आळंद यांचे कब्जेदार सदरी नावाची नोंद आहे. आमचे अशिलांचे पती चंद्रकांत शिवशंकर (शिवशरण) आळंद यांचे दि.२९/०१/२०२४ रोजी निधन झालेले आहे व त्यांचे निधनानंतर आमचे अशिल हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहेत. आमचे अशिलांचे शिवाय अन्य कोणीही वारसदार नाहीत.

तरी सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचेकडील ग.व.सु कर आकारणी सदरी मयत चंद्रकांत शिवशंकर (शिवशरण) आळंद यांचे नाव कमी करून आमचे अशिलांचे कब्जेदार सदरी नावाची नोंद करण्यासाठी रितसर अर्ज दिलेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने कोणाचीही कसलीही हरकत असल्यास, त्यांनी योग्य तया अस्सल कागदपत्रांसह खालील पत्त्यावर आणून दाखवून ते निदर्शनास आणून द्यावे.

सदर मिळकतीबाबत कोणाचीही वाद, लवाद, गहाण, जप्ती, हुकूमनामा, बोजा व टाच, अथवा मालकीहक्क अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क असेल तर त्यांनी ०८ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर लेखी कळून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचेकडील ग.व.सु कर आकारणी सदरी सदर मिळकतीचे भोगवटदार/कब्जेदार सदरी मयत चंद्रकांत शिवशंकर (शिवशरण) आळंद यांचे नाव कमी करून आमचे अशिल पार्वती चंद्रकांत आळंद हे वारसदार म्हणून त्यांचे नावाची नोंद करतील, मग त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली २५/०५/२०२६

**सही/-**
**ॲड दिपाली बी मद्रूर**
**बी.ए एल.एल.बी**
**पदमाई निवास प्लॉट नं.३३, आदर्श नगर,**
**सोलापूर ९८२३४३०२२२**



## जाहीर प्रगटन

तमाम जनतेस विशेषतः बार्शी तालुका व शहर परिसरातील तमाम जनतेस आमचे पक्षकार रामदास सदाशिव वंजारी, रा. यशवंत नगर, धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दिलेल्या माहिती व अधिकारपत्रावरुन या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, मौजे चिखर्डे ता.बार्शी जि.सोलापूर येथील जमीन गट नं.१८५/१ एकुण क्षेत्रफळ ०१ हे. ६२ आर पैकी ००हे. ८१ आर असून त्याची चतुःसिमा पुर्वेस-साहेबराव निंबाळकर, पश्चिमेस-आगलावे यांची जमीन, दक्षिणेस- अरुण पाचकवडे यांची जमीन, उत्तरेस- धाराशिव बार्शी रोड येणेप्रमाणे चतुःसिमेच्या आतील जमीन मिळकतीबाबत आमचे पक्षकार रामदास सदाशिव वंजारी यांनी सदरील जमीनीचे मालक प्रदिप भैरु पवार, रा.येडशी ता.जि.धाराशिव यांचेसोबत सदर जमीनीबाबत खरेदीचा ठराव आमचे अशिल यांनी केलेला असून सदरील बाबतीत ठरावापोटी काही रक्कमही प्रदिप भैरु पवार यांना आमचे अशिलांनी दिलेली आहे व लवकरच आमचे अशिल हे उर्वरित रक्कम देऊन खरेदीखताचा व्यवहार हा कायदेशीरपणे पुर्ण करणार आहेत. तत्पुर्वी सदर जमीन मिळकतीवर कोणाचा काही आक्षेप, हक्क, ऊजर, बक्षीसपत्र, इसारपावती, पोटगी, करारनामा, तारण, गहाण, दान, टाच, तोंडी व्यवहार, वारस हक्क, कर्ज बोजा किंवा इतर कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार असेल तसेच सदर प्लॉट मिळकतीसंदर्भात न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यास माझ्या खालील नमुद पत्त्यावर सदर जाहीर प्रगटन झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत काही हरकत असल्यास त्याबाबतची लेखी कागदपत्रे पुराव्यास दाखल करुन त्याची रितसर पोहोच घ्यावी, सदर मुदतीत जर कोणाचाही आक्षेप आला नाही तर आमचे अशिल हे कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदरचा खरेदीखताचा कायदेशिर व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या आक्षेपास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत.

सबब जाहीर प्रगटन आजरोजी दिले असे.

दिनांक : २५/०५/२०२६

**तर्फे**
**ॲड.एम.व्ही.वळसंगे,**
**जिल्हा व सत्र न्यायालय, धाराशिव**
**मो.नं. ९४२०६९६४०८ / ९४२३२२८६००**

**सही/-**
**जाहीर प्रगटन देणार**
**रामदास सदाशिव वंजारी**



## खरेदीपूर्वी जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि सोलापूर, सब डि व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी शहर म्यु. पल हद्दीतील येथील जुना गट नं १०७८ याचा नवीन गट नं. १०८४/२/अ यामधील माझे मालकीचा प्लॉट नं. ३ याचे गुंठेवारी नुसार क्षेत्रफळ २७८.७३ चौ.मी. असून डी. पी.रस्ताबाधीत क्षेत्र ६९.७२ चौ.मी. वजा जाता उर्वरीत क्षेत्रफळ २०९.०१ चौ.मी. आहे. याचे मोजमाप पुव बाजू १८.२९ मी. दक्षिण बाजू १५.२४ मी. पश्चिम बाजू १८.२९ मी. व उत्तर बाजू १५.२४ मी. आहे. यांसी चतुःसिमा पुर्वेस- सदर गट नं. पैकी प्लॉट नं. २, दक्षिण- ७.६२ मी. रुंदीचा रस्ता, पश्चिमेस- सदर गट नं. पैकी प्लॉट ४ व डि. पी. रस्ता, उत्तरेस- डि. पी. रस्ता. याचे पाणी व वागणुक दक्षिण, पश्चिम व उत्तर बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे आतील तदंभुत वस्तु व हक्कासह.

वर नमुद प्लॉट हा रियाज नबीलाल मोमीन यांचे खरेदी मालकीचा असून त्यांनी त्यांचे प्रापंचिक, कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरविलेले आहे व आमचे अशिलांनी सदरची मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तसा विक्री संबंधीचा व्यवहारही उभयतांमध्ये ठरलेला असून त्याप्रमाणे आमचे अशिलाकडून त्यांनी इसारा दाखल रक्कम ही स्विकारलेली आहे व सदरची मिळकत हि निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची, स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असल्याची खात्री, ग्वाही प्लॉट मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

या उपर हि वर नमुद मिळकत संदर्भाने कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, खंडपत्र, बटईपत्र, आग्रहक्क, पोटगीबोजा, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशीही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ८ (आठ) दिवसांचे आत कागदपत्रासह लेखी स्वरुपात आमचे कार्यालयात येऊन समक्ष भेटुन खात्री करुन द्यावी. वर नमुद मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकतही निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध नसल्याचे समजुन अथवा त्यांनी तो जाणीव पुर्वक वईच्छेने सोडून दिला असे समजुन आमचे अशिल व प्लॉट मालक आपसात ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहुन कोणाचीही, कसलीही, कोणतीही प्रकारची तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे.
ता. २६/०५/२०२६

**सही/-**
**ॲड गायत्री अभिमन्यु डोंगरे (गुंड)**
**पत्ता-जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**मो. ८६२४८९९३६६**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1145497948 | मालमत्तेवर कर्ज | 1. संतोष मारुती घोडके<br>2. वर्षाराणी संतोष घोडके | 14/03/2026 | INR 10,59,433.72/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत नं. १०९ चा संपूर्ण तुकडा आणि भाग, एकूण क्षेत्रफळ ३२१० चौ. फूट, मौजे: नाझरे, ग्रामपंचायत नाझरे च्या हद्दीत, तालुका: सांगोला, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०८.चतुःसिमा: पूर्वेस: रामचंद्र घोडके यांची मिळकतपश्चिमेस: नाझरे - उदनवाडी रोड उत्तरेस: संजय घोडके यांची मिळकत दक्षिणेस: रस्ता

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 26/05/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**



## अुत्तम सेवा — मंगळवार दि. २६ मे २०२६ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **स्टाफ सिलेक्शन मिशन, SSC** | | | |
| | कंबाईन ग्रॅज्युएट लेवलं एक्झाम -२०२६ (१२२५६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | ३० पर्यंत | २२/०६/२६ |
| २) | **भारतीय स्टेट बँक, SBI** | | | |
| | ॲप्रेंटिस (७१५० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | २८ पर्यंत | ०८/०६/२६ |
| ३) | **कामगार आयुक्तालय** | | | |
| | निरीक्षक (६२ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | ११/०६/२६ |
| ४) | **राष्ट्रीय संरक्षण व नौदल ॲकॅडमी NDA** | | | |
| १ | NDA/ NA (३९४ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | १९ पर्यंत | ०९/०६/२६ |
| ५) | **संयुक्त संरक्षण सेवा परिक्षा CDS-UPSC** | | | |
| १ | CDS एक्झाम - 2026 (४५१ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ०९/०६/२६ |

**✲ मोफत सरकारी अपडेट ✲**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉट्सॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉट्सॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ६) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड RRB** | | | |
| | असि. लोको पायलट (११,१२७) | ITI/डिप्लोमा/B.E. उत्तीर्ण असावे. | ३० पर्यंत | १४/०७/२६ |
| ७) | **केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा, CTET** | | | |
| | शिक्षक | दहावी/बारावी व D.Ed/ B.Ed उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३० पर्यंत | १०/०६/२६ |
| ८) | **आदिवासी विकास विभाग (मुदतवाढ)** | | | |
| | चौकीदार (४१६ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | २७/०५/२६ |
| ९) | **चलन नोट मुद्रणालय (मुदतवाढ)** | | | |
| १ | ऑफिस असिस्टंट (२२ पदे) | पदवी व इंग्जी टायपिंग असावे | २५ पर्यंत | ०३/०६/२६ |
| २ | ज्युनियर टेक्निशियन (४०८) | ITI (इले/इलेक्ट्री /मशिनिस्ट / एसी / फिटर / प्रिंटींग / प्लेट मेकर / केमिकल) | २५ पर्यंत | ०३/०६/२६ |
| ३ | सुपरवायझर (९९ पदे) | पदवी/पदविका (६०%) (कॉम्प्यु/ आय.टी / मेकॅ/ एसी/ इले/ इलेक्ट्रॉ/ सिव्हील) | ३० पर्यंत | ०३/०६/२६ |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा

१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.

www.uttamseva.org






## महत्त्वाचे

### टी-२० विश्वचषकानंतर मेगन शट निवृत्त होणार

**नवी दिल्ली :** आगामी २०२६ चा आयसीसी महिला टी-२० विश्वचषक ही तिची शेवटची मोठी आयसीसी स्पर्धा असेल, अशी घोषणा ऑस्ट्रेलियाची वेगवान गोलंदाज मेगन शट हिने केली. मेगन महिलांच्या टी-२० विश्वचषकानंतर आयसीसी स्पर्धांमधून निवृत्त होणार आहे.



मेगनने २०१२ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि तिन्ही प्रकारांमध्ये मिळून २४० सामन्यांत ३०९ बळींची नोंद केली आहेत. गत दोन स्पर्धांमधील अपयशाची सल अजूनही मनात आहे आणि, इतक्या मोठ्या प्रमाणात यश अनुभवल्यानंतर, ही सल अधिकच बोचते. पण मग तुम्ही अशा खेळाडूंचा विचार करता ज्यांनी अजून एकदाही विश्वचषक जिंकलेला नाही; ही एक चांगली आठवण करून देणारी बाब आहे की मी खूप नशीबवान ठरले आहे आणि आता पुढच्या पिढीसोबत पुन्हा नव्याने सुरुवात करण्याची माझी इच्छा आहे,असे शटने सोमवारी सांगितले. मेगनने आपल्या निवृत्तीची तारीख अद्याप निश्चित केलेली नाही.

### कॅनेडियन ग्रांप्रीमध्ये किमी अँटोनेलीचा चौथा विजय

**मॉण्ट्रियल :** येथील सर्किट जिलेस विलेन्यूव्ह येथे पार पडलेल्या कॅनेडियन ग्रां प्री शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावत, किमी अँटोनेलीने आपला सलग चौथा विजय नोंदविला. १९ वर्षीय अँटोनेलीने १:२८:१५ या वेळेत शर्यत पूर्ण करत, दुसऱ्या क्रमांकावर आलेल्या फेरारीच्या लुईस हॅमिल्टनचा जवळपास ११ सेकंदांच्या फरकाने पराभव केला. रेड बुलचा मॅक्स व्हस्टपिन तिसऱ्या क्रमांकावर राहिला. अँटोनेली आणि त्याचा मर्सिडीज संघातील सहकारी जॉर्ज रसेल यांच्यात चुरशीची लढत सुरू होती. १३ व्या फेरीवर या दोघांनी अनेकदा एकमेकांकडून आघाडी हिसकावून घेतली; मात्र, शर्यतीच्या एकूण ६८ लॅप्सपैकी ३० व्या लॅपवर पॉवर युनिटमध्ये बिघाड झाल्यामुळे रसेलचा शर्यतीतील प्रवास अकालीच संपुष्टात आला. १९५२ नंतर सलग चार शर्यती जिंकणारा अँटोनेली हा पहिला इटालियन चालक ठरला आहे. तसेच, आपल्या कारकिर्दीतील पहिल्या चार शर्यती सलगपणे जिंकणारा तो पहिलाच एफ१ चालक बनला आहे. मला ज्या प्रकारे जिंकायचे होते, तसा हा विजय नव्हता. जॉर्जसोबत एक चांगली आणि चुरशीची लढत होईल अशी अपेक्षा होती; पण तरीही, हा विजय आम्ही स्वीकारतो, असे अँटोनेली म्हणाला.

### ऑस्ट्रेलियाच्या आव्हानासाठी भारतीय महिला हॉकी संघ सज्ज

**पर्थ :** मंगळवारी पर्थ येथे सुरू होणाऱ्या चार सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाचा सामना करताना, भारतीय महिला हॉकी संघ नेशन्स कपच्या तयारीची सुरुवात सकारात्मक पद्धतीने करण्याचा प्रयत्न करेल. सलीमा टेटेच्या नेतृत्वाखालील या संघाचे उद्दिष्ट, १५ ते २१ जून दरम्यान ऑकलंड येथे होणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या एफआयएच हॉकी महिला नेशन्स कप स्पर्धेपूर्वी, आपल्या कामगिरीला एक निर्णायक गती देण्याचे असेल. या वर्षाच्या सुरुवातीला अर्जेंटिनामध्ये केलेल्या उत्साहवर्धक कामगिरीनंतर जिथे पहिल्या दोन सामन्यांत पराभव पत्करावा लागूनही, भारताने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या संघाविरुद्धची चार सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली होती. हा पाहुणा संघ पूर्ण आत्मविश्वासाने या दौऱ्यावर दाखल झाला आहे. संघाने गेल्या काही आठवडे बंगळुरू येथील राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरात कठोर सराव केला.

# अंतिम फेरीसाठी कस लागणार



रजत पाटीदार



शुभमन गिल

◆ **धर्मशाला, २५ मे**

१९ वा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) हंगाम आता खऱ्या अर्थाने अंतिम टप्प्यावर आला असून मंगळवारी येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमवर गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यादरम्यान क्वालिफायर एक सामना खेळला जाणार आहे. सलग दुसऱ्यांदा आयपीएल विजेतेपद पटकावण्याच्या बंगळुरूच्या मोहिमेची खरी कसोटी गुजरातविरुद्ध खेळताना ठरणार आहे. बंगळुरूला गुजरातच्या या हंगामातील सर्वात शिस्तबद्ध गोलंदाजी आक्रमणाचा सामना करावा लागणार आहे. हा सामना म्हणजे बंगळुरूची फलंदाजीतील खोली विरुद्ध गुजरातची अविरत गोलंदाजीची यंत्रणा असा रंगेल. या सामन्यातून थेट अंतिम फेरीत स्थान मिळविणे पणाला लागले आहे.

१४ साखळी सामन्यांनंतर दोन्ही संघांनी लीग टप्प्याची सांगता प्रत्येकी १८ गुणांसह केली; मात्र, सरस धावगतीमुळे (नेट रन रेट) बंगळुरूने अव्वल स्थान पटकावले.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स हे कदाचित २०२६ मधील दोन सर्वात परिपूर्ण संघ ठरले आहेत, तरीही प्ले-ऑफमध्ये पोहोचण्यासाठी त्यांनी पूर्णपणे भिन्न मार्ग अवलंबले आहेत. कर्णधार रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आपल्या मोहिमेची उभारणी आक्रमक फलंदाजीवर आणि मागील हंगामांच्या तुलनेत अधिक भरवशाच्या गोलंदाजी फळीवर केली.

विद्यमान विजेत्या संघाने या हंगामात वारंवार २०० धावांचा टप्पा ओलांडला. डावाच्या सुरुवातीला दिग्गज फलंदाज विराट कोहलीचा अनुभव, तसेच गोलंदाजीमध्ये जोश हेझलवूड व भुवनेश्वर कुमार या वेगवान गोलंदाजांच्या जोडीची साथ, या दोन्ही गोष्टींचा त्यांना प्रचंड फायदा झाला.

परक्या मैदानावर विजय मिळवण्याची व अटीतटीचे सामने आपल्या बाजूने वळविण्याची त्यांची क्षमता, यामुळेच ते साखळी फेरीतील सर्वात सातत्यपूर्ण संघांपैकी एक ठरले. तसेच, धर्मशाला येथील परिस्थितीशी असलेल्या अलीकडील परिचयाचा फायदाही बंगळुरू संघाला मिळणार आहे; याच मैदानावर त्यांनी या महिन्याच्या सुरुवातीला पंजाब किंग्सविरुद्ध एक अत्यंत महत्त्वपूर्ण विजय नोंदवला होता.

दरम्यान, गुजरात टायटन्स संघाने आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर आणि अशा एका भक्कम फलंदाजीच्या आघाडीच्या बळावर प्ले-ऑफमध्ये धडक मारली आहे. गुजरातने प्रतिस्पर्ध्यांना क्वचितच कधी दबाव निर्माण करण्याची संधी दिली. कर्णधार शुभमन गिल, शैलीदार फलंदाज बी. साई सुदर्शन आणि आक्रमक यष्टिरक्षक-फलंदाज जोस बटलरने संघाला तितक्याच प्रमाणात स्थैर्य व आक्रमकता प्रदान केली आहे.

परंतु, या हंगामाच्या दुसऱ्या टप्प्यात गुजरातची गोलंदाजीच विशेषत्वाने उठून दिसली आहे. मोहम्मद सिराज, कॅगिसो रबाडा आणि प्रसिध कृष्णा या वेगवान गोलंदाजांच्या त्रिकुटाने नव्या चेंडूवर सातत्याने बळी मिळविले आहेत; तर रशीद खान व डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोरने सामन्याच्या मधल्या षटकांवर अत्यंत खुबीने नियंत्रण मिळविले आहे.

आपल्या शेवटच्या साखळी सामन्यात चेन्नई सुपर किंग्सला ८९ धावांनी पराभूत केल्यानंतर गुजरात टायटन्स संघ दमदार लयीत क्वालिफायर १ लढतीत उतरत आहे. (वृत्तसंस्था)

> **क्वालिफायर १ सामना**
> **रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. गुजरात टायटन्स**
> **स्थळ :** हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटना स्टेडियम, धर्मशाला
> **वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
> **थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# या खेळाडूंमुळे लढत निर्णायक ठरू शकते





या सामन्यात फॉर्मात असलेला विराट कोहली आणि दक्षिण आफ्रिकेचा गोलंदाज कॅगिसो रबाडा यांच्यादरम्यानची जुगलबंदी निर्णायक ठरू शकते. गुजरातच्या वेगवान गोलंदाजांच्या सामना करण्याची कोहलीची क्षमता बंगळुरूच्या पॉवरप्लेला कलाटणी देऊ शकते.

त्याचप्रमाणे, मोहम्मद सिराजविरुद्ध फिल सॉल्टचा आक्रमक पवित्रा सुरुवातीच्या खेळाची गती ठरवू शकतो. बोटाच्या दुखापतीवर उपचार करून मायदेशी परतल्यानंतर सॉल्ट प्ले-ऑफमध्ये स्पर्धा करण्यासाठी परतला आहे. तो आरसीबीच्या फलंदाजीला मजबुती देतो.

## हेझलवूड, भुवनेश्वर गोलंदाजीने गिल, सुदर्शनची परीक्षा घेणार





दुसऱ्या टोकाला, हेझलवूड व भुवनेश्वर प्रकाशझोतात चेंडूच्या हालचालीने शुभमन गिल व साई सुदर्शनची परीक्षा घेतील. बंगळुरूच्या वेगवान गोलंदाजांनी या हंगामात आघाडीच्या फळीवर सुरुवातीलाच आक्रमण करून यश मिळवले आहे. रशीद खान व बंगळुरूच्या फलंदाजांदरम्यानची मधल्या षटकांमधील लढतही निर्णायक ठरू शकते, मात्र कर्णधार पाटीदारचा फिरकीविरुद्धचा दमदार खेळ बंगळुरूला एक महत्त्वाचा प्रति-पर्याय देतो.

# वैभव सूर्यवंशीचे नवा इतिहास घडविण्याचे ध्येय

## टी-२० द्विशतक ठोकायचेय्, अन् गेलचा विक्रम मोडायचाय्




◆ **चंदीगड, २५ मे**

पंधरा वर्षीय वैभव सूर्यवंशीने टी-२० क्रिकेटचा इतिहास नव्याने लिहिण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. या प्रकारातील पहिलेवहिले द्विशतक झळकावून, ख्रिस गेलचा १७५ धावांच्या (नाबाद) सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम मोडण्याची आपली इच्छा त्याने व्यक्त केली आहे.

अर्धशतके साजरी करण्यावर माझे लक्ष केंद्रित नाही; त्याऐवजी टी-२० क्रिकेटमध्ये मला त्याहूनही मोठी शिखरे सर करायची आहेत, असे राजस्थान रॉयल्सच्या वैभव सूर्यवंशीने इंग्लंडचा माजी फलंदाज केविन पीटरसनच्या एका यूट्यूब कार्यक्रमात सांगितले.

माझे अर्धशतक झळकावण्यास तितकेसे लक्ष नाही. मला टी-२० क्रिकेटमध्ये २०० धावा करायच्या आहेत. मला ख्रिस गेलचा विक्रम मोडायचा आहे, असे तो म्हणाला.

२०१३ च्या आयपीएल हंगामात पुणे वॉरियर्स इंडियाविरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी खेळताना गेलने केलेली १७५ धावांची (नाबाद) खेळी, आजही टी-२० क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या म्हणून कायम आहे. वेस्ट इंडीजच्या या दिग्गज खेळाडूने अवघ्या ३० चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले होते; हा विक्रम आजही आयपीएलच्या इतिहासातील सर्वात जलद शतक म्हणून अबाधित आहे.

### सूर्यवंशीची विक्रमी वाटचाल सुरूच

राजस्थान रॉयल्स संघासाठी खेळताना वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ चा हंगाम अत्यंत गाजवला आहे. १४ सामन्यांमध्ये त्याने ४१.६४ च्या सरासरीने आणि २३२.२७ च्या स्ट्राइक रेटने एकूण ५८३ धावा कुटल्या आहेत. त्याच्या या धावसंख्येमध्ये एका शतकाचा आणि तीन अर्धशतकांचा समावेश आहे; तसेच, एकाच आयपीएल हंगामात ५३ षट्कार ठोकणारा तो पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. एका हंगामात ५९ षट्कार ठोकण्याच्या गेलच्या आयपीएल विक्रमापासून तो आता केवळ सात षट्कार दूर आहे. बिहारच्या या फलंदाजाने, वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी आयपीएलमधील सर्वात तरुण खेळाडू बनून गेल्या वर्षीच मथळे गाजवले होते. त्याने गुजरात टायटन्सविरुद्ध केवळ ३५ चेंडूंमध्ये शतक ठोकलेजे एखाद्या भारतीयाने आयपीएलमध्ये केलेले सर्वात वेगवान शतक ठरलेआणि तो टी-२० क्रिकेटमधील सर्वात तरुण शतकवीर बनला. (वृत्तसंस्था)

## राजस्थान-हैदराबाद एलिमिनेटर सामना उद्या

**नवी दिल्ली :** १९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात तिसऱ्या स्थानावरील राजस्थान रॉयल्स आणि चौथ्या क्रमांकावरील हैदराबाद संघादरम्यान नवीन चंदीगड येथे बुधवारी एलिमिनेटर सामना खेळला जाणार आहे. या सामन्यातील विजयी संघ शुक्रवार २९ रोजी होणाऱ्या क्वालिफायर २ सामन्यात बंगळुरू किंवा गुजरातविरुद्ध खेळेल. मंगळवारी धर्मशाला येथे बंगळुरू व गुजरात यांच्यादरम्यान क्वालिफायर १ सामना खेळला जाणार असून विजयी संघ थेट ३१ मे रोजी अहमदाबाद येथे नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणाऱ्या अंतिम सामन्यात खेळेल, तर पराभूत संघ क्वालिफायर २ सामन्यात खेळेल. क्वालिफायर २ सामन्यातील विजयी संघ अंतिम फेरीत खेळेल.

# गिलच्या नेतृत्वाखाली गुजरात टायटन्स आयपीएल जिंकण्यास सक्षम : चावला



◆ **नवी दिल्ली, २५ मे**

गुजरात टायटन्स (जीटी) संघ शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली २०२६ चे आयपीएल विजेतेपद जिंकण्यास सक्षम वाटतो, असे भारताचा माजी लेग-स्पिनर पीयूष चावला याने म्हटले आहे. संघाला प्ले-ऑफपर्यंत नेण्यात गिलने दाखवलेल्या नेतृत्वकौशल्याची त्याने यावेळी कौतुक केले.

२०२२ चे विजेते असलेल्या गुजरात टायटन्स संघाने गुणतालिकेवर १८ गुणांसह दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोत्तम संघ म्हणून प्ले-ऑफमध्ये प्रवेश केला आहे. आता धर्मशाला येथील स्टेडियमवर होणाऱ्या क्वालिफायर १ सामन्यात त्यांचा सामना गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी होईल. या सामन्यातील विजेता संघ ३१ मे रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणाऱ्या अंतिम सामन्यातील आपले स्थान निश्चित करेल.

कोणत्याही कर्णधारासाठी, गोलंदाजी आणि फलंदाजीचे पर्याय प्रभावीपणे फिरविणे (रोटेट करणे) अत्यंत महत्त्वाचे असते. तुमच्याकडे उत्तम खेळाडू असू शकतात, परंतु ती योग्य वेळी आणि योग्य क्षणी कशी वापरायची हे ज्याला कळते, तोच कर्णधार चांगल्या कर्णधारांपासून महान कर्णधारांना वेगळे ठरवतो. शुभमन गिलने या हंगामात हे काम अत्यंत उत्कृष्टपणे पार पाडले आहे.

शुभमन गिलने अत्यंत अधिकारवाणीने आणि स्पष्टतेने नेतृत्व केले आहे. आपल्या कर्णधाराकडून तुम्हाला नेमके हेच अपेक्षित असते, केवळ एक कर्णधार नव्हे, तर असा नेता जो मैदानावर संघाला योग्य दिशा दाखवतो. त्याने फलंदाजीतही आपली कामगिरी चोख बजावली आहे, परंतु त्याचे कर्णधारपदही तितकेच प्रभावी ठरले आहे.

गिलने धाडसी निर्णय घेतले आहेत, गोलंदाजांचा वापर अत्यंत हुशारीने केला आहे आणि दबावाच्या प्रसंगांना शांतपणे हाताळले आहे. गुजरात टायटन्स आता अशा टप्प्यावर पोहोचले आहेत, जिथे ते या वेळी आयपीएलचे विजेतेपद जिंकण्यास पूर्णपणे सक्षम वाटत आहेत, असे पीयूष चावला म्हणाला. (वृत्तसंस्था)



सोमवारी नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात आयोजित नागरी सन्मान प्रदान समारंभादरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महिला क्रिकेटपटू हरमनप्रीत कौर भुल्लर आणि पॅरा-ॲथ्लिट प्रवीण कुमार यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान केला

# वन-डे विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलियाची भिस्त कमिन्स, हेझलवूड, स्टार्कवर : मॅकडोनाल्ड

◆ **मेलबर्न, २५ मे**

२०२७ च्या आयसीसी एकदिवसीय विश्वचषक विजेतेपदाच्या बचावासाठी संघ आपली रणनीती मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड आणि पॅट कमिन्स यांच्याभोवती आखत आहे; जरी हे तिघेही आगामी पाकिस्तान आणि बांगलादेश दौऱ्यांवर (५०-षटकांचे सामने) अनुपस्थित राहणार असले, तरीही संघाची भिस्त त्यांच्यावरच आहे, असे ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रशिक्षक ॲण्ड्र्यू मॅकडोनाल्ड यांनी सांगितले.

कमिन्स आणि हेझलवुड हे अनुक्रमे सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघांसाठी २०२६ च्या आयपीएल प्ले-ऑफ सामन्यामध्ये खेळतील, तर दिल्ली कॅपिटल्सचा प्रवास संपल्यानंतर स्टार्क मायदेशी परतेल. मला वाटते की लोक केवळ नजीकच्या सामन्यांकडे पाहतात आणि प्रश्न उपस्थित करतात की, अरे, ते तिथे का खेळत नाहीत? परंतु, जर तुम्ही २०२७ च्या विश्वचषकाचा विचार केंद्रस्थानी ठेवून पाहिले आणि आमच्यासमोर कोणते सामने येत आहेत याचा आढावा घेतला, तर लक्षात येईल की हीच ती शेवटची मोठी विश्रांती आहे. तिचा उपयोग आम्ही या खेळाडूंच्या शारीरिक तंदुरुस्तीवर काम करण्यासाठी करू शकतो; जेणेकरून २०२७ पर्यंतचा संपूर्ण प्रवास करण्यासाठी ते सज्ज होऊ शकतील. २०२७ मध्ये हे खेळाडू संघात उपस्थित असतील, या दृष्टीनेच आम्ही नियोजन करत आहोत, असेही त्यांनी सांगितले.या खेळाडूंना त्या टप्प्यापर्यंत सुस्थितीत पोहोचवण्यासाठी आम्ही जे काही प्रयत्न करत आहोत, त्यावर मोठा विश्वास असणे गरजेचे आहे. हे काम एक मोठे आव्हान असणार आहे, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# विश्वचषकासाठी स्पेनच्या संघात यामालचा समावेश

## मोराटा, फर्मिन बाहेर, रिअल माद्रिदचा एकही खेळाडू नाही

◆ **माद्रिद, २५ मे**

एकदा विश्वविजेतेपद पटकावलेल्या स्पेनने, ११ जूनपासून अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या देशांमध्ये सुरू होणाऱ्या फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी आपला २६ सदस्यीय संघ जाहीर केला आहे.

स्पेनला युरो २०२४ स्पर्धेत विजेतेपद मिळवून देणारे मुख्य प्रशिक्षक लुईस दे ला फुएन्ते यांनी, या स्पर्धेसाठी एका संतुलित संघाची निवड केली आहे.

बार्सिलोनाचा आक्रमक खेळाडू लामिन यामाल हा या स्पर्धेत लक्षवेधी ठरणारा खेळाडू असेल; तरीही दुखापतीमुळे स्पेनचा गट-फेरीतील पहिला सामना त्याला कदाचित खेळता येणार नाही.

तथापि, या स्पर्धेत स्पेन संघ मध्यरक्षक फर्मिन लोपेझच्या सेवेला मुकावे लागेल; गत आठवड्यात पायाला फ्रॅक्चर झाल्यामुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. विश्वचषकासाठीच्या स्पेनच्या संघात रिअल माद्रिदचा एकही खेळाडू नसण्याची ही पहिलीच वेळ असेल.

विश्वचषकात सहभागी होण्यापूर्वी, स्पेन ४ जून रोजी इराकविरुद्ध आणि ८ जून रोजी पेरूविरुद्ध असे दोन सराव सामने खेळणार आहे.

केप व्हर्दे, सौदी अरेबिया आणि उरुग्वे यांच्यासह गट-एच मध्ये स्थान मिळालेला स्पेनचा संघ, १४ जून रोजी केप व्हर्देविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. (वृत्तसंस्था)



# नोवाक जोकोविचची विजयी सलामी

## फ्रेंच ओपन टेनिस म्पेटशी पेरिकार्डवर मात

◆ **पॅरिस, २५ मे**

फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या सलामीच्या फेरीत सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोवाक जोकोविचला एका कठीण आव्हानाचा सामना करावा लागला. मात्र, पिछाडीवरून जोरदार मुसंडी मारत त्याने फ्रेंच खेळाडू जियोव्हानी म्पेटशी पेरिकार्डचा ५-७, ७-५, ६-१, ६-४ असा पराभव केला आणि पॅरिसमधील या स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले.

आता सर्बियाचा जोकोविच पुढील सामन्यात व्हॅलेंटिन रॉयअरशी सामना करेल. पहिला सेट गमावल्यानंतर जोकोविचचा खेळ बहरला. सामन्यात बरोबरी साधल्यानंतर, जोकोविचने प्रतिस्पर्ध्याची सर्व्हिस तीन वेळा मोडली. यामुळे म्पेटशी पेरिकार्डचे आव्हान संपुष्टात आले आणि जोकोविच २ तास ५१ मिनिटांत सुरक्षितपणे दुसऱ्या फेरीत दाखल झाला.



फटकेबाजी करताना नोवाक जोकोविच

या वर्षी पॅरिसमध्ये आपल्या कारकिर्दीतील ८२ व्या ग्रॅण्ड स्लॅम मुख्य स्पर्धेत सहभागी होत जोकोविचने एक विक्रम रचला आहे. यापूर्वी हा विक्रम तो रॉजर फेडरर आणि फेलिसियानो लोपेझ यांच्यासोबत संयुक्तपणे धारण करत होता; आता त्याने तो विक्रम मोडला आहे. ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धांमधील सलामीच्या सामन्यांमध्ये जोकोविचची कामगिरी आता ८०-२ अशी झाली आहे. तसेच, २००६ च्या ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेनंतर ग्रॅण्ड स्लॅममधील आपला पहिला सामना तो कधीच हरलेला नाही. (वृत्तसंस्था)

### निशेष बसवरेड्डीकडून टेलर फ्रिट्झचा पराभव

पुरुष एकेरीच्या पहिल्याच फेरीत सातवे मानांकन असलेल्या अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झला त्याच्याच देशाच्या निशेष बसावरेड्डीकडून पराभवाचा धक्का सहन करावा लागला.

२१ वर्षीय वाईल्डकार्ड खेळाडू निशेष बसवरेड्डीने, आपलाच अमेरिकन सहकारी आणि सातवा मानांकित खेळाडू टेलर फ्रिट्झला ७-६(५), ७-६(५), ६-७(९), ६-१ असा धक्कादायक पराभव दिला.

अलेक्झांडर झ्वेरेव्ह आपल्या पहिल्या ग्रँड स्लॅम विजेतेपदाच्या शोधात आहे. आठवी मानांकित खेळाडू मिरा आंद्रीयेवाने बेसलाईन विनर्सचा जोरदार मारा करत, फ्रान्सच्या फियोना फेरोवर निर्विवाद वर्चस्व गाजवले.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### उज्ज्वल यश संपादन केल्याबद्दल संयोगिता ओव्हाळ यांचा सत्कार

**सोलापूर, दि.२५ मे**

येथील वालचंद महाविद्यालयातील विद्यार्थिनी संयोगिता ओव्हाळ हिने बी.ए. पदवी अभ्यासक्रमात अर्थशास्त्र विषयात ९० टक्के गुण मिळवत महाविद्यालयात तृतीय क्रमांक पटकावला. याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. कामगार नेते चांगदेव सोनवणे व सोलापूर म हानगरपालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. समारंभास शांताबाई साखरे, संगीता ओव्हाळ, राजश्री साखरे, दत्ता ओव्हाळ, सोलापूर महानगरपालिका आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसाट, भालचंद्र साखरे, प्रा. नवनाथ कुचेकर, प्रसेन्नजीत शिंगे, श्रावण भंडारे, सतीश वाघमारे, आनंद निकाळजे, श्रीकांत विभूते, वैभव साखरे, संकेत ओव्हाळ, भूषणचंद्र साखरे, प्रफुलचंद्र साखरे आदी उपस्थित होते. मान्यवरांनी संयोगिताच्या जिद्द, परिश्रम आणि अभ्यासू वृत्तीचे कौतुक केले. संयोगिता ओव्हाळ हिच्या यशाबद्दल विविध स्तरांतून तिचे अभिनंदन होत आहे.

### पिस्टल बेकायदा बाळगल्याप्रकरणी दोघांना चार दिवसाची पोलिस कोठडी

**मंगळवेढा, दि.२५ मे -**

मंगळवेढा शहरात बेकायदा पिस्टल बाळगल्याप्रकरणी नाना ज्ञानेश्वर जगताप (कारखाना रोड) व कृष्णा महेश खटकळे (खंडोबा गल्ली) या दोघांना पोलिसांनी अटक करून मंगळवेढा न्यायालयाचे न्यायाधीश व्ही.के. पाटील यांच्यासमोर उभे केले असता न्यायालयाने चार दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. दि.२३ रोजी सायंकाळी ५.२० वा. मंगळवेढा शहरातील एम. आय. डी. सी. परिसरात वरील आरोपी बेकायदा पिस्टल घेवून येत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सदर ठिकाणी सापळा लावून वरील दोघांना पकडून अंग झडती घेतली. तेव्हा दोन पिस्टल व तीन जीवंत काडतुसे मिळून आली होती. या घटनेत १ लाख ९१ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर घटनेत वरील दोघा आरोपींना पोलिस उपनिरिक्षक विजय पिसे यांनी अटक करून मंगळवेढा न्यायालयात उभे केले. आरोपींनी पिस्टल कोठून आणले ते कशासाठी आणले,स्वतःसाठी आणले की दुसऱ्यासाठी आणले, जवळ बाळगण्याचा नेमका उद्देश काय? आदी मुद्दे न्यायालयासमोर मांडले असता न्यायालयाने दि.२८ मे पर्यंत आरोपीस पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान,मागील वर्षापूर्वीही याच परिसरात बेकायदा पिस्टल बाळगल्याप्रकरणी कारवाई केली होती.

### वेळापूर येथे बुधवारी शिवसेना कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे आयोजन

**सांगोला, दि. २५ मे -**

बुधवार दि.२७ मे रोजी वेळापूर (ता.माळशिरस) येथील शिवशंभो मंगल कार्यालयामध्ये माढा लोकसभा मतदारसंघातील सांगोला व माळशिरस विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक तसेच शिवसेना कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यास उद्योगमंत्री उदय सामंत, खा.धैर्यशील माने, माजी खा.राहुल शेवाळे, माजी आ.शहाजीबापू पाटील, संपर्कप्रमुख चंद्रहार पाटील, माळशिरस पं.स.सभापती दत्ता मगर उपस्थित राहणार असल्याची माहिती शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे यांनी दिली. या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यातील चिकमहूद व सांगोला येथे गटवाइज कार्यकर्त्यांच्या बैठका उत्साहात पार पडल्या. बैठकीस नगराध्यक्ष आनंदा माने, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, युवासेनेचे सागर पाटील, जि.प.सदस्य दादासाहेब लवटे, पं.स.उपसभापती अजय सरगर, माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ, योगेश खटकाळे, गुंडादादा खटकाळे, अनिल खटकाळे, उदयसिंह घाडगे, दिग्विजय पाटील, दिपक ऐवळे, ओंकार पाटील, अरुण नागणे, धनंजय काळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### चंद्रशेखर बोधले



**सोलापूर, दि. २५ मे-**

जुळे सोलापूर येथील शिवगंगा नगर भाग -१ येथील रहिवासी चंद्रशेखर (अविनाश) अमोगसिध्द बोधले (वय ३५) यांचे रविवार, दि. २४ मे रोजी सायंकाळी ६ वाजता आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन भाऊ, एक बहिण, चुलते असा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर शिंगडगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे दि. २५ मे रोजी दुपारी २ वाजता अंतिमसंस्कार करण्यात आले. चंद्रशेखर बोधले हे जुळे सोलापूर येथील पीएम क्रिकेट क्लबचे स्टार खेळाडू होते.

### रामचंद्र कटकधोंड



**सोलापूर, दि. २५ मे-**

रामचंद्र बंडू कटकधोंड (वय ८६, रा. कीर्ती नगर, मल्लिकार्जुन नगर अक्कलकोट रोड, सोलापूर) यांचे वृद्धकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, बहिण, चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वीरशैव कक्कया ढोर समाजाचे ज्येष्ठ नेते मुन्ना कटके यांचे ते मोठे बंधू होत.

### ज्ञानेश्वर बोधले



**पंढरपूर, दि.२५ मे-**

ज्ञानेश्वर भास्कर बोधले यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ३५ होते. त्यांच्यावर पंढरपूर येथील भूवैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापारी विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांचे ते मावस बंधू व पंढरपूर येथील तालुका वैद्यकीय अधिकारी एकनाथ बोधले यांचे बंधू होत. त्यांच्या निधनाने पंढरपूर आणि परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. (कै) बोधले यांच्या पश्चात आई, वडील पत्नी, एक मुलगा, दोन बहिणी असा परिवार आहे .

# पाच वर्षाखालील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये

- अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी
- २८ जून रोजी जिल्ह्यातील ४ लाख
- ३६ हजार बालकांचे लसीकरण
- ७ हजार २२२ मनुष्यबळाची केली नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मे-**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या कालावधीत ० ते ५ वयोगटातील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. कोल्ड चेन, वाहनांची सोय, जनजागृती प्रचार व प्रसिद्धी तसेच लोकांचा सहभाग यावर भर देऊन मोहिम यशस्वी करावी, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात राष्ट्रीय प्लस पोलिओ लसीकरण मोहीम जिल्हा समन्वय समितीची बैठक अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते.

जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक पाच वर्षाखालील बालकापर्यंत आरोग्य यंत्रणेने पोहोचून त्या बालकांचे लसीकरण करावे. यासाठी शहर व ग्राम स्तरावर शालेय विद्यार्थ्यांच्या प्रभातफेरीद्वारे जनजागृती करावी. आरोग्य यंत्रणे पुरेसे मनुष्बळाचे नियोजन करून ही मोहीम यशस्वी करावी त्यासाठी प्रत्येक वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा अशा सूचना श्री. निऱ्हाळी यांनी दिल्या.



जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी माहिती दिली की, दि. २८ जून २०२६ रोजी रविवारी सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार असून त्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज आहे. जिल्ह्यातील ५ वर्षाखालील ४,३६,५७२ बालकांना लस पाजण्यासाठी ग्रामीण भागात ५५७०, शहरी भागात ५७० व महानगरपालिका क्षेत्रात ३७३ लसीकरण बूथची सोय करण्यात आली आहे. मोहिमेसाठी ७२२२ कर्मचारी नियुक्त असून पर्यवेक्षणासाठी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे यांनी सांगितले की, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, बाजारपेठ, विटभट्टी, साखर कारखाने, यात्रा व लग्न समारंभ अशा गर्दीच्या ठिकाणी पोलिओ डोस पाजण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. भटक्या वसाहती व उसतोड कामगारांच्या वसाहतीतील बालकांसाठी मोबाईल टीमची सोय करण्यात आली आहे.

या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मंजिरी कुलकर्णी, उपशिक्षणाधिकारी श्री प्रकाश नांगरे, जिल्हा विस्तार व म ाध्यम अधिकारी श्री धनंजय वाळा, जिल्हा सांख्यिकी अधिकारी श्री हेमंत पवार, परिचारिका सपना सोनवणे व साधना शिरसाट, वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. ओमकार येमुल, सहाय्यक प्राध्यापक डॉ. तिरुपती चोरमले तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## जगदंबा संस्थेतर्फे ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मे-**

अधिकमासाचे औचित्य साधून श्री जगदंबा सांस्कृतिक व बहुद्देशीय संस्था यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला प्रथम वर्षाचा 'ग्रंथराज श्री ज्ञानेयश्वरी पारायण, भजन व कीर्तन सोहळा' नुकताच अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. श्री जगदंबा देवी मंदिर सभागृह, जगदंबा नगर, आकाशवाणी केंद्र येथे पार पडलेल्या या आठ दिवसीय आध्यात्मिक सोहळ्याला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

या महोत्सवांतर्गत १८ मे ते २४ मे दरम्यान दररोज सकाळी ७ ते १०:३० या वेळेत सामुदायिक ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा पार पडला. तसेच दररोज रात्री ८:०० ते १०:०० या वेळेत विविध नामांकित भजनी मंडळांचे 'भजन संध्या' कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये साधना महिला भजनी मंडळ (महादेव चौक), कृष्णाप्पा महाराज भजन मंडळ (भारतीय चौक), गोरोबा काका महिला भजनी मंडळ (लष्कर), राधा कृष्ण भजनी मंडळ (हिप्परगा), हरिपाठ परिवार (स्वागत नगर - भव्य देखावा पाहुल) आणि शिवानंद कुटि हरिपाठ भजन मंडळ यांनी आपली सेवा सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

सोहळ्याच्या अंतिम दिवशी, २४ मे रोजी सकाळी १०:०० ते १२:०० या वेळेत कीर्तन श्रोत्रिय ब्रम्हानिष्ठ



ह.भ.प. गुरुवर्य लक्ष्मण महाराज चव्हाण (सोलापूर) यांच्या सुश्राव्य वाणीतून 'भव्य सांगता कीर्तन' पार पडले. त्यांच्या सुश्राव्य आणि विचारप्रवर्तक कीर्तनाने संपूर्ण सभागृह विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेले होते.

हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री जगदंबा सांस्कृतिक व बहुद्देशीय संस्थेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविकभक्तांनी विशेष परिश्रम घेतले. सोहळ्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## नवीन नियमाच्या माहितीसाठी बँक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची गरज

**जिल्हा बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक सुरवसे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मे-**

आर.बी.आय.च्या नियम व धोरणांमुळे बँकांना दैनंदिन काम करणे सुलभ व्हावे यासाठी बँक कर्मचा-यांना प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे, असे मत सोलापूर जिल्हा बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक सुरवसे यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा बँक्स असोसिएशनचे एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. उपाध्यक्ष दिपक मुनोत, परिचय करुन दिला. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष दिपक मुनोत, संचालक दिनकर देशमुख यांच्यासह जिल्हयातील नागरी सहकारी बँकेचे मॅनेजर, सिनीअर



ऑफिसर उपस्थित होते. संचालिका संगिता फाटे यांनी आभार मानले. असोसिएशनचे सीईओ शुभांगी ढवळे यांनी सुत्रसंचालन केले.

सीए. किसन माळी 'क्रेडीट अरायजल' या विषयावर मार्गदर्शन केले. कर्ज छाननी, बॅलन्ससीट, डाक्युमेंटेशन आदीवर विश्लेषणात्म क माहिती देत मोलाचे मार्गदर्शन त्यांनी यावेळी केले.

### वैधानिक लेखापरीक्षण न केल्यास बँकेला दंड

महाराष्ट्र राज्य बँक्स फेडरेशनचे संचालक सीए राजगोपाल मिणियार यांनी 'ऑडीट रिमार्कस अँड कंम्पालयन्सेस' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, आर.बी.आय. व जागतिक वित्तीय मानकांनुसार केवायसी होणे आवश्यक आहे. त्यामुळे खातेदारांच्या खात्यांची सुरक्षा वाढते व निधीचे संरक्षण होते व तुमच्या खात्यांमध्ये होणारा अनधिकृत प्रवेश रोखते. तसेच बँकेने आपले वैधानिक लेखापरीक्षण न केल्यास किंवा त्यात त्रुटी आढळल्यास बँकेला मोठा दंड लागू शकतो

## शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**मंगळवेढा, दि. २५ मे-**

सिध्दनकेरी येथे तहसिलदाराच्या आदेशाने शेतामध्ये रस्ता करावयास गेलेल्या तलाठी, मंडल अधिकारी, जे.सी.बी.चालक यांच्या अंगावर धावून येत रस्ता कसा करतो तेच बघतो अशी धमकी देवून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी विठ्ठल सिद्राम कोरे याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी तथा सिध्दनकेरीचे तलाठी सुयश आलदर व मंडल अधिकारी कैलास शिंदे असे दोघेजण दि.२२ मे रोजी तहसीलदारांच्या आदेशान्वये सिध्दनकेरी येथील शेतकरी अंकुश कोरे गट नं.४२ मध्ये गट नं.३६ व ४५ या दोन्ही गटाच्या हद्दीम धून रस्ता करत होते. तेव्हा गट नं.३६ चे खातेदार विठ्ठल सिद्राम कोरे हे त्या ठिकाणी दुपारी २.०० वा. आले व जे.सी.बी.चालकास तु या ठिकाणी रस्ता करावयाचा नाही असे म्हणून रस्ता करण्यास अडथळा करून जे.सी.बी. चालकास रस्ता करण्याचे काम थांबवले. यावेळी मंडल अधिकारी व तलाठी यांनी आरोपीस तुम्ही रस्ता अडवू नका, तहसिलदारांचा लेखी आदेश आहे असे समजावून सांगत होते. तेव्हा त्यांच्या अंगावर धावून येवून तुम्ही रस्ता कसा करता तेच बघतो अशी धमकी देवून सरकारी कामात अडथळा आणल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ मे-**

भारताला प्राचीन हस्तलिखितांचा समृद्ध वारसा लाभलेला असून, पारंपारिक ज्ञान पिढ्यान् पिढ्या हस्तलिखितांच्या माध्यमातून जतन होत आल्या आहेत. मात्र ही मौल्यवान हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात असल्याने त्यांचे जतन, संवर्धन व एकत्रित दस्तऐवजीकरण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने ज्ञानभारतम् (Gyan Bharatam) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची आखणी केली आहे.

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पांतर्गत देशव्यापी राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश देशातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे.

हस्तलिखितांची मालकी संबंधित संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांच्याकडेच कायम राहणार असून, इच्छुकांनी स्वखुशीने हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द केल्यास शासन ती स्वीकारणार आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंम लबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमि का असून विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य नोडल अधिकारी म्हणून श्री. सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तसेच श्रीमती अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. सदर सर्वेक्षणासाठी Gyan Bharatam हे मोबाईल अॅप विकसित करण्यात आले असून, त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम् प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, स्वयंसेवक, विद्यार्थी तसेच वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. आपल्याकडे प्राचीन हस्तलिखिते उपलब्ध असल्यास त्याची माहिती ऋ्रूप इहरींरा मोबाईल अॅपवर अपलोड करून या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा नोडल अधिकारी, ज्ञानभारतम प्रकल्प सोलापूर यांनी केले आहे.

# 'रजिस्टरमुक्त' अंगणवाडीचा मार्ग मोकळा; अंगणवाडी सेविकांना दिलासा

### 'पोषण ट्रॅकर'मुळे कागदी कामकाजाला पूर्णविराम ; सेविकांचा वेळ वाचणार

**बालकांच्या आरोग्य सेवेला मिळणार अधिक प्राधान्य**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मे**

अंगणवाडी सेविकांचा मोठा वेळ कागदी नोंदी आणि विविध रजिस्टर भरण्यात खर्च होत असल्याच्या तक्रारीनंतर शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांमधील ११ प्रकारचे रजिस्टर बंद करण्याचे आदेश दिले आहेत. यापुढे सर्व माहिती 'पोषण ट्रॅकर' या डिजिटल प्रणालीवरच नोंदवावी लागणार असल्याने सेविकांना प्रत्यक्ष बालक, गर्भवती माता आणि पोषण सेवांकडे अधिक लक्ष देता येणार आहे.

महिला व बाल विकास विभागाच्या या निर्णयामुळे



अंगणवाडी व्यवस्थापनात 'डिजिटल शिफ्ट' सुरू झाल्याचे मानले जात आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी आणि बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना रजिस्टर वापर पूर्णपणे थांबविण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. यापूर्वी शासनाने फेब्रुवारी २०२५ पासूनच रजिस्टर बंद करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र अनेक ठिकाणी जुनी पद्धत कायम असल्याचे 'पोषण ट्रॅकर'च्या आढाव्यात आढळून आले. त्यामुळे आता प्रशासनाने कठोर भूमिका घेत अंमलबजावणीवर थेट देखरेख सुरू केली आहे.

या निर्णयाचा सर्वाधिक फायदा अंगणवाडी सेविकांना होणार असल्याचे बोलले जात आहे. पूर्वी बालकांची उपस्थिती, पोषण आहार, गर्भवती महिलांची माहिती, वजन नोंदी, आरोग्य तपासणी यासाठी वेगवेगळी रजिस्टर भरावी लागत होती. त्यामुळे क्षेत्रभेटी आणि प्रत्यक्ष सेवा देण्यासाठी वेळ कमी पडत होता. आता ही सर्व माहिती म ोबाईल अॅपवर उपलब्ध होणार असल्याने काम अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.

दरम्यान, डिजिटल प्रणालीमुळे शासनालाही जिल्हानिहाय माहिती तात्काळ उपलब्ध होणार असून कुपोषण, बालआरोग्य आणि मातृसेवा योजनांवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवता येणार आहे. तसेच डेटा अपडेटमध्ये होणारा विलंब, नोंदीतील तफावत आणि कागदपत्रांचा ताणही कमी होणार आहे. अंगणवाडी कर्मचारी संघटनांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, सेविकांना आता कार्यालयीन कामापेक्षा प्रत्यक्ष सेवेकडे अधिक वेळ देता येईल, ग्रामीण आणि दुर्गम भागातील सेविकांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरणार असून, अंगणवाडी व्यवस्थेच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. अशी प्रतिक्रिया संघटनेचे अध्यक्ष सूर्यमणी गायकवाड यांनी व्यक्त केली आहे.

## कै.विठ्ठलरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंबाडची सुवर्ण कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २५ मे-**

'विकसित भारत बिल्डथॉन २०२५ हा केंद्रीय शिक्षण मंत्रालय, अटल इनोव्हेशन मिशन, नीती आयोग आणि एआयसीटीई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू केलेला म हत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या उपक्रम ात सोजरताई बहुउद्देशीय विकास मंडळ निमगाव (टे) संचलित, कै.विठ्ठलरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

१३ ऑक्टोबर २०२५ रोजी देशातील शाळांमध्ये एकाच वेळी 'लाईव्ह सिंक्रनाइझ बिल्डथॉन' झाला. १३ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबरदरम्यान शाळांनी विद्यार्थ्यांच्या प्रोटोटाइपचा व्हिडिओ आणि संक्षिप्त माहिती अधिकृत पोर्टलवर अपलोड केली होती. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये देशभरातील विजेत्यांची घोषणा करण्यात आली. या शैक्षणिक उपक्रमात सोलापूर जिल्ह्यातून ११७५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. त्यांच्यामधून कै.विठ्ठलरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता ११वी च्या समृद्धी टीमच्या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावला. समृद्धी टीम अंतर्गत समृद्धी टोणपे, सृष्टी कदम, सायली खताळ, मोनाली बोराटे व मेघा कचरे या पाच विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन पाटील एस. एन., तळे एम. एस., कांबळे बी. एल., गायकवाड एन.एम., तांबोळी एस. एल., हुलगे बी. एस. यांचेही म ार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन माजी आमदार संजय शिंदे, संस्थेचे सचिव प्राचार्य राजेंद्र ठोंबरे, विद्यालयाचे प्राचार्य जवानसिंग रजपूत, यशवंत प्रायमरी इंग्लिश स्कूल अंबाडचे प्राचार्य सोमनाथ होनमोटे, माध्यमिक विभागप्रमुख पाटील एम. एस., उच्च माध्यमिक विभागाचे प्रमुख घाडगे व्ही. एन. आदींनी अभिनंदन केले.

# 'जलतारा'ची ४ हजार ६०० कामे लोकसहभागातून पूर्ण

## शासनाचे वाचले १९६ कोटी रुपये

### पाणीसाठ्यात होणार भरीव वाढ

### जलतारा शेतखड्डा' उपक्रमाचा परिणाम

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २५ मे-**

चालू वर्षात एल-निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील शेतीवर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पावसाचे उशिरा आगमन, पावसातील खंड, एकूण पर्जन्यमानात घट यामुळे खरीप हंगामातील पेरणी उशिरा होण्याची किंवा पुन्हा पेरणी (पुनर्लागवड) करण्याची वेळ येऊ शकते.
त्यामुळे पिकांच्या उत्पादनावर विपरित परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात पाणी संवर्धनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सोलापूर जिल्ह्यात जलतारा



शेतखड्डा प्रात्यक्षिक हा प्रभावी उपक्रम लोकसभागातून राबविण्यात येत आहे. लोकसहभागातून तब्बल ४ हजार ६०० जलताराची कामे पूर्ण करण्यात आली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे व भूजल पातळी वाढवणे हा आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ही योजना युध्दपातळीवर राबविण्यासाठी जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांना निर्देश दिले होते. यामुळे जलताराचे काम त्यांनी मनावर घेत जिल्ह्यातील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांना प्रत्येक १०० जलतारांचे टार्गेट दिले. त्यांचा जिल्ह्याचा लक्षांक ४३ हजार १०० इतका होता. मात्र अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ६९६ गावात झपाट्याने राबवून ४ हजार ६०० कामे पूर्ण केली. काही खासगी उद्योजक, सामाजिक संस्थांनी त्यांचा सीएसआर फंड दिला. काही साखर कारखाने, संस्था, ट्रस्ट यांनीही निधी वाहने, कामगार दिल्याने या कामाला गती आली. यामुळे शासनाचे या कामांसाठी लागणारे तब्बल १९६ कोटी ६० लाख रुपये वाचले आहेत. या कामांसाठी जिल्ह्यातील ५ हजार ८८१ अर्ज आले होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी लोकसहभागातून हे काम पूर्ण केल्याने जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी समाधान व्यक्त केले आहे. शेतकरी बांधवांतही चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे.दि. १ मे ते ४ मे २०२६ या कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज पेटी ठेवण्याच्या सुचना सर्व तालुका कृषि अधिकारी यांनी देण्यात आलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी अर्ज सादर करावेत. शेतकऱ्यांनी संबंधित सहाय्यक कृषि अधिकारी, उपकृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. ग्रामपंचायत स्तरावर अर्ज पेटी उपलब्ध नसल्यास संबंधित तालुका कृषि अधिकारी किंवा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले.

**या उपक्रमाचे होणारे सकारात्मक परिणाम**
- * भूजल पातळीत सुमारे १४ फूटपर्यंत वाढ
- * पिकांच्या उत्पादनात सुमारे ४२ टक्क्यांनी वाढ
- * शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सुमारे १२० टक्क्यांनी वाढ
- * पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेत सुधारणा
- * पाणी वाढले तर उन्हाळी पिकांना होणार फायदा

**'जलतारा'चे होणारे फायदे**

चिबड युक्त जमिनीमध्ये जलताराचे काम केल्यास पाण्याचा निचरा होऊन जमीन चिबडयुक्त होण्याचे प्रमाण कमी होऊन पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. त्याकरिता जलतारा हा अत्यंत महत्वपुर्ण व परिणामकारक उपाय आहे. पावसाळ्यात शेतातून वाहून जाणारे पाणी योग्य ठिकाणी अडवण्यासाठी शेतात साधारण ५५ फूट रुंद व ६ फूट खोल शोषखड्डे तयार करून त्यामध्ये दगड, खडी व वाळू भरून नैसर्गिक फिल्टर तयार केला जातो. पाणी जमिनीत मुरुन भूजल पुनर्भरणास मोठी मदत होते. चिबडयुक्त जमिनीत पाण्याचा निचरा सुधारतो. विहिरी, बोअरवेल व पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले.

**माढा व बार्शी तालुका आघाडीवर**

'जलतारा'च्या कामांमध्ये माढा व बार्शी तालुका आघाडीवर तर माळशिरस व दक्षिण सोलापूर तालुका पिछाडीवर असल्याचे आजपर्यंत झालेल्या कामांवरुन दिसून येते. उत्तर सोलापूर तालुक्यात ३६१, दक्षिण सोलापूर तालुक्यात १०१, अक्कलकोट ३९६, मोहोळ २६६, माढा ९८७, बार्शी ७४०, करमाळा १५६, पंढरपूर २७४, सांगोला ७२५, मंगळवेढा ५१७, माळशिरस ८० याप्रमाणे जिल्ह्यात एकूण ४ हजार ६०० कामे लोकसहभागातून पार पडली आहेत.

# शुभराय आर्ट गॅलरी प्रकल्प; २.८७ कोटींच्या योजनेकडे दुर्लक्ष

### बंद अवस्थेतील बांधकामामुळे परिसराच्या विद्रुपीकरणात भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मे-**

महत्त्वाकांक्षी 'शुभराय आर्ट गॅलरी' योजना गेल्या चार वर्षांपासून रखडल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अर्धवट अवस्थेत पडून असलेल्या या प्रकल्पामुळे शहराच्या सौंदर्यावरही परिणाम होत आहे. प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

संबंधित बांधकाम हे भुईकोट किल्ल्याच्या ३०० मीटर परिसरात येत असल्याने पुरातत्व विभागाकडून नोटीस बजावल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे पुढील काम थांबवल्याचे सांगितले जाते. मात्र यावर अनेक महिन्यांपासून कोणताही ठोस तोडगा निघालेला नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहेत.

सोलापूर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणारा हा प्रकल्प २०२२-२३ मध्ये तत्कालीन आमदार प्रणिती शिंदे यांच्या आमदार निधीतून मंजूर केला होता. सुमारे २ कोटी ८७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध केला होता. शहरातील कला, चित्रकला, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध प्रदर्शनांसाठी स्वतंत्र जागा निर्माण करण्याच्या उद्देशाने या प्रकल्पाची संकल्पना मांडली होती. महापालिकेकडून हे काम शंभवी कन्स्ट्रक्शन या ठेकेदार संस्थेला दिले. बेसमेंटचे काम पूर्ण झाले असून गाळ्यांची उभारणी व इतर कामेही केली आहेत. मुख्य स्लॅबचे काम अद्यापही अपूर्ण असल्याने संपूर्ण प्रकल्प अर्धवट अवस्थेतच पडून आहे.

विशेष म्हणजे, प्रकल्पाचे काम पूर्ण झाले नसतानाही संबंधित ठेकेदाराला दोन कोटी रुपयांहून अधिक रकमेचे बिल अदा केल्याची माहिती समोर येत आहे. सध्या शुभराय आर्ट गॅलरी परिसरात अर्धवट सिमेंट-काँक्रीटचे ढांचे उभे असून, बंद अवस्थेतील बांधकामामुळे परिसराच्या विद्रुपीकरणात भर पडत आहे. रखडलेल्या या प्रकल्पाबाबत प्रशासनाने तातडीने स्पष्ट भूमिका घेऊन काम पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर प्रशासन सकारात्मक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मे-**

अंगणवाडी सेविका व मदतनिसांना ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधी, योगदान आधारित मासिक पेन्शन, ऑनलाइन कामकाजासाठी सुविधा, प्रोत्साहन भत्ता आदी महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रशासन सकारात्मक आहे. शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची ग्वाही एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या आयुक्त माधवी सरदेशमुख यांनी दिली, अशी माहिती अंगणवाडी कर्मचारी संघटना कृती समितीचे नेते सूर्यमणी गायकवाड यांनी दिली.

बैठकीत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी लागू करण्याचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन असल्याचे सांगण्यात आले. भविष्य निर्वाह निधी लागू करण्यासाठी शासन पातळीवर चर्चा आहे. यासंदर्भात झालेल्या बैठकीस क्षीरसागर, लोंढे, काकडे या अधिकाऱ्यांसह शुभा शमीम, शाम काळे, दिलीप उटाणे, राजेश सिंग, दत्ता देशमुख, अतुल दिघे, शैलजा चौधरी, संगीता कांबळे, भगवान दवणे आदी उपस्थित होते.

मोबाइलची अपुरी क्षमता, नेटवर्कचा अभाव, रिचार्ज खर्च लक्षात घेऊन सर्व अंगणवाड्यांना वायफाय सुविधा देण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवणे, मोबाइल न मिळालेल्या सेविकांना मोबाइल देण्यासह प्रोत्साहन भत्ता व रिचार्ज खर्च, अनावश्यक रजिस्टर बंद करणे, आवश्यक रजिस्टर उपलब्ध करून देणे, तपासण्यांतील त्रास कमी करणे, पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी अधिक वेळ देणे, आहार दरवाढ, टीएचआर आहारात बदल, थकीत देयके नियमित करण्याबाबतही प्रशासनाने आश्वासक भूमिका घेतली.

सन २०१८ पूर्वी मदतनीस म्हणून नियुक्त होऊन सेविका पदावर आलेल्या कर्मचाऱ्यांना ६५ वर्षांपर्यंत सेवा सुरु ठेवणे. अंगणवाडी सेविका व मदतनिसांना मानधन उशिरा मिळाल्याने घरखर्च, मुलांचे शिक्षण व दैनंदिन गरजा भागवताना अडचणी निर्माण होत असल्याचे कृती समितीने निदर्शनास आणून दिले. दोन्ही मानधने दर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत एकत्रितपणे नियमित जमा करण्यासंदर्भात आश्वासन देण्यात आले, असेही त्यांनी सांगितले.

## महत्वाचे...

### पोलिसात केस का केली म्हणून एकास दगडाने मारहाण

**सोलापूर, दि.२५ मे-**

पोलिसात केस का केली असे म्हणत एकास लाथाबुक्क्याने व दगडाने मारहाण करण्यात आल्याची घटना मोदी रेल्वे बोगद्याजवळ



रविवारी मध्यरात्री घडली. राम हनुमंत जाधव (वय-५१, रा.सेटलमेंट फ्री कॉलनी क्रमांक ६, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. राम जाधव हे रविवारी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास मोदी रेल्वे बोगदाजवळ असताना आदी नायडू, अक्षय नायडू व इतर दोघा जणांनी मिळून लाथाबुक्क्या व दगडाने मारहाण केली. यात डोक्याला जखम व हाताला मार लागल्याने त्यांना ओंकार जाधव यांनी शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले.

### शिष्यवृत्ती परीक्षेत आदर्श पब्लिक स्कूलचा यशाचा नवा विक्रम

**कुर्डूवाडी, दि, २५ मे-**

इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत कुर्डुवाडीच्या आदर्श पब्लिक स्कूलने यशाचे नवे रेकॉर्ड प्रस्थापित केले आहे. शाळेच्या उत्कृष्ट आणि नियोजनबद्ध स्पर्धा परीक्षा पॅटर्नमुळे १४९ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ११४ विद्यार्थी पात्र ठरले. अनेक विद्यार्थ्यांनी २०० हून अधिक गुण मिळवले. अभूतपूर्व यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अमोल सुरवसे व प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. इयत्ता ५ वीच्या चोपडे भार्गवी हिने २५६ गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. त्याखालोखाल शेंडे ओंकार (२५४), पवार स्मरणिका (२५४), घाडगे दुर्वा (२५०), करळे वेदिका (२४८), कदम सार्थक (२४२), देवकते वैष्णवी (२४०), शिंदे स्वरा (२३६), कांबळे आरोही (२३४) आणि क्षीरसागर शिवांश यांनी २३२ गुण मिळवून यश संपादन केले. इतर ६२ विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय गुण घेतले.

# पालक आणि पाल्यांमधील संवादात दुरावा निर्माण होऊ नये : प्रशांत माने



### विंग्ज ऑफ ग्लोरी गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ मे-**

दहावीचा टप्पा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या वयात पालक आणि पाल्यांमधील संवादात दुरावा निर्माण होऊ, नये असा आशावाद दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांनी व्यक्त केला.

द माही वे एज्युकेशनल अँड चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित विंग्ज ऑफ ग्लोरी या इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते.

याप्रसंगी ज्येष्ठ सिने-नाट्य कलावंत तथा तरुण भारत डिजिटलच्या संपादिका अश्विनी अमीर तडवळकर, इंडियन मॉडेल स्कूलच्या मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, ऑफलाईन अनअकॅडमी सेंटरचे राकेश कुमार झा, डॉ.राजीव मोहोळकर, द माही वे एज्युकेशनल अँन्ड चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष रवींद्र मोहोळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने पुढे म्हणाले, या वयात पालक आणि पाल्य यांच्यात सतत संवाद होणे आवश्यक आहे. आज अनेक कुटुंबांमध्ये संवादाचा अभाव निर्माण होताना दिसतो आणि त्यातून दुरावा वाढत जातो. पालकांनी मुलांवर केवळ गुणांचे दडपण न आणता त्यांच्या भावना, अडचणी आणि स्वप्न समजून घ्यायला हवीत. मुलांनाही आपल्या मनातील गोष्टी पालकांशी मोकळेपणाने बोलता आल्या पाहिजेत. हा संवाद टिकून राहिला, तर अनेक धोके आणि चुकीचे निर्णय टाळता येऊ शकतात.

रवींद्र मोहोळकर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील पहिली शाळा म्हणजे घर. पालकांनी मुलांना केवळ शिक्षणच नव्हे तर चांगले विचार, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जाणीव दिली पाहिजे. यश मिळवताना माणुसकी जपणे तितकेच महत्त्वाचे आहे. डॉक्टर आणि इंजिनिअर यांच्यापुरतेच करिअर मर्यादित राहिलेले नाही. कला, क्रीडा, पत्रकारिता, डिजिटल माध्यम, व्यवस्थापन, अभिनय, संशोधन, उद्योजकता अशा अनेक क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी इतरांशी तुलना न करता स्वतःच्या आवडी आणि कौशल्यांनुसार करिअर निवडावे.

इंडियन मॉडेल स्कूलच्या मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी म्हणाल्या, यश प्राप्तीसाठी कष्टाशिवाय पर्याय नाही विद्यार्थ्यांनी कोणत्याही शॉर्टकट मार्गाचा अवलंब करू नये. प्रास्ताविकात संस्थापिका रश्मी मोहोळकर यांनी ट्रस्टच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा आढावा घेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा उपक्रम असल्याचे सांगितले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कुणाल विशाखा अनिल बाबरे यांनी सूत्रसंचालन केले. अपूर्वा अशोक जाधव यांनी आभार मानले. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र नीरा नरसिंहपूर येथे नदी स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ मे-**

नदी स्वच्छता व जल संवर्धन अभियान २०२६ अंतर्गत अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणित) श्री स्वामी समर्थ केंद्र अकलूज व माळीनगर (जि.सोलापूर) यांच्या वतीने पर्यावरण प्रकृती विभागाच्या वतीने गंगा दशहरा सप्ताहानिमित्त



नीरा नरसिंहपूर येथील संगमावरील नीरा-भीमा नदी किनारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

अभियानात केंद्रातील सेवेकरी परिवारातील महिला व पुरुष सेवेकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. नदी परिसराची स्वच्छता करत लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

उपस्थितानी नदीचे पावित्र्य जपण्याची, प्लास्टिक व कचरा नदीत न टाकण्याची आणि नदी संवर्धनासाठी प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमादरम्यान नदी पूजन करून नदीचा मानसन्मान सेवा रुजू करण्यात आली.

अभियानांतर्गत नदी परिसरातील प्रदुषण कमी करण्यासाठी श्रमदान करण्यात आले.तसेच नीरा-भीमा नदीची पूजाही केली. देवस्थानात सर्व सेवेकऱ्यांनी एकत्र 'संक्षिप्त भागवत पाठ' केला. श्री लक्ष्मी-नृसिंह देवस्थानतर्फे सेवेकऱ्यांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली होती.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पेन्शन अदालत, कार्यशाळा उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख आणि त्यांच्या अधिपत्याखालील निवृत्तीवेतनधारकांच्या अडीअडचणींचे निवारण करण्यासाठी आज लातूर येथे विशेष कार्यशाळा आणि पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर महालेखाकार आणि लातूर जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील डीपीडीसी हॉलमध्ये या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत नागपूर महालेखापाल कार्यालयाचे वरिष्ठ लेखाधिकारी मैथिली जगन्नाथन, सहायक लेखाधिकारी चेतनकुमार गुप्ता आणि लेखापाल समिर मीना यांनी उपस्थित सर्व कार्यालय प्रमुखांना निवृत्ती वेतन प्रकरणे (पेंशन पेपर्स) अत्यंत अचूकपणे कसे सादर करावेत, याबाबत सविस्तर व तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच निवृत्तीवेतनधारकांना येणाऱ्या विविध अडचणी व समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत त्यांचे जागेवरच निराकरण केले.



## विविध वृत्त...

### नीट परीक्षा रद्द; तणावग्रस्त विद्यार्थिनीची आत्महत्या

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीला नीट परीक्षाही सोपी गेली होती. इंजिनिअर बहिणीप्रमाणेच यशस्वी होऊन डॉक्टर होण्याची आशा होती. परंतु, ऐनवेळी नीट परीक्षेचा पेपर फुटल्याने परीक्षा रद्द झाली. यामुळे तणावात जाऊन एका १८ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील गोंदेगाव येथे नुकतीच घडली. याप्रकरणी गातेगाव पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

गोंदेगाव येथील मैथिली अशोक सोनवणे (वय १८, रा. गोंदेगाव ता. जि. लातूर) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे

नाव आहे. मैथिलीला बारावी विज्ञान शाखेत ५१.५० टक्के गुण मिळाले होते. नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेचा पेपरही तिला सोपा गेला होता. यात चांगले गुण मिळविण्याचा तिला विश्र्वास होता. परंतु, नीट पेपरफुटीमुळे ऐनवेळी परीक्षा रद्द झाल्याने तिच्या मनावर ताण आला. यातून काही दिवस ती स्वतःला खात होती. या तणावातूनच तिने गेल्या शनिवारी (दि.१६) गळफास लावून आत्महत्या केली. मुलीच्या आत्महत्येने सोनवणे कुटुंबीय मानसिक तणावाखाली होते. यामुळे मुलीच्या वडीलांच्या फिर्यादीवरून रविवारी (दि.२४) गातेगाव पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### लातूर पॅटर्नचे हित जोपासण्यासाठी बांधील : कव्हेकर



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : लातूरच्या संस्था व ट्युशन चालक यांच्या योगदानातून व विद्यार्थ्यांच्या मेहनतीतून निर्माण झालेला लातूर पॅटर्न बदनाम करण्याचे षडयंत्र होवू लागले आहे. नीट पेपर फुटी प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई व्हावी, अशी भूमिका भारतीय जनता पक्षाची आहे. मात्र आपल्या स्वार्थी वृत्तीने लातूर पॅटर्न बदनाम करणाऱ्या प्रवृत्तींना ठोस उत्तर देवून लातूर पॅटर्नचे हित जोपासण्यासाठी बांधिल असल्याची ग्वाही भारतीय जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी दिली आहे.

नीट पेपर फुटी प्रकरणावरून उद्योग भवन परिसरातील खाजगी शिवकणी चालक, हॉस्टेल चालकांसह छोट्या मोठ्या व्यवसायिकांच्या जागेचा प्रश्र्न ऐरणीवर आलेला आहे. जिल्हा उद्योग केंद्राने बजावलेल्या नोटीसीमुळे संभ्रमीत झालेल्यांनी

एकत्रित येवून लातूर पॅटर्न बचाव कृती समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या बैठकीत अजित पाटील कव्हेकर बोलत होते. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून लातूर पॅटर्न अबाधित ठेवणे ही सर्व लातूरकरांची सामुहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. लातूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा अधिक नावलौकिक व्हावा यासाठी शासन व प्रशासन स्थावर पाठपुरावाही केला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ज्या चुका झाल्या आहेत त्या

चूका सुधारून संस्था व ट्युशन चालकांमध्ये सातत्याने संवाद होणे आवश्यक असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. यावेळी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, नगरसेवक ॲड. दिपक मठपती, प्रविण कस्तुरे, ऋषिकेश राजे, राजश्री धोत्रे, विनय जाकते, मिना गायकवाड, प्रविण सावंत, पुनित पाटील, ओम धरणे यांच्यासह उद्योग भवन परिसरातील ट्युशन व हॉस्टेल चालक, छोटे-मोठे व्यवसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ट्युशन एरियाला 'स्पेशल एज्युकेशन झोन' चा दर्जा मिळण्यासाठी पाठपुरावा

## भाजपानेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी दिला शब्द



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी दिलेल्या, लातूर इंडस्ट्रियल इस्टेट वसाहतीतील अनेक कोचिंग क्लासेस , हॉस्टेल्स, खानावळी आणि इतर व्यवसाय बंद करण्याच्या आदेशाला आव्हान देत, या उद्योग भवन परिसरास ' स्पेशल एज्युकेशन झोन' म्हणून मान्यता मिळण्यासाठी आपण पाठपुरावा करू, अशा शब्दांत भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लातूर पॅटर्न बचाव कृती समितीने ट्युशन एरियात आयोजित केलेल्या बैठकीत समितीचे सर्वतोपरी समर्थन केले. या समितीच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत, असा दिलासाही देत त्यांनी, गरज पडल्यास या प्रश्र्नावर न्यायालयाचे दरवाजे ठेवण्याचा इशाराही दिला.

जिल्हा उद्योग केंद्राच्या नव्या आदेशा मुळे हवालदिल झालेल्या ट्युशन एरियातील अन्य व्यावसायिकांच्या बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस लातूर शहर भाजपाचे जिल्हाध्यक्ष अजित सिंह पाटील कव्हेकर, भाजपाचे सरचिटणीस प्रवीण कस्तुरे नगरसेवक व माजी स्थायी सभापती ड. दीपक मठपती, नगरसेवक विनय जाकते ,ऋषिकेश राजे, राजश्री धोत्रे, ड. मीना गायकवाड, प्रवीण सावंत पुनित पाटील ,ओम धरणे आदी उपस्थित होते.

डॉ. अर्चनाताई पाटील पुढे म्हणाल्या, शिक्षणाचा लातूर पॅटर्न घडविण्यात शहरासह लातूर जिल्ह्यातील विविध संस्थाचालकांचा सिंहाचा वाटा असला तरी यामध्ये शिकवणी चालक यांच्यासह संबंधित व्यावसायिकांचा खारीचा वाटा आहे. शिक्षणातील या लातूर पॅटर्नमुळे लातूरच्या अर्थकारणाला गती मिळाली असून त्यामुळे लातूर शहराच्या विकासास हातभार लागला आहे. नीट पेपर फुटी मुळे हा पॅटर्न बदनाम करण्याचा डाव काही जणांकडून सुरू असला तरी लातूर पॅटर्न हे बावन्नकशी सोने आहे, हे वारंवार सिद्ध झाले आहे. हा पॅटर्न जपण्याची आणि त्यास बदनामीपासून वाचविण्यासाठी लातूरकर म्हणून तुम्हा आम्हा सर्वांची जबाबदारी आहे. लातूर पॅटर्न काळीमा लागणार नाही याची दक्षता आपण निश्र्चितच घेऊ. उद्योग भवन परिसरातील शिकवणी चालकांसह व्यावसायिकांच्या जागेचा प्रश्र्न आज संकट म्हणून आपल्यासमोर उभा ठाकला आहे. या संकटाला संधी समजून आपण सर्वजण लातूरचे अर्थकारण जशास तसे ठेवून लातूर पॅटर्नला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी एकत्रितपणे काम करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. लातूर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी परिसराला पुन्हा गतवैभव मिळवून देण्यासाठी या परिसराला स्पेशल एज्युकेशन झोन म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. या संदर्भात आपण उद्या सोमवारी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची वेळ घेऊन शिष्टमंडळासह त्यांच्या समोर व्यावसायिकांची बाजू मांडणार आहोत .

समितीच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने पुढे जाऊ. शेवटी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस यांचीही भेट घेऊन त्यांना साकडे घालू, असे आश्र्वासन अर्चनाताईंनी दिले. मुख्यमंत्री निश्र्चितच याचा विचार करून न्याय देतील असा विश्र्वासही त्यांनी शेवटी व्यक्त केला.

या बैठकीच्या सुरुवातीस लातूर पॅटर्न बचाव कृती समितीच्या सदस्यांनी आपले म्हणणे मांडत आपल्या अडचणींचा आणि व्यथांचा पाढा अर्चनाताई पाटील यांच्यासमोर वाचला. बैठकीपूर्वी अर्चनाताईंनी ट्युशन एरिया भागातील काही व्यवसायिकांना समक्ष भेटून त्यांच्या अडचणी व प्रश्र्न जाणून घेतले.

# सन्मान कर्तृत्वाचा पुरस्कार सोहळा, 'काव्यरंग' कवी संमेलन उत्साहात



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीच्या वतीने आयोजित 'सन्मान कर्तृत्वाचा' राज्यस्तरीय पुरस्क ार वितरण सोहळा आणि 'काव्यरंग' कवी संमेलन दयानंद सांस्कृतिक सभागृह येथे मोठ्या उत्साहात व रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीचे अध्यक्ष नागनाथ गित्ते हे होते. तर उद्घाटक म्हणून लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक अमोल तांबे, पत्रकार विलास बडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दिशा प्रतिष्ठान, समर्पण फाउंडेशन, आदर्श मैत्री फाउंडेशन, ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन, तुकाराम पाटील मित्र मंडळ आणि बालरंगभूमी परिषद या संस्थांचा गौरव करण्यात आला. तसेच पत्रकार शशिकांत पाटील, आसावरी बोधनकर-जोशी, सुशील सूर्यवंशी, महेश हेड्डा, बालाजी जगताप, सन्मान कर्तृत्वाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सहित अण्णाराव खोडेवाड, संजय राजुळे, दिपाली आणि अंजली राठोड यांना 'सन्मान कर्तृत्वाचा' या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि प्रमुख वक्ते विलास बडे यांनी उपस्थितांना संबोधित केले. महाराष्ट्रातील नामवंत कवी नारायण पुरी, रविंद्र केसकर, काव्यरंग कवी संमेलन निलेश चव्हाण, गुंजन पाटील आणि अविनाश भारती यांनी आपल्या सुंदर कवितांचे सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली. कवी संमेलनामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष नागनाथ गित्ते यांनी केले. सूत्रसंचालन अनिल पुरी यांनी केले. तर आभार सचिव ॲड. योगेश शिंदे यांनी मानले.

## दुकानांच शटर फोडून केली पाऊणलाखाची रोकड लंपास

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : शहराच्या अंबजोगाई रस्त्यावरील नेताजी नगर भागात दोन बंद दुकानांचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने गल्ल्यातील ६९ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना शनिवारी रात्री साडे दहा ते रविवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास घडली.

शहराच्या अंबाजोगाई रस्त्यावरील नेताजी नगरमधील सिध्दी रुग्णालयाच्या पूर्व बाजूला फिर्यादी विकास अंकुश गुट्टे यांचे आरोग्य अमृततुल्य नावाचे चहाचे हॉटेल आहे. शनिवारी (दि.२३) रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास आपले हॉटेल बंद करून ते घराकडे गेले. हाच डाव साधून मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने त्यांच्या दुकानाचे शटर एका बाजूने उचकून आत प्रवेश केला.

दुकानातील कपाटात ठेवलेले ५५ हजार रुपये रोख काढून घेतले. त्याचवेळी चोरट्यांनी शेजारच्या साई मेडिकलचेही शटर उचकून आत प्रवेश करीत गल्ल्यातील १४ हजार रुपयांची रोकड चोरून पोबारा केला.

रविवारी पहाटेच्या सुमारास फिर्यादी विकास गुट्टे हे हॉटेल उघडण्यासाठी आले असता दुकानाचे शटर उचकलेले दिसून आले. त्याचप्रमाणे शेजारील मेडिकलचेही शट उचकलेले दिसून आले. दोघांनीही शिवाजी नगर पोलीस ठाणे गाठले. विकास गुट्टे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरोधात शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ज्ञानेश्वर विद्यालयाच्या स्पोर्टस समर कॅम्पचा समारोप

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : लातूर एज्युकेशन सोसायटी लातूर अंतर्गत चालणाऱ्या ज्ञानेश्र्वर विद्यालय लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या १५ दिवसांच्या स्पोर्ट्स समर कॅम्पचा सांगता समारंभनुकताच झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर एज्युकेशन सोसायटी लातूरचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे तर प्रमुख पाहुण्या म्हणून आशा झुंजे पाटील, शालेय उच्च अधिकार समितीचे प्रमुख प्रा. प्रकाशराव शिंगडे, प्राचार्य संजय मलवाडे, भाऊसाहेब उमाटे, बालाजी फड, समाधान बुरगे, अजय आरदवाड, बाळू कोरे, विजय पस्तापूरे, श्रीमती गुणाले तसेच सर्व पालक व कॅम्पचे सर्व विद्यार्थी व आदी मान्यवर उपस्थित होते.

तत्पूर्वी सकाळी यामध्ये जवाहर प्राथमिकच्या मुख्याध्यापिका श्रीमती. साबदे व रघुनाथ मदने यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. समारोप समारंभात सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य संजय मलवाडे यांनी केले. सूत्रसंचलन भाऊसाहेब उमाटे तर आभार समाधान बुरगे यांनी मानले.

## अल निनोच्या भीतीने चाऱ्याचे संकट

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : लातूर : पुढच्या जून महिन्यापासून सुरू होणाऱ्या मोसमी पावसावर अल निनोचा प्रभाव राहणार असल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्र्न निर्माण होणार असल्याच्या पार्श्र्वभूमीवर, पशुसंवर्धन विभागाने जिल्ह्यातील ११ हजार शेतकरी, पशुपालकांना मोफत वैरण बियाणे देण्याचे प्रयोजन ठेवले आहे.

गेल्या २१ मेपासून शेतकरी, पशुपालकांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू केली. २८ मेपर्यंत किमान ११ हजार शेतकरी, पशुपालकांनी अर्जाद्वारे वैरण बियाणे मागणी करायची आहे.

# आयएमए लातूरच्या संसर्ग नियंत्रण सीएमईला प्रतिसाद




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : आयएमए लातूरच्या वतीने प्रभावी संसर्ग नियंत्रणासाठीः मानक प्रतिबंधात्मक उपायांचे सखोल मार्गदर्शन या विषयावर आयोजित वैद्यकीय व्यवस्थापन क्षेत्रातील कौशल्यवृध्दी प्रशिक्षणास डॉक्टरांचा प्रतिसाद मिळाला. यात लातूर शहर व जिल्ह्यातील सुमारे २५० डॉक्टरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत व सचिव डॉ. विश्रांत भारती यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. अवीनाश कुटुंकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमामध्ये संसर्ग नियंत्रण,

आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांचे लसीकरण, पोस्ट एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस निर्जंतुकीक निर्जंतुकीकरण धोरण तसेच यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रात डॉ. आशा कोल्हे यांनी मानक व संक्रमणाचारित प्रतिबंधात्मक उपाय, या विषयावर हात स्वच्छता, एचएआरचा योग्य वापर, श्र्वसन शिष्टाचार व सुरक्षित रुग्ण सेवा पद्धती याबाबत सविस्तर माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात डॉ. सतीश वड्डे यांनी आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांमधील लसीकरण व संसर्गानंतरची प्रतिबंधात्मक उपचारपद्धती या विषयावर मार्गदर्शन करताना लसीकरणाचे महत्त्व व पीईपी मार्गदर्शक तत्वेचे स्पष्ट केली. तीसऱ्या सत्रात डॉ. विजय चिंचोलकर यांनी निर्जंतुकीकरण धोरण या विषयावर स्वच्छत्ता व निर्जंतुकीकरणातील फरक, विविध निर्जंतुकीकरण साधनांचा वापर तसेच पर्यावरण स्वच्छता प्रोटोकॉल याबाबत माहिती दिली. यासीएमई ला महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलतर्फे १ एमएमसी क्रेडिट पॉइंट मान्यता देण्यात आली होती.

कार्यक्रमात संवादात्मक चर्चा, अद्ययावत मार्गदर्शक तत्त्वांची माहिती व पुराव्यावर आधारित संसर्ग नियंत्रण पद्धतींवर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमातील विविध सत्रांसाठी अध्यक्ष म्हणून डॉ. अभय कदम,डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. सारिका देशमुख, डॉ. रवी इरपतगीरे, डॉ. मेघना गुगळे, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. घनश्यम दरक, डॉ. स्नेहल देशमुख, डॉ. आनंद कलमे, डॉ. मंगेश सेलुकर, डॉ. जितेन जैस्वाल, डॉ. विमल डोळे तसेच डॉ. संजय पौळ पाटील हे उपस्थित होते. एमएमसी निरीक्षक म्हणून डॉ. सुबोध सोमाणी यांनी जबाबदारी पार पाडली. या सीएमईच्या यशस्वी आयोजनासाठी लातूर आयएमए वुमन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. श्र्वेता काटकर पवार, सचिव डॉ. आक ांक्षा त्रिपाठी अवस्थी, डॉ. वेदांत अवस्थी, डॉ. हमीद चौधरी तसेच डॉ. अविनाश कुडुकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मुक्या जनावरांसाठी पाणपोईचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २५ मे : पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त मल्हार प्रतिष्ठान व येथील ग्लोबल वे सोशल सर्व्हिसस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यातील मूक्या जनावरांसाठी ३०० पाणपोई सुरु करण्याचा संकल्प करण्यात आला असून, आतापर्यंत १०१ पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून लातूर शहरातील प्रभाग ११ मध्ये पाणपोईचे उद्घाटन मल्हार योध्दे दिपक बोऱ्हाडे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

यावेळी लातूर मनपाचे विरोधी पक्षनेते देविदास काळे, नगरसेविका रागिणी यादव, नगरसेवक पवन सोलंकर, नवनाथ गडदे, रमेश राजे, अदिनाथ मुळे, व्यंकट पशुपालकांतून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.


### जाहीर प्रगटन

आमचे पक्षकार १) माधवराव नागनाथ तोंडारे रा. नळेगांव ता. चाकूर जि. लातूर २) वसंत यशवंतराव जगदाळे रा. लातूर ३) भारत बाबुराव बिराजदार रा. लातूर ४) ओम सोमनाथ हाळे रा. चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून तसेच मला त्यांचे प्राधिकृत विधिज्ञ म्हणून अधिकृत केलेवरून मी पुढीलप्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

लातूर जिल्ह्यातील व परिसरातील तमाम जनतेस व बँक , वित्तीय संस्था, पतसंस्था यांना सदर जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, नोंदणी तुकडी जिल्हा व जिल्हा परिषद लातूर, तालुका व पंचायत समिती लातूर पैकी ग्रामपंचायत मौजे महाराणाप्रताप नगर, लातूर, ता. जि. लातूर येथील जमीन सर्वे नंबर २७/बी/१ पैकी, एकूण क्षेत्र १ हेक्टर १७.५ आर, ज्याची चतुः सिमा, पूर्वेस : कोळपा तांडा शिवरस्ता, पश्र्चिमेसः दिलीप माने यांची जमीन, दक्षिणेसः परमेश्वर माने व महेश वलसे यांची जमीन, उत्तरेसः नितीन गोरे व चंद्रशेखर खानापुरे यांची जमीन. सदर जमिनीचे मूळ मालक संजय नारायण क्षीरसागर रा. मिस्कीनपुरा चौक, लातूर यांनी आमचे पक्षकार १) माधवराव नागनाथ तोंडारे रा. नळेगांव ता. चाकूर जि. लातूर २) वसंत यशवंतराव जगदाळे रा. लातूर ३) भारत बाबुराव बिराजदार रा. लातूर ४) ओम सोमनाथ हाळे रा. चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांच्यासोबत दिनांक १७/०७/२०२३ रोजी 'खरेदीचा ठराव करून ठरावापोटी काही रक्कम स्वीकारली आहे. असे असतानाही, मूळ मालकाने सदर जमीन बेकायदेशीरपणे सदानंद गिरजाप्पा मुढे रा. जवाहर कॉलनी, अहमदपूर यास बेकायदेशीररित्या खरेदीखत करून दिली आहे. सदर बेकायदेशीररित्या खरेदीखत करून दिल्यामुळे आमचे पक्षकार यांनी मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, लातूर येथे दिवाणी दावा क्र. ३२/२०२४ (SUIT FOR SPECIFIC PERFORMANCE) दाखल केला असून तो सद्यस्थितीला न्यायप्रविष्ट आहे. तसेच, मालमत्ता हस्तांतरण अधिनियमाच्या कलम ५२ अन्वये मा. दुय्यम निबंधक कार्यालय लातूर-१ येथे दिनांक ०८/०५/२०२६ रोजी 'दावा न्यायप्रविष्ट असल्याबाबतची नोटीस' (LIS PENDENS) दस्त क्र. ४२१०/२०२६ अन्वये अधिकृतपणे नोंदवून घेतलेली आहे. सदर जमीन पूर्णपणे कायदेशीर वादात अडकलेली आहे.

तरी या प्रगटनाद्वारे तमाम जनतेला, बँकांना व खरेदीदारांना सावध करण्यात येते की, हा न्यायालयीन वाद प्रलंबित असताना जर कोणीही सदर जमिनीमध्ये किंवा व प्लॉटमध्ये खरेदी-विक्रीचा व्यवहार केला, बयाणा दिला, अथवा तारण कर्ज मंजूर केले, तर तो व्यवहार बेकायदेशीर समजला जाईल आणि तो व्यवहार आमचे सर्व पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. अशा व्यवहारांमुळे भविष्यात होणाऱ्या आर्थिक किंवा कायदेशीर नुकसानीला खरेदीदार किंवा संबंधित बँक, वित्तीय संस्था, पतसंस्था स्वतः जबाबदार राहतील.

सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. आर. एन. तोंडारे
रा. नळेगांव. ता. चाकूर जि. लातूर
मो नं ९४२१३६८२२९

जाहीर प्रगटन देणार
१) माधवराव नागनाथ तोंडारे रा. नळेगांव ता. चाकूर जि. लातूर २) वसंत यशवंतराव जगदाळे रा. लातूर ता. जि. लातूर ३) भारत बाबुराव बिराजदार रा. लातूर ता. जि. लातूर ४) ओम सोमनाथ हाळे रा. चाकूर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## राज्यस्तरीय पुरस्काराने कवळीचे जगताप सन्मानित




तभा वृत्तसेवा

औसा दि.२५ मे : लातूर येथे पोलिस दलात सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक पदावर कार्यरत असलेले औसा तालुक्यातील कवळी येथील बालाजी हरिभाऊ जगताप यांनी पोलिस दलात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत लायन्स क्लबच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

लायन्स क्लब लातूर यांच्या वतीने सन्मान कर्तृत्वाचा पुरस्कार २०२६ चा वितरण सोहळा झाला. जिल्हाधिकारी डा. भारत बास्टेवाड, पोलिस अधिक्षक अमोल तांबे, प्रमुख वक्ते विलास बडे यांच्या प्रमुख उपस्थितीत लायन्स क्लब लातूरचे अध्यक्ष नागनाथ गित्ते, कोषाध्यक्ष ईश्‍वरप्रसाद चांडक, संयोजक अनिल पुरी, सचिव योगेश शिंदे व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

लायन्स क्लबच्या वतीने समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आणि दीपस्तंभ सारख्या मान्यवरांचा यथोचित गौरव करून सन्मान करण्यात येतो. सन २०२६ च्या पुरस्कारामध्ये लातूर पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक व औसा तालुक्यातील कवळी येथील बालाजी हरिभाऊ जगताप यांना पुरस्काराने गौरवण्यात आले.बालाजी जगताप यांनी पोलीस विभागात केलेल्या उत्कृष्ट कामाची दखल घेत लायन्स क्लब लातूर च्या वतीने त्यांची निवड करण्यात आली असल्याचे लायन्स क्लबच्या वतीने यावेळी सांगण्यात आले आहे.

## मोकाट रोगी कुत्र्यांचा बंदोबस्त करा प्रभुराज प्रतिष्ठानची गांधीगिरी मार्गाने लक्षवेधी

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२५ मे : प्रभुराज प्रतिष्ठान, लातूरच्या वतीने लातूर मनपा व नाना नानी पार्क परिसरात कुत्र्याचे मुखवटे परिधान करून मोकाट खरजुल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीसाठी गांधींगिरी करण्यात आली.

लातूर शहरात अनेक भागात व गल्ली बोळात तसेच मेन रोड अशा अनेक ठिकाणी मोकाट ५० ते १०० कुत्र्यांचा कळप संखेने दिसून येतो. अशा मार्गाने चालत जाण्यासाठी नागरिकांना जीव मुठीत घेऊन जावे लागते. लहान बालकांना खेळनेही जिकरिचे झाले आहे. यात बऱ्याच बालकांना या कुत्र्यांच्या चाव्याने जखमी व्हावे लागले. त्यात कांही जणांना प्राण ही गमवावा लागला. सकाळी व रात्री फिरायला जाणाऱ्या जेष्ठ नागरिकांना या दबुन बसलेल्या कुत्र्यांच्या कळपाची भीती वाटू लागली. या कुत्र्यांचा कळप आंगावर सार्थ अभिमान येईल. या कुत्र्यांच्या त्रासापसुन नागरिक हैरान झाले आहेत.

मोकाट कुत्रे वाहन चालकाचा पाटलाग करतात. त्या पासुन वाचन्यासाठी ते प्रयत्न करत असतांना अपघात होऊन जखमीही होतात. यात विद्यार्थी जास्त बळी पडतात. क्लासला जान्याच्या हेतुने तो वाहन वेगाने चालितो. त्यात या कुत्र्याचा पाटलाग अशा सर्व बाबी मनपा प्रशासनास निवेदना मार्फत निर्दर्शनास आणून देखील या गंभीर प्रकारावर दुर्लक्ष करीत आहे.

लातूर शहरातील गंभीर प्रश्र्न दुर्लक्षित करणाऱ्या मनपा प्रशासनाचे लक्ष वेधन्यासाठी सामाजिक कार्यकर्ते ॲड. अजय कलशेट्टी यांच्या नेतृत्वात नागरिकांनी हातात बोलके झूल पकडत, आता तरी करा बंदोबस्त ! हद्दपार करुण दाखव असे मनपा प्रशासनास आव्हान केले. आता या आव्हानाचा मनपा कसे सामना करतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

यावेळी ॲड. अजय कलशेट्टी, ॲड. शिरीष दहिवाल, ॲड. सचिन बावगे, सूर्यप्रकाश धूत, शिरीष माळी, डॉ. संजय जमादाडे, डॉ. राजकुमार तोष्णीवाल, डॉ. श्रीराम कोळेकर, अभिजित सिरसाठ, विलास भुमकर, प्रकाश साठे, राम बरचे, शिवा धुळे, महेश खेकडे, हुसेन पठान, महेश बावगे, गजानन हुंडेकरी, पारस चापशी, अर्जुन स्वामी, अशोक कांबळे, दत्ता ढगे, विष्णू बंग, शिवा रोडे, लक्ष्मन सबणीस आदी उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालयात शिबिरात ५४ बिनटाका शस्त्रक्रिया

तभा वृत्तसेवा

निलंगा दि.२५ मे : आधुनिक वैद्यकीय सुविधा ग्रामीण भागातील रुग्णांना स्थानिक पातळीवरच मिळाव्यात, या उद्देशाने निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात रविवारी (दि. २४ मे) विशेष लॅप्रोस्कोपिक (बिनटाका) शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. या शिबिरात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एकाच दिवशी तब्बल ५४ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्याने, परिसरातील सर्वसामान्य रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या शिबिरासाठी शनिवारी (दि. २३ मे) रुग्णांची तपासणी व नोंदणी करण्यात आली होती. त्यानंतर रविवारी सकाळपासून तज्ज्ञ लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ. खरे यांनी या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्या. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विश्र्वेष कुलकर्णी, भूलतज्ज्ञ डॉ. दिनकर पाटील, आणि मेट्रन डॉ. किरवे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना पैशांअभावी मोठ्या शहरातील खासगी रुग्णालयात जाऊन महागडे उपचार घेणे शक्य होत नाही. अशा रुग्णांसाठी शासनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर उपलब्ध झालेली ही अत्याधुनिक आरोग्यसेवा मोठा आधार ठरली आहे. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, आरबीएसके टीम, वॉर्ड एकच्या प्रभारी कदम, ऑपरेशन थिएटर प्रभारी माने, डॉ. विशाल पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले. शिस्तबद्ध नियोजनामुळे हा उपक्रम १०० टक्के यशस्वी झाल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.



लॅप्रोस्कोपी-सुरक्षित आणि वेदनारहित उपचार लॅप्रोस्कोपी (बिनटाका) ही आधुनिक वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत प्रभावी उपचार पद्धती आहे. या पद्धतीत पारंपरिक शस्त्रक्रियेप्रमाणे शरीरावर मोठा छेद न देता केवळ छोट्या छिद्रांद्वारे गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी केली जाते. यामुळे रुग्णाला कमी वेदना होतात, रक्तस्राव नगण्य होतो आणि संसर्गाचा धोकाही टळतो. कमीत कमी दिवसांत रुग्ण बरा होऊन आपल्या दैनंदिन कामाला लागू शकतो, हे या आधुनिक तंत्रज्ञानाचे मोठे यश आहे.

भविष्यातही अधिकाधिक रुग्णांना लाभ देण्याचा प्रयत्न......

शासनाच्या आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागातील नागरिकांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण उपचार सहज उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरात एकूण ५४ रुग्णांची बिन टाका शास्त्रक्रिया प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली. भविष्यातही अधिकाधिक रुग्णांना याचा लाभ मिळावा यासाठी उपजिल्हा रुग्णालय प्रशासन प्रयत्नशील राहणार आहे.
.....डॉ. कुलकर्णी, वैद्यकीय अधीक्षक.....

## खरिपाच्या खते, बियाणांचे नियोजन

लातूर : शेती शिवारात सध्या हंगामपूर्व मशागतीची कामे सुरू आहेत. दुसरीकडे ऐन हंगामात खत, बियाणांची टंचाई भासू नये म्हणून आतापासूनच बळिराजा तयारीला लागला आहे. अल-निनोचा प्रभाव यंदाच्या पावसाळ्यावर होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. तर दुसरीकडे युद्धजन्य परिस्थितीमुळे रासायनिक खतांचा तुटवडाही जाणवणार असल्याचा अंदाज शासनानेच व्यक्त केल्यने शेतकऱ्यांमध्ये धास्ती आहे.

घरचे बियाणे अन् विक्रीची खते खरेदी करण्याचे नियोजन सुरू आहे.

खते व बियाणाची कमतरता भासणार नाही याची दक्षता प्रशासन घेत आहे.

# जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांच्या हस्ते राजुळे यांचा राज्यस्तरीय गौरव

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२५ मे : लातूर येथील दयानंद सभागृहात दिनांक २३ मे २०२६ रोजी लॉयन्स क्लब ऑफ लातूर सिटी यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सन्मान कर्तृत्वाचा पुरस्कार सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते राजुळे यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. समाजासाठी सातत्याने आणि निस्वार्थ भावनेने करत असलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक अमोल तांबे तसेच न्यूज १८ लोकमतचे सहसंपादक विलास बडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, शिक्षक, डॉक्टर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री.संजय राजुळे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, आरोग्य आणि जनजागृती क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असून त्यांनी आपले आरोग्य आपली जबाबदारी या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशभर आरोग्य जनजागृतीचे व्यापक कार्य सुरू केले आहे. या अभियानांतर्गत त्यांनी व्यसनमुक्ती जनजागृती, आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, गरजू रुग्णांना मदत, विशेषतः कॅन्सरग्रस्त रुग्णांना आर्थिक व मानसिक आधार देणे, जैविक शेतीचा प्रसार, वृक्षलागवड, स्वच्छता मोहीम तसेच अनाथ, गरजू आणि दिव्यांग मुलांना मदत असे विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत.

त्यांच्या कार्यामुळे अनेक नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यास मोठी मदत झाली आहे. विशेषतः युवकांना व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संदेश देत निरोगी आणि सशक्त समाज घडविण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. सन्मान कर्तृत्वाचा हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याने आपले आरोग्य आपली जबाबदारी परिवारासह त्यांच्या सहकार्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून हा क्षण संपूर्ण परिवारासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी ठरला आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून राजुळे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था धाराशिव,लातूर,बीड विधानपरिषदेवर अरविंद पाटील निलंगेकर यांना संधी द्यावी कार्यकर्त्यांची जोरदार मागणी

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २५ मे : आगामी स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर भाजपचे युवानेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांना उमेदवारी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे.



निलंगा तालुक्यासह जिल्हाभरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे उमेदवारी बाबत विचार करावा असा सोशल मीडियावर दोन दिवसापासून ट्रेंड पाहायला मिळत आहे.

अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांनी अनेक वर्षांपासून जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय योगदान देत विविध विकासकामे मार्गी लावली आहेत.

ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकरी, युवक व स्थानिक स्वराज्य संस्थांशी त्यांचा सातत्याने संपर्क राहिला आहे. दहा वर्षांपूर्वी लातूर जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असत त्या ठिकाणी भाजपला झिरो टू हिरो करण्यात अरविंद पाटील निलंगेकर यांचा सिंहाचा वाटा राहीला आहे.

निलंगा विधानसभा मतदारसंघातील निलंगा, शिरुर अनंतपाळ व देवणी तालुक्यात तर एकहाती सत्ता राहीली आहे.

अनेकदा संधी मिळूनही त्यांनी कोणतेही पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी लाभाचे पद स्वतः घेतले नाही. कार्यकर्त्यांसाठी आहोरात्र झटणाऱ्या नेत्याला धाराशिव, लातूर, बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषदेची उमेदवारी मिळावी अशी मागणी सध्या ट्रेंडमध्ये दिसून येत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांमध्येही त्यांच्याबाबत सकारात्मक वातावरण असून, त्यांना उमेदवारी दिल्यास पक्षाला मोठा फायदा होईल, असा विश्र्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील पंचायत समिती, नगर परिषद व जिल्हा परिषद सदस्यांनीही त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविल्याचे बोलले जात आहे. भाजपच्या विचारधारेवर अढळ निष्ठा ठेवून त्यांनी पक्ष संघटनेसाठी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले आहे.

केवळ वरवरची विधाने करण्यापेक्षा, प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करण्यावर त्यांचा नेहमीच भर राहिला आहे. बूथ पातळीवरील कार्यकर्त्याला ताकद देण्यापासून ते संपूर्ण मतदारसंघाचे आणि जिल्ह्याचे एक मजबूत जाळे विणण्यापर्यंतचे त्यांचे संघटनात्मक कौशल्य खरोखरच वाखाणण्याजोगे आहे.

दरम्यान, पक्षश्रेष्ठींनी स्थानिक कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

# काविराबाई शिंदे यांचे निधन



तभा वृत्तसेवा

निलंगा दि.२५ मे : निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील स्वातंत्र्यसेनानी दिवंगत भिवाजी शिंदे यांच्या पत्नी काविराबाई भिवाजी शिंदे (वय १०२ वर्ष) यांचे सोमवार दि. २५ मे रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने अंबुलगा परिसरासह संपूर्ण निलंगा तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

काविराबाई शिंदे यांनी आपल्या आयुष्याची शतकी खेळी पूर्ण केली होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी स्वातंत्र्यसेनानी भिवाजी शिंदे यांना खंबीर साथ दिली. त्यांच्या पश्र्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्या ज्येष्ठ समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे व अंबुलगा बु. चे माजी सरपंच सुभाष शिंदे यांच्या मातोश्री होत.

स्व. काविराबाई शिंदे यांच्या पार्थिवावर मंगळवार दि. २६ मे रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या स्वतःच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवरांनी दुःख व्यक्त करत शिंदे कुटुंबियांचे सांत्वन केले आहे.

# बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्त विविध कार्यक्रम साजरे करा : बालाजी रेड्डी

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २५ मे : येथील 'शिवनेरी' शिवसेना कार्यालयात शिवसेना लातूर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूर -चाकुर, उदगीर -जळकोट विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



शिवसेना उपजिल्हाप्रमुख भारत सांगवीकर, युवा सेना जिल्हाप्रमुख लक्ष्मण पेटकर, उदगीर विधानसभा समन्वयक स्वप्नील जाधव यांची उपस्थिती होती. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार, युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संपर्क प्रमुख मा.आमदार रोहिदास चव्हाण यांच्या सुचनेनुसार लातूर जिल्ह्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अहमदपूर -चाकुर, उदगीर - जळकोट विधानसभा मतदारसंघात भव्य रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर,वकृत्व स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, बाळासाहेब ठाकरे यांच्या जिवनावर व्याख्यानमाला,शिवसेना सदस्य नोंदणी, गाव तेथे शाखा घर तिथे शिवसैनिक या अभियानात सहभागी होऊन प्रत्येक गावात शाखेची स्थापना करण्यात यावी असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांनी पदाधिकाऱ्यांना दिली. त्याच बरोबर पदविधर निवडणूकीसाठी पदविप्राप्त मतदारांची नावं नोंदणी करण्यात यावी असे मत व्यक्त केले. यावेळी उपजिल्हा प्रमुख भारत सांगवीकर, लक्ष्मण पेटकर, स्वप्नील जाधव,गणेश माने यांनी मनोगत व्यक्त केले. जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकारी गोविंद बेंबडे उदगिर- जळकोट विधानसभा संघटक, मंगेश येरकुंडे उदगिर शहर संघटक, सुजीत मुळे उपतालुकाप्रमुख चाकुर, धोंडीराम मुट्ठे चाकुर तालुका संघटक यांची निवड जाहीर करून निवडीचे पत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिकेत फुलारी यांनी तर सूत्रसंचालन सुभाष गुंडीले यांनी केले.

यावेळी तालुका प्रमुख प्रशांत मोरे, दत्ता हेंगणे, युवा सेना तालुका प्रमुख नागेश कोंबडे, बालाजी काळे, शहर प्रमुख शिवा कासले, शिवा भारती, मंगेश यरकुंडे, सुधाकर जायभाय, माऊली देवकत्ते,गणेश राठोड, इस्माईल अब्दुल रहीम, महेश महापुरे, दत्ता कदम, गजानन यन्ने, पद्माकर पेंढारकर, शिवा मोरार, अरुण बिरादार, गोविंद बेंबडे, शिवकांत सरनाळे, व्यंकट साबणे, सारंग आगलावे, धोंडीराम गुट्टे, मारुती बडे, कालिदास धुळगुंडे,सुजित मुळे, दत्ता पावडे, भगवान कदम, बापूराव देऊळकर, गंगाधर कल्याणे, पांडुरंग परीट, नीलकांत परतवाघ , यांच्यासह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# क्राईस्ट इंटरनॅशनल स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश


श्रेया संतोष पाटील


नागसेन मिलिंद दाभाडे


पार्थ संतोष सारोळे


स्वरांजली संदीपान मुंढे

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २५ मे : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत क्राईस्ट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता कायम राखली आहे.

इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत पार्थ संतोष सारोळे याने २२४ गुण मिळवत विशेष प्राविण्य प्राप्त केले. तसेच नागसेन मिलींद दाभाडे १९४, स्वरांजली संदीपान मुंढे १८८, राजनंदिनी ज्ञानोबा हाक्के १५४, वैदेही सचिन पडीले १४४, कृष्णा गोविंद वलसे १३६, तनुजा किशन सोगेवाड १३४ आणि सफवान मुनवर शेख १२६ गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले.

इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत श्रेया संतोष पाटील हिने १६६ गुण मिळवत उत्कृष्ट यश मिळविले. तसेच श्रेया सूर्यकांत गोरे १५२, माधव तिरुपती गुट्टे १४६, सोहम प्रशांत वाघमोडे १३६, साईराज वैभव लव्हराळे १३० आणि सोहम शाहीनाथ घायाळ १२६ गुण प्राप्त करून यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशासाठी शाळा समन्वयक संगमेश्र्वर ढगे यांनी मेहनत घेतली तसेच शाळेतील शिक्षकांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या पालकांचे सहकार्यही मोलाचे ठरले. संस्थाध्यक्ष जीवनकुमार मद्देवाड, शाळेच्या सीईओ श्रीमती रितू मद्देवाड माले, शाळेचे संचालक दादासाहेब गायकवाड, जिल्हा स्काऊट संघटक शंकर चामे, प्राचार्या जेबाबेरला नादार, मार्केटिंग हेड भाऊसाहेब यादव यांनी उत्तीर्ण विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मळगीवाडीत महिलेस मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मे -**
मळगीवाडी येथे शेतातील माती टाकण्याच्या कारणावरून ६५ वर्षीय महिलेला शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आनंद मनोहर मुगळे, आकाश आनंद मुगळे, सरोजा आनंद मुगळे (सर्व रा. मळगीवाडी, ता. उमरगा) व गणेश अभिमन्यू गायकवाड (रा. डिग्गी, ता. उमरगा) अशी आरोपींची नावे आहेत. दि.२० मे २०२६ रोजी सकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी निर्मलाबाई आण्णाराव घोंगडे (वय ६५, रा. मळगीवाडी) यांना आमच्या शेतातील अरण खोदलेली माती तुमच्या शेतात का टाकली? या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी, काठी व दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची फिर्याद देण्यात आली. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# प्रलंबित मागण्यांसाठी हमालांचे राज्यव्यापी धरणे आंदोलन

### थकीत मजुरी तात्काळ द्या; अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मे -**
राज्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये कार्यरत असलेल्या नोंदणीकृत हमालांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी धरणे आंदोलन छेडले आहे. माथाडी कायद्यातील तरतुदीनुसार माथाडी मंडळाकडे नोंद असलेले हे हमाल अनेक वर्षांपासून शासकीय धान्य गोदामात काम करत असून शासनाच्या विविध निर्णयांनुसार त्यांची मजुरी माथाडी मंडळामार्फत त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते.

मात्र, राज्य शासनाने स्वीकारलेल्या थेट वाहतूक धोरणामुळे गोदामातील कामात मोठी घट झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्या हमालांनी केला आहे. अन्न महामंडळाच्या डेपोतून थेट स्वस्त धान्य दुकानांपर्यंत धान्य पोहोचवून तेथेच वजन व उतराई केली जात असल्याने गोदामातील हमालांचे रोजगार कमी झाले असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात हमालांनी शासनाकडे विविध मागण्या केल्या आहेत. ज्या गोदामातील काम थेट वाहतुकीत गेले आहे ते काम संबंधित गोदामातील नोंदणीकृत हमालांकडूनच करून घेण्याचे बंधन वाहतूक कंत्राटदारांवर घालावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माथाडी मंडळाने निश्चित केलेल्या हमाली दराप्रमाणे मजुरी व त्यावरील लेव्ही माथाडी मंडळाकडे जमा करण्याची सक्ती कंत्राटदारांवर करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

राज्यातील गोदाम हमालांना गेल्या पाच महिन्यांपासून मजुरी मिळालेली नसल्याचा आरोप करत थकीत मजुरी तात्काळ अदा करावी व दरमहा नियमित मजुरी मिळण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. याशिवाय, महागाई निर्देशांकाचा लाभ हमालांना न मिळता तो कंत्राटदारांकडे वळवण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

याची चौकशी करून महागाई निर्देशांकाचा निधी व त्यावरील लेव्हीसह रक्कम थेट माथाडी मंडळाकडे जमा करण्याचे स्पष्ट आदेश जिल्हा पुरवठा कार्यालयांना द्यावेत, अशी मागणी हमालांनी केली आहे.

या मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा राज्यातील हमाल संघटनांनी दिला आहे. यावेळी कडप्पा बीडबाज, विलास गायकवाड, सुनील रसाळ, शहाजी कसबे, गणेश पावणे, संभाजी ठवरे, बालाजी बनसोडे, रशीद सय्यद, बंडू कांबळे, कलीम डांगे आदी उपस्थित होते.

# एनव्हीपी शुगरमध्ये तृतीय गळीत हंगामाचे मिल रोलर पूजन

### १ ऑक्टोबरपूर्वी कारखाना सुरु करण्याचे चेअरमन बालाजी पाटील यांचे निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मे -**
धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा. लि. या कारखान्यात २०२६-२७ च्या तृतीय गळीत हंगामाचे मिल रोलर पूजन सोमवारी (दि. २५) कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता पाटील यांच्या हस्ते विधिवत पूजन करून करण्यात आले.

कारखान्याने चाचणी गळीत हंगामापासून सलग तीन वर्षे कारखान्यास गाळपास आलेल्या संबंधित शेतकऱ्यांचे ऊस बिल पंधरवाडा संपल्यानंतर दर महिन्याच्या १ व १६ तारखेला अदा केलेले आहे.

यापुढेही ही परंपरा कायम ठेवण्यात येणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

गळीत हंगाम २०२६-२७ मध्ये पूर्ण क्षमतेने कारखाना चालवून १ लाख ५० हजार मेट्रिक टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तोडणी-वाहतुकीचे करार पूर्ण करून ठेकेदारांना पहिला हप्ता देण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

कारखाना निर्धारित वेळेत म्हणजेच १ ऑक्टोबरपूर्वी सुरू करण्यासाठी सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी संबंधित विभागांना दिल्या.

याप्रसंगी मुख्य शेतकी अधिकारी जयवंत रोहिले, चिफ इंजिनिअर ओंकार मोकाशे, विजय वाघे, प्रविण पाटील, सुमित मरेे, अजय गाडे, सुधाकर खोत, परचेस अधिकारी रवि जोगदंड, सेल्स ऑफिसर सागर शिंदे, लेबर ऑफिसर शुभम सावंत, राजाभाऊ केवळराम, खयुम मुलानी तसेच सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

## नवनियुक्त जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ मे -**
काँग्रेस पक्षाचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांचा काँग्रेस भवन, धाराशिव येथे माजी जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी विश्वास आप्पा शिंदे, राजाभाऊ शेरखाने, नगरसेवक अमोल कुतवळ, खालिद शेख, प्रशांत पाटील, धनंजय रणदिवे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोहारा खुर्द पाणीपुरवठा योजना रखडली; नागरिकांमध्ये संताप

### पाईपलाईनचे काम तात्काळ सुरू करण्याची मागणी, प्रशासकीय मंडळ बरखास्त करण्याचीही मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२५ मे -**
लोहारा तालुक्यातील लोहारा खुर्द गावासाठी सुरू असलेल्या पाणीपुरवठा पाईपलाईन योजनेचे काम अद्याप सुरू झाले नसल्याने गावातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. उन्हाळ्याचे दिवस असतानाही संबंधित कंत्राटदाराने कामास सुरुवात केली नसल्याचा आरोप करत हे काम तात्काळ सुरू करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी कै. गयाबाई रावसाहेब पाटील बहुउद्देशीय सेवाभावी सामाजिक संघटनेच्या वतीने गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, गावातील पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन टाकीपासून नवीन गाव उत्तर बाजू, नवीन गाव दक्षिण बाजू, मागासवर्गीय वस्ती, उपकेंद्र, व्यंकट गेना रसाळ यांचे घर, कारभारी वस्ती, जुने गाव तसेच भवानी नगर तांडा या सर्व भागांना जोडणारी आहे. ही पाईपलाईन माकणी-लोहारा रोडच्या हद्दीबाहेरून टाकण्याबाबत पूर्वीही निवेदन देण्यात आले होते. मात्र अद्याप प्रत्यक्ष काम सुरू झाले नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दि.२ मे रोजी खंडोबा मंदिरासमोर सुरू असलेले रस्त्याचे काम रोखण्यात आले होते. त्यावेळी विक्रम गायकवाड कन्स्ट्रक्शनच्या व्यवस्थापकाने लेखी स्वरूपात नवीन पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्यास सहमती दर्शवली होती.

त्यानंतर रस्त्याच्या कामास परवानगी देण्यात आली. मात्र त्यानंतरही पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू करण्यात आले नाही तसेच काम कधी सुरू होणार याबाबत कोणतेही लेखी उत्तर देण्यात आले नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

कंत्राटदाराकडून काम सुरू होऊन अनेक महिने उलटूनही पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी न झाल्याने प्रशासनाच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. सध्या उन्हाची तीव्रता वाढलेली असताना गावात कोणतेही पुरेसे पाणीस्रोत उपलब्ध नसल्याने नागरिक, महिला तसेच जनावरांना मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याचेही संस्थेने म्हटले आहे. लोहारा खुर्द ग्रामपंचायतीचा कार्यकाळ दि.८ मे २०२६ रोजी संपला असून सध्या ग्रामपंचायत प्रशासकीय व्यवस्थेखाली कार्यरत आहे.

मात्र हे प्रशासकीय मंडळ गावातील मूलभूत प्रश्नांबाबत निष्क्रिय असल्याचा आरोप करत त्यांना बरखास्त करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. त्यांच्या जागी निवृत्त अधिकारी, माजी सैनिक किंवा समाजसेवक यांची नियुक्ती करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

गावातील पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे गंभीर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत सदर प्रशासकीय मंडळाच्या बरखास्तीचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवण्यात यावा, अशी विनंती गटविकास अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.

नागरिकांचा त्रास लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संस्थेचे अध्यक्ष शेखर रावसाहेब पाटील यांनी केली आहे.

# कै. सिद्रामप्पा कुंभार गुरुजी स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

### डॉ. नागनाथ कुंभार यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक...

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२५ मे -**
शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव व्हावा आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने डॉ. नागनाथ कुंभार यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कै. सिद्रामप्पा कुंभार गुरुजी यांच्या स्मरणार्थ हॉस्पिटलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित केला होता. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यामध्ये अलमिरजैद मलंग शेख, शौर्य करबसपा धमुरे, स्वरा रवी मुळे आदी विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक



वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी डॉ. एम. बी. बिराजदार, बाबुराव मुळे, अनिल घुगे सर, अजय अणदूरकर, सचिन तोग्गी, बसु निसरगुडे, इमाम भाई शेख, अभिजित मोकाशे, कुंभार गुरुजी, इरफान खानापूरे तसेच पालक प्रतिनिधी म्हणून हाजीमलंग शेख, पप्पू धमुरे, रवी मुळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढेल, त्यांचे भविष्य उज्ज्वल कसे होईल तसेच शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून जीवनात मोठे यश संपादन करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन उत्तम प्रकारे करण्यात आले असून उपस्थित पालक व नागरिकांनी डॉ. नागनाथ कुंभार यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शेवटी सर्व उपस्थित मान्यवर, पालक व विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले.

## स्विफ्ट डिझायरच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ मे -**
करंजकल्ला-कळंब रोडवरील खडकी शिवारात स्विफ्ट डिझायर कारने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने शिवाजी चत्रभुज काळे (वय ४६, रा. करंजकल्ला) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.



ही घटना १७ मे रोजी हॉटेल मल्हार समोर घडली. याप्रकरणी प्रशांत काळे यांच्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात कार चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उमरगा चौकात दाम्पत्याला मारहाण करून लूट

### खंडी गजाने हल्ला; ४७ हजारांचा ऐवज लंपास...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मे -**
देवदर्शन करून परतणाऱ्या दाम्पत्याला उमरगा चौकात अडवून मारहाण करत रोख रक्कम व सोन्याची चैन लुटल्याची घटना दि. २४ मे रोजी मध्यरात्री घडली. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी तस्लीम आरेफ पठाण (वय २८, रा. बेंबळी, ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या आपल्या पतीसोबत देवदर्शन करून गुलबर्गा येथून बेंबळीकडे मोटरसायकलवरून परत येत होत्या. दि. २४ मे २०२६ रोजी रात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या दरम्यान उमरगा चौकात दोन मोटरसायकलवर आलेल्या अनोळखी




इसमांनी त्यांना अडवले. आरोपींनी फिर्यादीच्या पतीच्या मोटरसायकलसमोर गाड्या आडव्या लावत गाडीचा हॉर्न का वाजविला? असा जाब विचारला. त्यानंतर त्यांना जबरदस्तीने गाडीतून बाहेर ओढून लोखंडी गज व चापटाने मारहाण करण्यात आली.

मारहाणीनंतर आरोपींनी त्यांच्या जवळील १७ हजार २०० रुपये रोख रक्कम तसेच एक तोळ्याची सोन्याची चैन असा एकूण ४७ हजार २०० रुपयांचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून घटनास्थळावरून पलायन केले. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## पारगाव येथे २००१-०२ च्या दहावी बॅचचे स्नेहसंमेलन; जुन्या आठवणींना उजाळा



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ मे -**
दहावीच्या शालेय जीवनातील अविस्मरणीय क्षण, वर्गमित्रांची मैत्री आणि गुरुजनांचे मार्गदर्शन या सर्व आठवणींना उजाळा देत सन २००१-०२ च्या दहावी बॅचचे दुसरे स्नेहसंमेलन वाशी तालुक्यातील पारगाव येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सलग दुसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहमेळाव्यास माजी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात गावातून काढण्यात आलेल्या उत्साही फेरीने झाली. जय जवान, जय किसान आणि भारत माता की जय च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यानंतर सर्व माजी विद्यार्थ्यांनी प्राथमिक शिक्षण घेतलेल्या जिल्हा परिषद शाळेला भेट देत जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी मुख्याध्यापक एकनाथ मोटे व सलीम शेख यांनी शाळेतील गुणवत्ता वाढ आणि परिसर सुधारणा याबाबत माहिती दिली. शाळेतील सकारात्मक बदल पाहून माजी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक बडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याचे सूत्रसंचालन अभिजित डूगरवाल यांनी केले.

यावेळी सेवानिवृत्त प्रा. सुभाष लादे, प्रा. शिवाजी माने, बजरंग मोरे, धोंडीराम बटुळे यांच्यासह विद्यालयातील प्रा. मांजरे, बाळासाहेब जाधव, सोमनाथ काळे आणि सोमा सोनवणे उपस्थित होते. माजी विद्यार्थी अमोल गावडे, राहुल डोके, संतोष शेंडगे, गणेश लाखे, संजीवनी हावळे, बानू गायकवाड आणि राज डोके यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा देत मनोगते व्यक्त केली.

स्नेहसंमेलनात खो-खो, अंताक्षरी यांसारख्या विविध उपक्रमांनी जुन्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. दुपारच्या सामूहिक भोजनानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## कृष्णाई उळेकर यांच्या पालकांचा आदर्श माता-पिता पुरस्काराने गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मे -**
तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील राज्य युवा पुरस्कार विजेती कृष्णाई उळेकर हिचे पालक प्रभाकर उळेकर आणि सुनीता उळेकर यांचा आदर्श माता-पिता पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

मराठवाडा मित्र परिवार यांच्या वतीने आयोजित आदर्श माता-पिता पुरस्कार वितरण सोहळा रविवारी एमआयटी कॉलेज, लोणी काळभोर येथे पार पडला. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज



विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे संचालक प्रा. डॉ. महेश थोरवे आदी मान्यवर उपस्थित होते. कला शिक्षणात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या कृष्णाई उळेकर या आज राज्यभर भारूडाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, जलसंधारण, वृक्षारोपण, मुलगी शिक्षण, हुंडाबळी, एड्स, कोरोना यांसारख्या विविध सामाजिक विषयांवर जनजागृती करत आहेत. तरुण बलशाली तर देश बलशाली या विचारातून आजच्या व्यसनाधीन तरुणाईला सकारात्मक दिशा देण्याचे कार्य त्या आपल्या कलेतून करत आहेत. कृष्णाई यांच्या प्रभावी कला सादरीकरणामुळे आज त्यांच्या आई-वडिलांचा गौरव झाला आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मांजरा शुगर इंडस्ट्रीजकडून ऊस उत्पादकांना दुसरा हप्ता जमा

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२५ मे -**

तुळजापूर तालुक्यातील मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखान्याने गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये १२२ दिवसांत ६ लाख २९ हजार ३२७ मे.टन ऊसाचे गाळप करून ६ लाख ३५ हजार ४०० क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले. यावर्षी कारखान्याचा सरासरी साखर उतारा ११.२९ टक्के राहिला आहे.

कारखान्याने यापूर्वी ऊस उत्पादकांना प्रति मे.टन २,७५० रुपये दर अदा केला होता.

आता माजी मुख्यमंत्री तथा केंद्रीय मंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त व खरीप पेरणीसाठी मदत म्हणून ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना दुसरा हप्ता प्रति मे.टन १०० रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ही रक्कम २५ मे २०२६ रोजी संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी दिली.

गतवर्षी समाधानकारक पावसामुळे ऊस लागवड क्षेत्र वाढल्याने यंदा कारखान्याचे सर्वाधिक गाळप झाल्याचे प्रशासनाने सांगितले.

तसेच आगामी गाळप हंगाम २०२६-२७ साठी ऊस नोंदणी, मशिनरी दुरुस्ती आणि ऊस तोड-वाहतूक यंत्रणेची तयारी सुरू असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.



## संक्षिप्त वृत्त...



### कै.प्रा. चंदनशिव यांना मरणोत्तर ‘साहित्य जीवनगौरव पुरस्कार’

**कळंब, दि.२५ मे -**

मराठी ग्रामीण साहित्याला ऐतिहासिक योगदान देणारे ज्येष्ठ साहित्यिक कै. प्रा. भास्कर चंदनशिव यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने यंदाचा मरणोत्तर ‘साहित्य जीवनगौरव पुरस्कार’ जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारामध्ये ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतिचिन्ह व शाल यांचा समावेश आहे. धाराशिव येथे २९ मे रोजी आयोजित ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनात महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार कै. प्रा. चंदनशिव यांच्या पत्नी कमलताई चंदनशिव यांना प्रदान करण्यात येणार आहे. आ. कैलास पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित या संमेलनात ग्रामीण जीवन, शेती आणि शेतकऱ्यांच्या व्यथा प्रभावीपणे साहित्याच्या केंद्रस्थानी आणणाऱ्या प्रा. चंदनशिव यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यात येत आहे. पुरस्काराचे पत्र कमल चंदनशिव यांना देताना आ. कैलास पाटील, साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे, ज्ञानेश्वर पतंगे, परमेश्वर पालकर, प्रा. नंदकुमार बालुरे, प्रा. उन्मेष शेकडे, अशोक कुरुंद, सोपान पवार उपस्थित होते.



### इंडियन टॅलेंट सर्च परीक्षेत झेंडवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांचे यश

**भूम, दि.२५ मे -**

इंडियन टॅलेंट सर्च स्पर्धा परीक्षेत जि. प. प्राथमिक शाळा झेंडवाडी येथील विद्यार्थ्यांनी पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेत आयुष गपाट (१७२), सई गपाट (१५८), विरांश कोकाटे (१४६), शौर्य चोरमले (१४४), प्रतिजा चोरमले (१४२), प्रणव चोरमले (११४), आरोही चव्हाण (२३२), प्राजक्ता चोरमले (१८४), आरूपी चोरमले (१७८), साईराज चोरमले (१७०), रुद्र चोरमले (१६४), कार्तिक चोरमले (१६०), संस्कार चोरमले (१५२), यश गपाट (२२६), सार्थक चोरमले (२०४), विनायक गोरे (१९४), प्रणव चोरमले (१९४), किरण चोरमले (१८०), समृद्धी गोरे (१३८), श्रावणी चोरमले (१३०) आणि कार्तिक गोरे (१०४) यांनी उल्लेखनीय गुण प्राप्त केले. या यशाबद्दल मुख्याध्यापक पोपट बोराडे, वनिता कोकाटे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### उमरग्यात पाच दिवसीय निवासी धम्म प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**उमरगा, दि.२५ मे -**

त्रिरत्न बुद्धिस्ट सेंटरच्या वतीने बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृह येथे आयोजित पाच दिवसीय निवासी धम्म प्रशिक्षण शिबिराची सुरुवात भन्ते उरगेंन संघरक्षित यांच्या समर्पण गाथेने मंगलमय वातावरणात झाली. या शिबिराचे उद्घाटन छत्तीसगड येथील ज्येष्ठ धम्मचारी नागरत्न यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. यावेळी त्रिरत्न बुद्धिस्ट सेंटरचे चेअरमन धम्मचारी रत्नपालित, धम्मचारी प्रज्ञाजित, धम्मचारी धम्मभूषण, धम्मचारी विबोध आदी उपस्थित होते. शिबिरात दररोज मैत्रीविकास साधना, आनापानसती ध्यान, प्राणायाम, नैतिक मूल्यांचे शिक्षण तसेच विविध विषयांवरील प्रवचने आयोजित करण्यात येत आहेत. नमो तस्स भगवतो अरहतो या विषयावर विशेष अभ्यास घेतला जात असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीची प्रेरणा जपण्यासाठी आणि स्वयंशिस्त व धम्म जागृती घडवण्यासाठी हे शिबिर उपयुक्त ठरत आहे.

### कास्तीच्या जिप शाळेतील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**लोहारा, दि.२५ मे -**

लोहारा तालुक्यातील कास्ती बु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ८ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. येथील जिल्हा परिषद शाळेतीळ इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा दिली होती. या परिक्षेचा निकाल नुकताच लागला असून अर्णव मनोज पाटील, गंधर्व गोपाळ समदाळे, मनोज महेश भरगंडे, रविराज सुधाकर जावळे, रिशा रामचंद्र गायकवाड, रूद्राक्ष सुनिल गायकवाड, शर्वरी शाहुराज पाटील, वेदिका व्यंकट कोळी, हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या यशा बद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे.

## पवनचक्की प्रकल्पांसाठी उत्खनन व वृक्षतोडीची चर्चा





### वाशी तालुक्यात नागरिकांकडून चौकशीची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ मे -**

विकासकामे करताना पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक असतानाच वाशी तालुक्यात सुरू असलेल्या काही पवनचक्की प्रकल्पांच्या कामांदरम्यान मोठ्या प्रमाणात उत्खनन आणि वृक्षतोड होत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या प्रकाराबाबत स्थानिक नागरिक व निसर्गप्रेमींमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

कडकनाथवाडी ते तेरखेडा शिवार परिसरात पवनचक्की प्रकल्पासाठी रस्त्यांची कामे सुरू असून त्या ठिकाणी मुरूम वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच काही ठिकाणी झाडांची तोड झाल्याचाही दावा स्थानिकांकडून केला जात आहे. या कामांमध्ये पर्यावरणीय नियम व महसूल विभागाच्या परवानग्यांचे पालन होत आहे का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, रत्नापूर-खामकरवाडी शिवार परिसरातही पवनचक्की प्रकल्पाचे काम सुरू असल्याचे सांगितले जात आहे. संबंधित कामासाठी मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू असून त्याबाबत प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

मोठ्या प्रमाणात होत असलेल्या उत्खननामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात असून वृक्षतोडीमुळे निसर्गप्रेमींमधून चिंता व्यक्त होत आहे. मुरूम वाहतुकीसाठी आवश्यक परवानग्या आणि रॉयल्टीबाबतही स्थानिकांमध्ये प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची महसूल विभाग, वनविभाग व संबंधित प्रशासनाने सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जाहीर करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## तेरखेड्यात दोन गटांत सिनेमा स्टाईल हाणामारी

### जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ मे -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे सोमवार (दि.२५ मे) दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास दोन गटांमध्ये सिनेमा स्टाईल हाणामारी झाल्याची घटना घडली.

किरकोळ कारणावरून सुरू झालेला वाद काही वेळातच उग्र स्वरूप धारण करत दोन्ही गट आमनेसामने आल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी या प्रकरणामागे दोन राजकीय गटांतील वाद असल्याची चर्चा गावात सुरू आहे. झालेल्या मारहाणीत दोन्ही गटांतील काही जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून जखमींना पुढील उपचारासाठी धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे समजते.

घटनेची माहिती मिळताच येरमाळा पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तत्पर हालचाली केल्या. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी धाराशिव येथून राखीव पोलीस तुकडी तेरखेडा येथे तैनात करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

घटनेनंतर गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, बातमी लिहिपर्यंत कोणत्याही गटाकडून गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता.

## वाढदिवसानिमित्त वृद्धांना काठी व छत्री वाटप

**हनुमंत जाधव यांचा सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम...**

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ मे -**

हनुमंत अच्युतराव जाधव यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त गोरगरीब व गरजू वृद्ध व्यक्तींना काठी आणि छत्रीचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम उत्साहात पार पडला. वृद्धांना चालण्यासाठी आधार मिळावा तसेच उन्हाळा व पावसापासून संरक्षण व्हावे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी हभप. महादेव महाराज अडसूळ यांनी संस्कृत सुभाषितांचा आधार घेत पुत्र कसा असावा याविषयी मार्गदर्शन केले. आई-वडिलांची सेवा करणारा, सहकार्याची भावना असणारा तसेच समाजातील गरजू लोकांना आधार देणारा पुत्र आई-वडिलांच्या पोटी जन्माला यावा, असे विचार व्यक्त करत त्यांनी हनुमंत जाधव यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच त्यांचे वडील अच्युतराव जाधव यांच्या संस्कारांचाही विशेष गौरव केला.

माधवसिंग राजपूत यांनी आपल्या मनोगतात शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून कार्य करणारे अच्युत मामा यांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख केला. त्याच परंपरेचा वारसा पुढे नेत हनुमंत जाधव हे कर्तव्यदक्ष, विद्यार्थीप्रिय प्रबंधक असून समाजातील गोरगरीबांना मदतीचा हात देणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे हिंदी विभागाध्यक्ष डॉ. दत्ता साकोळे उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हनुमंत जाधव यांच्या सामाजिक कार्याचे भरभरून कौतुक केले.

याप्रसंगी ज्योती जाधव, अच्युतराव जाधव तसेच गावातील गरजू वृद्ध माता-भगिनी व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित वृद्धांना चालण्यासाठी काठी तसेच उन्हा-पावसापासून संरक्षणासाठी छत्रीचे वाटप करण्यात आले.

सामाजिक जाणीव जपत वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## चोरीच्या चार मोटरसायकली जप्त; अंदाजे ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई : दोन आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मे -**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कारवाई करत दोन आरोपींना चोरीच्या मोटरसायकलींसह ताब्यात घेतले. आरोपींकडून अंदाजे ६० हजार रुपये किंमतीच्या चार मोटरसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे मालमत्तेविषयक गुन्ह्यातील आरोपींची माहिती घेत सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करीत पोलीस ठाणे धाराशिव शहर हद्दीत आले असता, पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत व तांत्रिक विश्लेषणावरून माहिती मिळाली की, दोन इसम अंबालना हॉटेलसमोरील चौकात चोरीच्या मोटरसायकलसह थांबले आहेत.

मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार पथकाने सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास नमूद ठिकाणी जाऊन संशयितांना ताब्यात घेतले.

चौकशीत त्यांनी आपली नावे राजेश उर्फ राजा परमेश्वर बनसोडे (वय २१, रा. साठे नगर, धाराशिव) व अतिष हनुमंत सगर (वय २२, रा. भक्ती मार्ग सांगोला चौक झोपडपट्टी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, सध्या रा. गावसूद, धाराशिव) अशी सांगितली. पथकाने मोटरसायकलींबाबत विचारपूस केली असता आरोपींनी त्या चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून चार चोरीच्या मोटरसायकली जप्त करण्यात आल्या. पुढील कारवाईसाठी आरोपींना चोरीच्या मोटरसायकलींसह आनंदनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार सपोनि. अमोल मोरे, पोहेकॉ. बळीराम शिंदे, अमोल चव्हाण, राहुल नाईकवाडी, चालक पोलीस अंमलदार दहीहंडे तसेच ढथ पोलीस अंमलदार बिराजदार यांच्या पथकाने केली.

## वाहतूक नियमभंगाविरोधात २३३ कारवाया; २.६२ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.२५ मे -** शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने २४ मे रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबविण्यात आली. मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात एकूण २३३ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईदरम्यान वाहनचालकांकडून २ लाख ६२ हजार ५०० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## मेडसिंगा पाटीजवळ भीषण अपघात; बांधकाम कामगार ठार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मे -**

शहरालगतच्या बेंबळी रोडवरील मेडसिंगा पाटी येथे (दि.२५) दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका बांधकाम कामगाराचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धाराशिव तालुक्यातील बरमगाव येथील कस्तुरा बलभीम पारवे यांच्या घराचे बांधकाम सुरू असून बांधकामासाठी लागणारे साहित्य आणण्यासाठी त्या एका बांधकाम कामगारासोबत दुचाकीवरून धाराशिवकडे जात होत्या.

बेंबळी रोडवरील मेडसिंगा पाटी परिसरात त्यांच्या दुचाकीला समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या स्विफ्ट कारने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीवरील दोघेही रस्त्याच्या कडेला फेकले गेले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

## आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीत पुल कॅम्पस ड्राईव्ह; ७० विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

### औषध निर्माण क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मे -**

आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसी येथे डॉ. वेदप्रकाश पाटील एज्युकेशनल कॅम्पसमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना औषध निर्माण व हेल्थकेअर क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पुल कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम डॉ. प्रतापसिंह पाटील व करण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.




या उपक्रमात Irise Healthcare Limited d Infinix VTI Limited या औषध निर्माण क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला.

धाराशिव, लातूर व सोलापूर जिल्ह्यातील फार्मसीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी या कॅम्पस ड्राईव्हमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख गाझी यांनी स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसाठी औषध निर्माण क्षेत्रातील विविध रोजगार संधींबाबत मार्गदर्शन केले.

या पुल कॅम्पस ड्राईव्हमध्ये सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी ७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्यांना नियुक्तीपत्रे (ppointment Letters) प्रदान करण्यात आली.

या यशस्वी उपक्रमासाठी महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर विजय सुतार तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## परंड्यात ऐन उकाड्यात वारंवार वीजखंडिती; नागरिक हैराण

**उकाडा, मच्छर आणि अंधारामुळे समर्थनगर, समतानगर परिसरातील रहिवाशांचा संताप...**




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ मे -**

शहरात गेल्या दोन दिवसांपासून सायंकाळी ६ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना उकाड्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

ऐन उकाड्याच्या दिवसांत वीज नसल्याने घरात बसणे कठीण झाले असून नागरिकांनी महावितरणविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

दि.२३ व २४ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १२.३५ वाजेपर्यंत परंडा शहरातील समर्थनगर, समतानगर व शिक्षक कॉलनी परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. सायंकाळी थोडाफार पाऊस झाला की लगेच वीज गायब होत असून ती थेट रात्री ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यानच येत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

वीज खंडित झाल्याने रात्रीचा स्वयंपाक बनवणे, घरातील दैनंदिन कामे करणे यासह गृहिणींना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पंखे, कुलर आणि इतर विद्युत उपकरणे बंद पडत असल्याने लहान



मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांचे विशेष हाल होत आहेत. उकाड्यामुळे नागरिकांना घराबाहेर बसावे लागत असून बाहेरही मच्छरांचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या वीजखंडितीचा फटका व्यावसायिकांनाही बसत असून अनेक दुकानदारांचे व्यवहार प्रभावित होत आहेत.

पावसाळा तोंडावर असताना महावितरणने पूर्वतयारीची कामे पूर्ण करणे अपेक्षित असताना ती वेळेत न केल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे तासनतास वीजपुरवठा खंडित होत असून सर्वसामान्यांना मोठा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

महावितरण कंपनीने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन सुरळीत वीजपुरवठा करावा तसेच वारंवार होणाऱ्या वीजखंडितीचे कायम स्वरूपी निराकरण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.